म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १८०३०

REFBK-0015929

નિગમ
આ.ન.૪૪૦૭
૨૫/૧૧/૫૦
૧૫૨૦

# भाई माधवराव बागलांचा

## विचार प्रवाह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ....२२०९१.... कि. निवडक
क्रमांक ....१५८२९.... नों. दि. १९/११/...

❋

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५८२९
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

भाषणे व लेख संकलन.

REFBK-0015929

प्रकाशक :
दि नव महाराष्ट्र सह. मुद्रण व प्रकाशन संस्था लि., कोल्हापूर.

○

(C) प्रकाशक.

○

प्रथमावृत्ती :

२८ मे १९६७.

○

मूल्य : ५ **रुपये.**

○

मुद्रक व प्रकाशक :

**बी. एस्. पाटील**

चेअरमन्,

दि नव महाराष्ट्र सहकारी मुद्रण व

प्रकाशन संस्था लि.,

५३४, शाहूपुरी, कोल्हापूर.

फोन : १३८०

आम्हा दोघांच्या ऐक्याला अंतर्बाह्य शुद्धीचं
स्वरूप यावं व कोल्हापूर जिल्ह्यांतील सर्व
जातीतील ऐक्याचं हे प्रतीक व्हावं
या अंतरीच्या तळमळीनं मी हा
व्याख्यानाचा छोटा संग्रह
माझे मित्र, बंधू
व सहकारी

**रत्नापा कुंभार नव्हे बागल**

यांना अर्पण
करीत
आहे.

○

— २८ मे १९६७ —

—माधवराव बागल.


आमच्या प्रकाशन संस्थेचे हे तिसरे पुष्प वाचकांना सादर करीत. असतांना मला आनंद होत आहे.

माझे सहकारी मित्र **श्री. पी. बी. पाटील** यांनीं हा ' **विचार प्रवाह**' प्रकाशित करीत असतांना जे श्रम घेतले आहेत त्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें मी माझे कर्तव्य समजतो. भाईजींचा हा 'विचार प्रवाह' म्हणजे समाज जीवनांत घडत गेलेल्या काल प्रवाहाचेच दर्शन आहे. त्यांत विचारवंताना मनन करावयास लावणारा विचार आहे. कलावंताची व्यापक आभ्यासू दृष्टी आहे जातीवंत कलावंताचे मनोभावहि अनेक ठिकाणीं त्यांनी खुल्या अंतःकरणानें व्यक्त केले आहेत.

हे पुस्तक ज्यांना त्यानी अर्पण केलं आहे, ते **श्री. रत्नापा कुंभार** आणि **भाई माधवरावजी** म्हणजे कोल्हापूरच्या राजकीय व सामाजिक जीवनाची घडण घडवणारे शिल्पकारच होत. या पुस्तकाच्या अर्पणानें समाजजीवनात एक आदर्शचे प्रतीक प्रतीत झाले आहे.

हे प्रकाशन करीत असतांना हा स्नेहाचा व मैत्रीचा धागा जनतेसमोर चिरंतन राहावा, हीच आमच्या मनाची भावना आहे व त्या दृष्टीनें हा संग्रह संग्रहीत ठेवण्यासारखा असून सर्वांना स्फूर्तीदायक होईल अशी खात्री आहे. वाचक त्याचे हार्दीक स्वागत करतील यांत मला शंका नाहीं.

**बी. एस्. पाटील,**
बी. ए , एलएल. बी. ॲडव्होकेट.
चेअरमन,
दि नव महाराष्ट्र सहकारी मुद्रण व
प्रकाशन संस्था लि. कोल्हापूर.



△ रत्नापा कुंभार व भाई बागल यांचे पुनर्मिलन △

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
९५८२९

# अर्पण पत्रिकेमागील माझी भूमिका

माझे ‘ विचार प्रवाह ’ हे पुस्तक मला महत्वाचं वाटतं. कारण मी अमक्यावेळीं असं म्हणालो होतो, या माझ्या उक्तीवर सर्वच विश्वास ठेवतील असं नाहीं. पण त्या त्या वेळच्या वर्तमानपत्रातले उतारे मला मिळाल्यामुळे ही शंका साधार दूर करणें शक्य झाले. ही कात्रणे मला बऱ्याच प्रयासानें मिळू शकली.

ते हे माझे पुस्तक मी रत्नापा कुंभार यांना अर्पण केल्याचे पाहून बऱ्याच लोकांना अचंबा वाटेल. म्हणून त्यामागील माझी भूमिका मुख्यतः करवीर जनतेला समजणें अवश्य आहे असं वाटल्या-वरून मी ती देत आहे.

माझ्या अर्पण पत्रिकेचं स्वरूप अत्यंत खासगी अन् जिव्हाळ्याचं आहे. तसं सार्वजनिक स्वरूपाचंहि आहे. राजकीय आहे. पण राज-कीय याचा अर्थ त्यात माझा राजकीय स्वार्थाचा किंवा सत्ता संपा-दनाचा काडीचाहि संबंध नाहीं. माझा नाही तसा रत्नापाचाहि नाहीं हे आमची पत्रे वाचल्यानंतर वाचकांना कळून येईल. आमच्या या पुनर्मीलनामुळें माझ्या तशा रत्नापांच्या सहकाऱ्यांचे व मित्रांचे दुरावलेले सबंध जवळ येतील आणि गढूळ वातावरण नाहीसे होईल व सर्व कार्यकर्त्यांत प्रेमाचा प्रवाह वाढू लागेल अशी मी अपेक्षा करतो.

माझं व रत्नापाचं हे मीलन वीस वर्षांनंतरचं आहे. माझ्या आयुष्यात असं लिहिण्याचा योग जमेल आणि या व्यक्तीबद्दल मी कधी काळी लिहीन असं माझ्याच नव्हे तर माझ्या ओळखीच्या कोणाच्या स्वप्नातहि येणें शक्य नव्हते. पण माझ्या स्वभावातील परिवर्तनामुळें हेहि परिवर्तन मला पाहतां आलं. मी हे श्रेय माझ्याकडे घेत नाहीं. हा गांधी तत्वज्ञानाचा विजय होय. प्रेमाच्या अंगीच ही शक्ती आहे. हा निस्वार्थी प्रेमाचा प्रभाव होय. हे प्रेम स्वतःच्या तसं दुसऱ्याच्या शुद्धीकरणास आणि आत्म्याच्या विकासास सहाय्यभूत होते. याचमुळें वाट चुकलेले दोन भाऊ पुनः त्याच बंधूभावाने आकर्षित झाले !

कोल्हापूर जिल्ह्यातीलच नव्हे तर बाहेरच्या अनेकांनासुद्धा हा चमत्कार वाटेल. माझ्या आयुष्याच्या अखेरीला कां असेना पण निर्मळ भावाने शुद्ध अंतःकरणानें आम्ही पुनः जवळ आलो आहोत. हीच प्रेमभावना माझ्यापासून व रत्नापापासून कोणत्याहि कारणानें कां असेना दुरावलेल्यांना, मित्रांना व राजकीय कार्यकर्त्यांना जवळ आणील असा मला विश्वास वाटतो.

राजकीय चळवळीच्या सुरवातीला मी पूर्ण एकाकी होतो. माझ राजकीय उद्दिष्ट पार पाडायला 'माने हवीरे गायकवाड' या अगदी सामान्य पण ध्येयनिष्ठ कार्यकर्त्याखेरीज जाणती सुशिक्षित अशी कोणीहि व्यक्ती माझ्या आसपास फिरकली नाही. गणगोत-जात जवळ आली नाहीं. सहकार्यांचा हात रक्तसंबंधीनी आप्तेइष्टांनी जातीच्यांनी दिला नाहीं. सुशिक्षित विचारपूर्वक बाजूस राहिले. सामान्य लोक भीतीनें दूर राहिले. जातवाल्या स्वार्थीनी निर्भत्सना केली. निरुत्साही केले. अशक्यप्राय ध्येय बाळगल्याबद्दल हेटाळणी केली तर वाड्यावरच्या आश्रितांनी धमक्या दिल्या. अशा वेळीं अगदी सुरवातीला जी ५–७ मंडळी जवळ आली त्या पैकी ग्रॅज्युएट असलेली व्यक्ती फक्त एकच होती. ती म्हणजे रत्नापा कुंभार ! सातापैकी कांहीनी आयत्यावेळीं माघार घेतली.

सुरवातीपासून ते सत्ता हस्तगत करीपर्यंत माझ्याशी एकनिष्ठ प्रामाणिक, जिवाला जीव देणारा इमानी सहकारी मित्र आणि सल्लागार राहिला तो रत्नाप्पा ! दरम्यानच्या काळात कांही आले, गेले, गळले ! माफी मागून मोकळे झाले !

प्रजापरिषदेच्या स्थापनेपूर्वी कांही काल व नंतर रत्नापानीच माझ्याशी संपूर्ण सहकार्य केले ! प्रजापरिषदेच्या स्थापनेंपासून ते मी मंत्रीपद निवडेपर्यंत ते माझे खरे मित्र, सहकारी व खंबीर आधार होते. रत्नापांचे सहकार्य नसते तर मला संघटना बनवणं शक्य नसतं. मी स्वभावतःच प्रचारक आणि विचार देणारा, रत्नापा संघटक अशी आमची जोडी होती म्हणून प्रचंड कार्यांचा उठाव झाला. आम्हीं जिवाभावानें व ध्येयानें जणू एकरुप झालो होतो. रत्नापासारखा अहर्निश झटून काम करणारा मला दुसरा असा साथीदार नव्हता. मी रान उठवणार, रत्नापा त्याची कष्ट मशागत करणार, मी वळवाच्या पावसासारखा जमीन भिजवणार, रत्नापा त्याची नांगरटी करणार, यांतून नव विचाराला पालवी फुटली. राजशाहीची खुरटलेली तणे बाजूस सारून ती नव्या दमानें, नव्या विचाराने, नव्या जोमानें बाहेर पडली.

यांतून प्रजापरिषदेची रोपटे वाढली ! साऱ्या संस्थानभर पसरली ! त्यांना खुडून टाकण्याचा राक्षसी प्रयत्न झाला ! कांहीना उपडले ! कांहीना तुडवले ! कांहीना छाटले ! पण त्यांचीं वाढ कमीं झाली नाहीं. त्यांनी आजुबाजूची संस्थाने व्यापली. त्यांचेहि नेतृत्व कोल्हापूरकडेच आले. कोल्हापुरची प्रजापरिषद हा महाराष्ट्राचाच नव्हे तर भारताचा कुतुहलाचा विषय झाला.

मी कार्याध्यक्ष व रत्नापा सेक्रेटरी. माझ्याशिवाय रत्नापाला अस्तित्व नव्हतं. रत्नापाशिवाय मला अस्तित्व नव्हतं. आमची जोडी अभेद्य होती !

## चार

त्या आम्हाला व आमच्या कार्यकर्त्यांना नामोहरम करण्या-करतां छळवादाला सुरवात झाली. मी संस्थेचा कार्याध्यक्ष व प्रमुख असल्यामुळें राजद्वेषाचं व छळाचं मुख्य टार्गेट बनलो ! मी व माझ्या-बरोबरच्या कार्यकर्त्यांना सक्तमजुरी झाली. पायात सव्वा मणांच्या बेड्या, वर चड्डी, लंगोटी, अंगात बंडी, डोक्यावर घोंगडी व घमेले, हातात फावडे या अवतारात आमची रस्तोरस्ती धिंड काढली. गुजरीतून नेलं. पद्माळा रेसकोर्सवर नेऊन पारेने खण फोडाय लावली. दगडाच्या पाट्या उचलाय लावल्या. शालिनी पॅलेस व नवा राजवाड्याच्या बागा खणाय लावल्या, रस्ते झाडाय लावले. पन्हाळ्या-वरच्या विहिरीचे पाणी मोटेने, बैलाऐवजी आम्हा कार्यकर्त्यांकडून उपसाय लावले. या सर्व वेळी रत्नापा माझ्याबरोबर होता. आम्हाला एकाच खोलीत डांबून घातलं होतं. अंथरायला घोंगड, पांघरायला घोंगडं व उशाला जेवायची थाळी ! कामालाहि बरोबर नेलं. या कष्टातून, हालातून आमची मैत्री घट्ट झाली ! प्रेमाची वाढ झाली ! सख्या भावाहूनहि रत्नापा माझ्याजवळ आला ! आम्ही एका ताटात जेवलो. तुरुंगातहि रत्नापा भावाहूनहि माझी काळजीं घेई ! त्या तुरुगातहि सहकार्यांना माझा जयजयकार कराय लावी.

मला आठवतं, बाबुराव रुईकरांच्या बंगल्यात रत्नापा आजारी पडला. बाबुराव आपल्या मुलीच्या आजारासाठीं सर्व कुटुंबासकट मिरजेला गेले होते. रत्नापाला जेवायला करून घालायला तेथे कोणी नव्हतं. तेव्हां मी माझ्या घरचा डबा त्याचेसाठीं सायकलवरून घेऊन जात असे. घरी आला म्हणजे त्याची गादी घालून मीच मच्छर-दाणी लावत असे. आमच्यात दुजाभाव नव्हता. लहान मोठं हा भाव नव्हता. एकमेकांची सेवा करण्यात मानापमान वाटत नव्हता !

अशा बंधुभावानें एकजीव झाल्यामुळें माझ्या यशस्वी दौऱ्यांत मी जयजयकाराच्यावेळीं लोकांना म्हणे, ‘रत्नापा कुंभार माधवराव बागल’ असं म्हणू नका, “माधवराव कुंभार व रत्नापा बागल” म्हणा ! अशी घोषणा करा.

या कष्टानंतर हालानंतर, प्रजापरिषद संघटनेला यश आलं. बेड्या घालून धिंड काढलेल्या कार्याध्यक्षाच्या हाती संस्थानची राज्यसूत्रे आली. मी मंत्रिमंडळ बनवू शकलो. त्या मंत्रिमंडळांत रत्नापाचा समावेश केला होता. पण ! ! !

पुढचा इतिहास मी लिहू इच्छित नाही ! सत्तेच्या शिखरावर चढल्यानंतर आम्ही दुरावलो ते अगदी या वेळेपर्यंत ! ! १९६७ च्या निवडणुकीपर्यंत ! जवळ जवळ २५ वर्षे ! !

मध्ये येथील काँग्रेस कार्यकर्त्यांची एकी व्हावी म्हणून मी प्रयत्न केला ! काँग्रेस इमारतीच्या पायाभरणीचे वेळी ऐक्याचे आवाहन केले ! कांही लेखहि लिहिले. पण त्याचा कोणावरहि परिणाम झाला नाहीं ! मीच थट्टेचा विषय होऊन बसलो. याच परस्परांतील वाकुडपणामुळें कोल्हापूर जिल्हा मंत्रीपदास मुकला असं मला वाटतं. कोणालाहि मंत्रिपद दिलं नाही तरी चालेल पण अमक्या व्यक्तीला देऊ नका असं म्हणण्यापर्यंत मजल गेलीं. या बाबत मी सुद्धा निर्दोष आहे असं म्हणता येणार नाहीं.

१९६७ च्या या निवडणुकीवेळी मी आजारी पडलो. काँग्रेस उमेदवारांचा प्रचार करण्याकरता, त्यांच्यासाठीं महाराष्ट्रभर दौरा काढण्यासाठीं माझा जीव धडपडत होता. पण घराबाहेर पाऊल टाकणंच अशक्य झालं. महाराष्ट्र प्रांतिकची इच्छाहि पुरी करता आली नाही. पण एका प्रश्नामुळें मला कार्यं प्रवृत्त केलं. मला स्वस्थ बसवेना. पंगू असलो तरी लेखणी धड होती. ती त्याच प्रजापरिषदेच्या इज्जतीकरता हाती धरली.

शिराळ तालुका ही तर माझी राजकीय जन्मभूमि ! प्रजा-परिषदेच्या जन्मावेळीच जयसिंगपुरांत मला अटक झाली होतीं. प्रजापरिषदेने राजशाहीं विरुद्धच्या लढ्याला जे यश मिळवून दिलं

त्याचा मुख्य वाटा शिरोळ तालुक्याचा. तेथे माझा सहकारी रत्नापा उभा राहिलेला. अन् जी विचारसरणी घेऊन प्रजापरिषदेनें राजशाहीची सत्ता नष्ट केली त्याच राजशाहीचा अवशेष जतन करण्याकरता विजयमाला राणीसाहेब रत्नापाला व जनरल थोरातांना पाडण्याकरता प्रचार करू लागल्या होत्या. विजयमाला राहिल्या त्या तनख्याचा प्रश्न घेऊन. म्हणून तेथील लढ्याचं स्वरुप होतं पुरोगामी व प्रतिगामी विचाराच्या संघर्षाचं. गादीचं पावित्र्य कीं लोकशाही ! ज्या जुनाट परंपरा, राजशाहीचे पावित्र्य या कल्पना काढून टाकण्याकरता साऱ्या जनतेला जागं केलं होतं. व त्यांना त्यांच्या श्रेष्ठत्वाची शक्तीची व सार्वभौमत्वाची कल्पना दिली होती. त्या त्रेतायुगातल्या प्रतिगामी कल्पनाना रत्नापा व थोरातांना विरोधकांनी उचलून धरलेले पाहून मला स्वस्थ बसवेना. जी विचारसरणी मारण्याकरता मी खुनांच्या धमकीला भ्यालो नाहीं व खुनी प्रयत्नाला राजरोस तोंड दिलं तिचाच पुनः पुरस्कार ! !

यामुळे रत्नापा ही व्यक्ती जाऊन मला तेथे प्रजापरिषद दिसू लागली. प्रजापरिषदेची व थोरातांच्यामुळे यशवंतरावजींची इज्जत पणाला लागलीं आहे. या भावनेने मी जागा झालो. भारला गेलो. आणि वातावरण माझ्या विचारा विरुद्ध आहे, विरोधी प्रचारामुळे जिवास धोका आहे, याची पुरीं जाणीव ठेवून मी लेखणी उचलली व प्रचारास सुरवात केली. कोल्हापूचे वातावरण दहशतीनें भरल्यामुळे माझ्या पत्रकाना येथे जागा मिळू शकली नाही. जिल्ह्याबाहेरच्या पत्राकडे धाव घ्यावी लागली. विशाल महाराष्ट्र बेळगांव व पां. वा. गाडगीळ यांचे नवशक्तीचा मला आधार मिळाला. नवशक्तीने तर पुरस्कारच केला. कांही स्वतंत्र पत्रके काढली.

पूर्वी राजेशाही विरुद्ध लढा देते वेळी रेसिडेंट लँगने मिलिटरीच्या संगीनी रोखल्या होत्या, घोडी अंगावर घालण्याकरता सज्ज ठेवली होतीं. पण जनता आमच्या बाजूची होती.

आज त्याच राजशाही अवशेषाबरोबर झगडताना कॉंग्रेसद्वेषाने ध्येयाला व तत्वाला विसरलेले कार्यकर्ते, पुढारी व पुरोगामी पक्ष तसंच अज्ञ जनता निव्वळ उलट नव्हती तर राजरोस धमक्या देत होती. वाटलं मी आणखी किती दिवस जगणार ! मग पुनः त्याच लोकशाहीच्या अभिमानाकरतां मरण आलं तर भाग्य नव्हे काय ?

आणि याच भावनेनें रत्नापा उभा म्हणजे मीच उभा आहे. प्रजापरिषद उभी आहे या भावनेनं मीं रत्नापाला पाठिंबा देणारं पत्रक काढलं. त्याला इतरानी कोणी प्रोत्साहन दिलं नव्हतं रत्नापा-नाही त्याची जाणीव नव्हती. मला प्रोत्साहन देणारी शक्ती होती प्रजापरिषदेची पुण्य स्मृति. रत्नापा माझा त्यावेळचा सहकारी ! माझा भाऊ !

रत्नापाचा द्वेष करणारे येथे बरेच कॉंग्रेस कार्यकर्ते आहेत. मीही त्यापैकींच एक होतो. पण हा सर्व विरोध असतांना रत्नापानं आपलं अस्तित्व खंबीरपणें टिकवलं आहे. आपल्या अनुयायांना संभा-ळलं आहे. त्यांच्यात फुटीरवृत्ती कुठेही आढळत नाहीं. इचलकरंजी साखर कारखाना यशस्वीपणें चालवला आहे. या सर्वांचा विचार करून अशा माणसाचा कॉंग्रेसनें उभा केलेल्या उमेदवाराचा एके-काळच्या माझ्या जिवलग मित्राचा आणि प्रजापरिषदेच्या खऱ्या पाठिराख्याचा पराभव होता कामा नये. म्हणून मी खालील पत्रक काढले:-

'आतापर्यंत मी दुसऱ्या व्यक्तीनां निवडून आणण्याकरतां महा-राष्ट्रभर दौरे काढले आहेत. या खेपेस मी आजारी पडल्यामुळे घरा-बाहेरही पाऊल टाकू शकलो नाहीं. राजकीय चळवळीत पडल्यापासून मी स्वतः केव्हांही निवडणुकीस उभा राहिलो नाही. राहिलोच असतो तर माझ्या राजकीय जीवनाला आणि राजकीय झगड्याला सुरवात झाली. ज्या तालुक्यांत माझ्याच अध्यक्षतेखाली

प्रजापरिषदेचा जन्म झाला. आणि जनतेने अभूतपूर्व यश मिळवून कोल्हापुरांत लोकशाहीची प्रस्थापना केली त्या शिरोळ तालुक्यात उभा राहिलो असतो. याच तालुक्याच्या पुढारीपणामुळें कोल्हापूरला लोकराज्य आले. महाराष्ट्रांत कोल्हापूरची कीर्ति वाढली. त्या चळवळीला अखिल भारतीय कीर्ति मिळाली. त्याच तालुक्यांत माझे सहकारी व ज्या आम्ही दोघानी तुरुंगवास काढला ते माझे बंधू रत्नापा कुंभार व भारताचा लढाऊ लौकिक ज्यांनी वाढवला ते ले. जनरल शंकररावजी थोरात निवडणुकीस उभे राहिले आहेत.

ज्यांना माझ्याबद्दल आपुलकी वाटत असेल, ज्यांना प्रजापरिषदेचा अभिमान वाटत असेल, ज्यांना जनतेच्या त्यागाची कल्पना असेल, ज्यांना लोकशाहीची आस्था असेल त्यांनी माझे बंधू रत्नापा कुंभार व देशभूषण ले. ज. शंकररावजी थोरात यांनाच मते देऊन प्रचंड मतानें निवडून आणावे अशी माझी सर्वांना अंतःकरणपूर्वक विनती आहे.

**माधवराव बागल.**

हे माझे पत्रक दैनिक सत्यवादीच्या १७-२-६७ च्या अंकांत प्रसिद्ध झालं यानंतर ता. ८-३-६७ ला मला रत्नापा लिहितात-

**प्रिय माधवरावजी,**

मी ७ वर्षांचा असताना माझी आई वारली आणि १९४२ च्या भूमिगत अवस्थेत असतांना वडील निवर्तले आणि एका दृष्टीने मी व्यक्तिगत जीवनांत आजपर्यंत पोरकेपणानेंच दिवस काढले. पण आपल्या विचारानें आणि सहकार्यांने माझा राजकीय पिंड बनला आणि राजकीय क्षेत्रामध्ये जिद्दीने काम करीत असतांना आई-वडिलांच्या निधनानें व्यक्तिगत जीवनामध्ये निर्माण झालेला

पोरकेपणा साफ विसरलो आणि आई वडिलांच्या नात्याच्या स्वरुपामध्यें घनिष्ट रीतीने निर्माण झालेल्या आपल्या सहकार्यानें मी राजकीय क्षेत्रांत काम करीत आलो. मध्यंतरी माझे व आपले कांही मतभेद झाले. आपण एकमेकापासून दुरावलो आणि खऱ्या अर्थानें मला राजकीय क्षेत्रांत पोरकेपणाच आला. राजकीय क्षेत्रांत मी काम सोडलं नाहीं पण मी व आपण दूर झाल्याचा पोरकेपणा मात्र माझ्या मनांमध्यें आणि जीवनामध्यें कायमपणें घर करून राहिला होता.

गेल्या कांही दिवसांत आणि विशेषतः १९६७ च्या निवडणूकीमध्ये आपण मला जाहीरपणे व इतक्या आपलेपणाने पाठिंबा व्यक्त केलात ! त्यामुळे प्रिय माधवरावजी, माझा राजकीय क्षेत्रांतील पोरकेपणा नाहींसा झाला. पुन्हा मला आई-वडील मिळाल्याचा आनंद झाला. मत्रीमंडळात स्थान मिळाले कीं नाहीं याचे मला विशेष महत्व वाटत नाहीं. पण आपली मैत्री मिळालीं, माझे राजकीय पिंड घडवणारे आपण माझे विधाते मला परत मिळालात ! जगाची सारी संपत्ती आणि जगाचे सारे राज्य मला कुणी दिले असते तर जेवढा आनंद झाला नसता तेवढा आनंद माझ्या आणि तुमच्या नव्यानें निर्माण झालेल्या दृढ संबंधानें मला झाला आहे. यामध्यें कांही तरी नियतीचा हात असावा असे मला वाटते.

आपले वय झाले असले तरी आपले विचार पूर्वी इतकेंच सुदृढ आहेत. तितकेच ते सदाचारी आणि वैचारिक निष्ठेनें भारलेले आहेत. आणि म्हणून आपण शरीरानें विशेष काम करू शकत नसला, तरीं सुदृढ विचार समाजाला देऊन फार मोठे काम आपल्या हातून होणार आहे. आणि विचार देण्याचेच काम आज आपल्या देशाला अवश्यक होऊन राहिले आहे. आपण विचार द्यावेत आणि शरीरानें सुदृढ असलेल्या माझ्या सारख्या सहकारी मित्रानें प्रत्यक्ष त्या विचाराची अंमलबजावणी करावी अशा कामाची तुमची व आमची

सांगड होत राहण्यानें समाज निश्चित सुदृढ होईल यासंबंधी मला कांही शंका वाटत नाही. नव्याने आपले व माझे संबंध पूर्वी इतकेच दृढ झाले आहेत. तीं दृढता कायम रहावी, वाढावी अशी अपेक्षा व्यक्त करून पूर्वीच्या सगळ्या भावना विसरुन नवा क्षेत्राचा संबंध निर्माण केल्याबद्दल मी आपणास अंतःकरणपूर्वक धन्यवाद देतो आणि आभार मानतो.

आपला नम्र,

**रत्नापा कुंभार**

राजारामपुरी- १०।३।६७

**प्रिय भाऊ रत्नापा बागल,**

पुनः आयुष्याच्या अखेरीला याच नांवानें हाक मारण्याचं निर्मळ मनानें भाऊ म्हणण्याचं आणि 'रत्नापा बागल' या प्रसिद्ध नांवानें हाक मारण्याचं भाग्य लाभलं ! या मागे परमेश्वर न मानणारा, मी परमेश्वरी इच्छा आहे असं मानतो. दुसरा शद्ब मला आठवत नाहीं. मी पण पोरकाच झालो आहे. दोन भाऊ गेले ! आणि तिसरा !!! काय लिहू मी ! ते शद्ब मला लिहवत नाहींत. त्याच्याकडे पाहतांना माझा जीव कासावीस होतो. हा पाचवा चुकलेला भाऊ मला पुनः मिळाला ! मी आता त्याला सोडणार नाहीं. मग जग माझ्यावर कांहीहि आरोप करो.

रत्नापा, मला यापुढं कोणाचं वैर करायचं नाही. मी असे केले, त्यानें असे केले हे म्हणण्यातहि माझा मानसिक अधःपात आहे, याची जाणीव मला होऊ लागली आहे. प्रेमाच्या परत मोबदल्याची अपेक्षाहि दुःखदायक होते. उपकारच तेवढे आठवावेत आणि त्याबद्दल कृतज्ञता बुद्धी ठेवावी यातच खरे सुख आहे या निर्णयाला मी आलों आहे.

तुमच्या माझ्या मैत्रीबद्दल मला कोणी कांही म्हणो, कांहीहि टीका करोत, मला खुळा म्हणोत. मी म्हणेन, देवा मला असाच खुळा बनव. निर्द्वेषी निरहंकारी बनव.

तुमचा

**माधवराव कुंभार उर्फ माधवराव बागल**

दुसऱ्याच्या चुका, अपराध व दोष दाखवून त्याला सुधारण्याच्या प्रयत्नानें ती व्यक्ती सुधारण्याऐवजी दुरावते हा मला पुष्कळ अनुभव आला आहे. यापेक्षा अंतर्मुख होऊन स्वतः-च्याच चुका, दोष व अपराध शोधण्याने स्वतः सुधारण्यास मदत होते. व ही वृत्ती आत्म विकासास कारणीभूत होते. आलेल्या कटु अनुभवानंतर मी या निष्कर्षास आलो आहे.

११-३-६७

माझ्या अर्पण पत्रिकेची पार्श्वभूमी ही आहे. ती सविस्तर देण्याचे कारण आम्हा दोघांतील ऐक्याचे परिणाम कॉंग्रेसमधील सर्व कार्यकर्त्यांवर व्हावेत, एकमेकांतील साशंकता व दुजाभाव नाहीसा व्हावा व कॉंग्रेस संघटना एकसंधी, एकजीवी व्हावी व कोल्हापुरच्या नांवाला पुनः उजाळा मिळावा, जातिभावना समूळ नष्ट व्हावी व कॉंग्रेसच्या गांधी–नेहरु–शास्त्रींच्या लौकिकात भर घालावी हा आहे.
२८ मे १९६७.

**माधवराव बागल.**

भाई माधवरावजी बागल यांचा चरित्रात्मक उल्लेख करण्याचा हेतू नाहीं. पण त्यांच्यासंबंधी, त्यांच्या स्वभावासंबंधी 'श्री. कवाळे' यांनी लिहिलेले शब्दचित्र उद्‌बोधक वाटल्यानें आम्ही पुढे देत आहोत.

— प्रकाशक.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम .......................... दि: ......................
क्रमांक .......................... नोंद दि ......................

# आमचे भाईजी !

लेखक : जनार्दन कवाळे, एम्. ए.
राजारामपुरी, कोल्हापूर.

" वेडे आहांत तुम्ही !"

खुर्चीत बसतां बसतां भाई माधवराव बागल मला उद्देशून कांहीशा रागानें म्हणाले.

२८ मे १९६६ चा दिवस. दुपारचा एक वाजून गेला होता. भाईजींच्या एक्काहत्तराव्या वाढदिवसानिमित्ताने त्यांना पुष्पहार अर्पावयास मी आणि माझे बंधू व सहकारी कार्यकर्ते श्री. शा. शि. कवाळे गेलो होतो.

भाईजी रागानें बोलत असले तरी मी माझा पुन्हां पुन्हां येणारा घाम पुशीत शांतपणे बाजूच्या खुर्शीत बसलो होतो.

" खरोखर वेडे आहांत तुम्ही ! " भाईजी म्हणाले.

" होय." मी शांतपणे होकार दिला.

" खरोखर तुम्हाला कांहीं कळत नाहीं ! " खुर्चीतल्या खुर्चीत हालचाल करीत ते म्हणाले.

" होय." मी ठराविक उत्तर बदललं नाहीं.

" अगदी वेडे आहांत तुम्ही ! "

आतां मात्र माझ्याच्यानें राहवेना. मी म्हणालो, " होय. मला कांही कळत नाहीं, मी वेडा आहे या सर्व गोष्टी मला मान्य आहेत. पण–"

बाजूच्या बाकावर सकाळपासून अनेक चाहत्यांनी अर्पिलेल्या हारांचा भला मोठा ढीग पडला होता. त्याकडे बोट दाखवून मीं म्हणालो, " रुपयादीड रुपयाचा हार घालणारा मी इतका वेडा, मला इतकं कळत नाहीं तर हे मोठमोठे हार घालणारे माझ्यापेक्षा अनेक पटीनें वेडे असले पाहिजेत, त्याहून मी बरा."

भाईजीना लागलीच उत्तर देतां आलं नाही. त्यांचा सात्विक राग उतरलेला दिसला. त्यांना गप्प पाहून ते हरल्याचा व मी विजयी झाल्याचा मला मनातल्या मनात फार आनंद झाला. पण थोड्याच वेळांत प्रेमानें ओथंबलेल्या शद्वात ते शांतपणें म्हणाले, " तुम्ही हार घालण्याची काय गरज होती ? खरं प्रेम व्यक्त करायला हारांची काय जरूरी ?

माझ्या भाईजींच्या या आत्यंतिक जिव्हाळ्याच्या वाक्यानं मला निरुत्तर केलं.

भाईजी हाडाचे कलावंत. त्यांच्या घरांत पाऊल पडताच उद्‌गार यावेत, " घर ? छे: ! आर्ट गॅलरी ! ! " वाटतं, त्यांचं घर रहाण्यासाठी नसून चित्रासाठी असावं. त्यानी काढलेली चित्रे त्या कलेची विशेष माहिती नसलेल्या माझ्यासारख्यालाहि रमवितात.

थंडीनें हुडहुडणाऱ्या दोन झाडांच्या चित्राकडे पहातांच थंडीनें अंगावर कांटा मावल्यासारखे होते. पंचगंगेच्या संथ पाण्यांत बुडी

मारण्याची हुक्की येते. अंबाबाईच्या देवालयाला प्रदक्षिणा घालीत आवारात फिरत असल्याचा भास होतो. पन्हाळगडावर स्वछंदपणें भटकत असल्यासारखे वाटते. गोकाकचा धबधबा अंगावर तर कोसळणार नाहीं ना? अशी शंका येते. कांही चित्राकडे पाहतांना वाटतं, "किती रखरखीत उन्ह पडलं आहे! धरणीतून नुसत्या ज्वाला निघताहेत!"

आपलं दर्शंन देण्यापूर्वी सृष्टीचा कलावंत जादूगार पृथ्वीआड लपून अस्मानांत गुलालफेकी करीत जागे होणाऱ्या हरएक प्राण्याला आपल्या किमयेनं मोहवीत असतां भाईजीनी संधी साधून झटकन् आपल्या कुचल्यानें त्याची किमया कागदावर पकडून ठेवली. भाई-जीनी ती इतक्या उत्कृष्टपणें आणि इतकी जशीच्या तशी पकडली की, त्याबद्दल त्यांना सुवर्णपदक मिळालं.

एका चित्रांत पौर्णिमेचा चंद्र थोडा वर आला आहे. शीतल चांदण्यानं रकाळा माखला आहे. चंद्राचं प्रतिबिंब लाटेवर खेळत आहे. लहान मुलाला जरी विचारले तरी ते सांगेल, "चांदणी रात्र आहे ही!" चांदण्या रात्री रंकाळ्याकडेनें फिरत असतां भाईजींनीं त्यांच्याबरोबर असलेल्या बाबूराव पेंटरना थांबवून तिथल्या तिथे अवघ्या दहा मिनिटांत हे चित्र काढलं. विशेष गोष्ट ही कीं, चंद्र-प्रकाशांत रंग बरोबर ओळखत नसतात. किती प्रभुत्व त्यांचं रंगावर आणि कलेवर!

मनुष्याच्या कृतीमधून त्याच्या मनाची ठेवण प्रकट होत असते. ज्या कलावंताचं मन पंचगंगेचा निर्मळ प्रवाह नि सौंदर्यानं ओसंडणारा परीसर, उंच कड्यावरून उडी घेणारं धबधब्याचं स्फटिकावत् जल, विशाल दर्या, अंबाबाईचं पवित्र आवार, शिव-बाच्या वीरत्वाने पावन झालेला पन्हाळगड आणि सत्य दर्शन घडविणारे निसर्गाचे मनोहर देखावे आकर्षित करून घेतात. त्याचं ते मनहि तसेच 'सत्यं शिव सुंदरम्' असावयास पाहिजे.

अशा ह्या भाईजींची वृती राजकारणांतही तशीच राहिली. त्यांचं उभं आयुष्य रखरखी राजकारणांत गेलं. संस्थानी राजवट उलथून कष्टकऱ्या बहुजन समाजाचं राज्य प्रस्थापण्याकरिता त्यांनी मणामणाच्या बेड्यांनी शरीर जखडून घेतलं, नरकमय संस्थानीं तुरुंगवास भोगला, खडी फोडली, हद्दपारी भोगली पण कधीहि सत्तेच्या जागा भोगल्या नाहीत, कोल्हापूर संस्थानचे मुख्यमंत्रीपद मिळालं असता अंगावर चढणाऱ्या विंचवासारखं दुसरा दिवस उजाडण्यापूर्वीच ते झटकून टाकलं. इतरांना आमदार, खास-दार बनविले पण स्वतः मात्र मतदारच राहिले. हे सर्व पाहून लोक म्हणतात, " भाईजींचं राजकीय आयुष्य अयशस्वी झालं."

पण भाईजींच्या विजयाच्या कल्पना फार वेगळ्या आहेत. संस्थानी राजवटीशी झगडत असतां जनतेनें त्यांच्याबद्दल केलेल्या जयघोषाने त्यांच्या कानठिळ्या बसल्या आहेत, त्यांच्याबद्दल टाक-लेल्या उसाशांत ते गुदमरून गेले आहेत, त्यांच्याबद्दल ढाळलेल्या अश्रूंत ते न्हाले आहेत, याबद्दल ते स्वतःला भाग्यवान समजतात, यालाच ते आपल राजकीय ऐश्वर्य मानतात. ते अभिमानानें छाती फुगवून म्हणतात, "ज्याच्यासाठीं झगडलो ते मिळविले. राजशाही उखडून प्रजासत्ता प्रस्थापिली. सयुक्त महाराष्ट्र उघड्या डोळ्यांनी पाहिला. कोण आहे माझ्यासारखा भाग्यवान ?" ह्याच खऱ्या सेवकाच्या जनभक्ताच्या अपेक्षा आणि विजयाच्या कल्पना ! याला म्हणावा खरा समाजसेवक !!

भाईजींनी कला, राजकारण आणि लेखन हे सर्व खालच्या वर्गांकरितां केले. त्यांचा पिंड प्रचारकाचा. नव्या पिढीचे राजकारण 'बेकारी व तीवर उपाय' 'स्वराज्याचा शत्रू' व 'लग्नबंधन की तुरुंग-वास' ही पुस्तके स्वतःच्या पत्नीच्या पाटल्या विकून प्रसिद्ध व जनतेला फुकट वाटली मराठी जनतेला समाजवादाची पहिली ओळख भाईजीनीच करून दिली. त्यांची ८०-९० पानांची छोटी

छोटी पुस्तके वाचली तर त्यामागे अनेक ग्रंथाचा आभ्यास दिसेल त्यांची वाणी आणि लेखन अभ्यासाशिवाय नाहीं.

सत्यवादीकार श्री. बाळासाहेब पाटलानी भाईजीना 'बहुजन समाजाचे शिल्पकार' हा ग्रंथ लिहण्यास प्रवृत्त केले. त्यांतील प्रत्येक व्यक्तिचित्राला त्यांनी आपल्या दै. सत्यवादीमध्यें प्रसिद्धी दिली. ज्यांनी आपल्या विचारांनी आणि कृतीनें बहुजन समाजाची जडण घडण केली अशा थोर तेजस्वी व्यक्तिची ज्वलंत ध्येयवादी जीवन दर्शन घडविणारी छोटी छोटी व्यक्तिचित्रें लिहीण्यात भाईजी इतके तन्मय झाले झाले होते कीं त्यांना दिवसरात्रीचे बंधन राहिले नव्हते. ते स्वतःला विसरले. त्यांची नात सुचा त्यांच्यासमोर आली त्यावेळीं ते तिला ओळखूच शकले नाहींत. हा ग्रंथ वाचल्यानंतर वाटत "जीवन जगावं तर असं!" आजच्या तरुण पिढीला हाच ग्रंथ मार्गदर्शन करूं शकेल. असा हा बहुमोल आणि अभ्यासू ग्रंथ युनिव्हर्सिटींनी वरच्या वर्गाच्या अभ्यासक्रमांत घालावा इतका श्रेष्ठ दर्जाचा आहे.

त्यांच्या 'माझा परिवार' या पुस्तकावरून त्यांचा गोतावळचा विषयीचा विशाल दृष्टिकोन दिसून येईल. त्यांत त्यांच्या घरांतील आप्तमंडळीच नसून ज्यांचे त्यांच्याशी आचारानें आणि विचाराने जडले अशा व्यक्तिची बहुरंगी व्यक्तिचित्रे आहेत. त्यांत त्यांची 'बेटी' कुत्री सुद्धा आहे.

सुरवातींपासून आजपावेतो केलेल्या भाषणांचा समावेश असलेला 'विचार प्रवाह' हा ग्रंथ त्यांचे प्रगतशील विचार दर्शन घडविणारा असून आजही मार्गदर्शक वाटेल.

ज्याची परीक्षा जवळ येत आहे आणि ज्याला पहिला क्रमांक काढण्याची जिद्द आहे, अशा विद्यार्थ्याप्रमाणें कोणताहि ग्रंथ पुढे घेऊन

एकाग्रतेनें वाचीत असलेले, लाल शाईनें कांही ओळी रेखांकित करीत असलेले, विशेष मजकुराची स्वतंत्रपणें टांचण करींत असलेले उत्साही, अभ्यासू भाईजो दिसतील. कला, चरित्रे, फिलॉसफी, सोशालिझम्, वाङ्मय इ. ची विविध लेखकांची हजाराच्या वर पुस्तकें आज त्यांच्या संग्रहात आहेत. ही पुस्तके सोडून दुसरी हजाराच्या दरम्यान पुस्तकें शिवाजी विद्यापीठाला व ताराराणो विद्यापीठाला देणगी दाखल दिली आहेत. जवळ असलेली व दिलेलो सर्व पुस्तके त्यांनीं अभ्यासिली आहेत. इब्सेन, बर्नार्ड शॉ, ओस्कर वाईल्ड, व्हिक्टर ह्युगो, टागोर, अॅप्तन चेखॉव, मपाँसा, मॅक्झिम गोर्की इ. लेखक त्यांच्या आवडीचे असून ते त्यांनी पुरे अभ्यासिले आहेत.

ज्यांच्या लेखणीचा, कुंचल्याचा, वाणीचा आणि राजकीय कृतींचा केंद्रबिंदू ‘ बहुजन समाजाचे कल्याण ’ हाच आहे. अशा थोर भाईजींचे ‘जीवन प्रवाह’ हे आत्मचरित्र विक्रम युनिर्व्हसिटोनें एम. ए. च्या अभ्यासक्रमांत घातले आहे ही त्यांचा मोठेपणा सिद्ध करणारी बाब होय

जे भाईजी कठोर शिक्षांना डरले नाहींत, घोड्यांच्या टापाखाली शरीर घालायला कचरले नाहींत, उघड्या छातीवर गोळ्या झेलायला भ्यायले नाहींत असे जीवाची पर्वा न करणारे भाईजी आजारी पडून अंथरुणावर मरायला फार घाबरतात. कदाचित त्यांना तो अपमान वाटत असावा. सध्या कोणत्याहि आजार झाला तर आपला मृत्यू जवळ आला असे त्यांना वाटते. ‘ संयुक्त महाराष्ट्र ’ चळवळीच्या सुरवातीपासून त्यांच्या पायात कळा मारावयास सुरवात झाली. गेल्या आक्टोबरांत (१९६६) त्या कळा वाढूं लागल्या. अशक्तपणाही वाढूं लागला. भाईजी अस्वस्थ झाले. एकदा त्यांनी मला स्वतः बरोबर घेतले आणि घरांत फिरवून कोणती पुस्तकें व इतर बाबीं कोठे आहेत त्या दाखवून त्यांची पुढेमागे कशी विल्हेवाट लावावयाची ते पुन्हां पुन्हां बजावून सांगू

लागले. त्यांच्या एकंदर बोलण्यावरून त्यांना होणाऱ्या यातनामधून मुक्त होण्याकरितां कोणत्या तरी मार्गाचा अवलंब करण्याचा त्यांचा विचार असावा असे वाटले. मला भडभडून आले. मी म्हणालो, " भाईजी, बंद करा पाहूं तुमचं. मी हे पहाणार नाहीं आणि ऐकणार नाहीं." आणि मी विचारलं, " हे मला सांगून तुम्ही कुठे निघालात ? " थोडे भावनावश होंऊन ते म्हणाले, " सगळं संपलं आता. मला कधी मृत्यु येईल हे सांगता येत नाहीं. मी आज ना उद्या..... " मला पुढचं ऐकवेना मी झटकन बाहेरच्या खोलीत जाऊन बसलो.

खरोखर पुढे महिनाभरातच भाईजींचा आजार अतिशय वाढला. मृत्यूचा कर्दनकाळ त्यांच्य अवती भोवती घोटमळू लागला तरी ही या थोर सच्चा समाजसेवकावर झडप घालण्याचीं त्या मृत्यूलाही छाती झाली नाहीं. हळूं हळूं आपला पाय काढता घेऊन तो पळून गेला.

त्यांचा शेवट सतत त्यांच्यासमोर त्यांना दिसत असल्यानें की काय त्याच्यातून द्वेषाच्या अंहमन्यत्वाच्या भावना नाश पावत असून मन विकास पावत आहे व अंतकरण शुद्ध आणि विशाल रूप घेत आहे सर्वांना जवळ घ्यावे, कोणाच्याही भावना दुखवू नयेत असं त्यांना वाटतं, यामुळेच गेली वीस वर्षे त्यांच्यापासून अलग असलेले त्यांचे एकनिष्ठ सहकारी दे. भ. रत्नापा कुंभार यांना त्यांनी आपल्या प्रेमानें आकर्षित केले.

सध्या त्यांची मनःस्थितीं राजकारणच्या बाबतीत निवृत्तोची दिसत असली तरी अधूनमधून त्यांत भाग घेतल्याविना त्यांना रहावत नाहीं. ते जीवनाच्या उतरतीला पुन्हां मूळमार्गावर असलेले दिसतात. आता केंव्हांही भाईजींना पाहिलं तर मोकळ्या वेळांत बाजूच्या खुर्चीत बसून आपल्या आवडत्या चित्रांकडे टक लावून पहाण्यांत

रमलेले व त्या त्या वातावरणांत दंग झालेले दिसतील, तर कधी लेखनाच्या लहरीने त्यांची पक्कड घेतलेली दिसेल. पुस्तकरूपाने प्रसिद्ध न झालेल्या उत्कृष्ट ध्येयवादी शेंकडो लघुकथा आज त्यांच्या संग्रही पहावयास मिळतील. सतत लिहीत रहाणें हा त्यांचा छंद !

भाईजी वयाने वाढत असले, त्यांच्या शरीरात वयानुरूप बदल घडत असले तरी त्यांचं मन आहे तसं अगदी कोवळं नि भावनाशील आहे. कोणत्याहि गोष्टीचा त्यांच्यावर झटकन् परिणाम झालेला दिसून येईल. क्षणांत आनंदानें लहान मुलासारखे चेकाळतील, तर क्षणांत दूःखानें घायाळ होतील. चिडले तर त्यांचे त्यांना भान राहणार नाहीं, पण राग उतरतांच हिमवत् शांत होतील. सत्यप्रिय भाईजींना असत्य कधीहि खपणार नाहीं. स्वतःवर प्रेम करणाऱ्या व्यक्तिला ते आपल्या निर्मळ आणि मधूर प्रेमसागरांत बुडवून टाकतील.

जर मला कोणी विचारले,

"कुंचला आणि लेखणी रंजल्या गांजल्यासाठीं झिजविणारे कलावंत लेखक, घशाला कोरड पडेतो ज्ञानामृत देऊन लोकांत नव-चैतन्य निर्माण करणारा असाधारण वक्ता, सत्तेपासून दूर राहून निःस्वार्थपणें समाजसेवा करणारा, ध्येयवादी ज्वलंत जीवन जगणारा, सामान्यांचा असामान्य सच्चा राजकीय नेता कोण ?"

तर मी चटकन् उत्तर देईन—

"आमचे भाईजी !"

❋ ❋ ❋

△ मराठा मंडळाची सभा

## श्री. माधवराव बागलांचे भाषण

*( श्री. बागल यांचे लहानच पण तत्वशुद्ध व उत्कृष्ट युक्तिवादाने भरलेले असे परिणामकारक भाषण झाले. – ज्ञानप्रकाश )*

ते म्हणाले—

' आपला जन्म स्वतःपुरताच अगर कुटुंबापुरताच नसून दुसऱ्या करता, समाज बांधवाकरता आहे याची जाणीव ठेवून, स्वतःच्या फायद्यापेक्षा समाजाच्या कल्याणाकडे जास्त लक्ष देणाऱ्यांचा भरणा आपल्या समाजात जास्त व्हावा या उदात्त हेतूनें आपण ही संस्था काढीत आहात असे मी मानतो. हा उद्देश सफल व्हावा म्हणून आरंभीच आपण

अशी काळजी घेतली पाहिजे कीं तुमच्या आमच्या सारख्या सुशिक्षित व सधन झालेल्या

> मराठा वर्गातील ब्राम्हण व सावकार यांची सुखे वाढण्याकरितां व धनिकांच्या धनात आणखी भर घालण्याकरता ' मराठा मंडळाने ' प्रयत्न करावयाचे नसून गरीब कष्टाळू मराठ्याना उन्नत स्थिती आणण्याची व सर्वांमध्ये खरी समता उत्पन्न करण्याची पराकाष्टा केली पाहिजे.

मोठ्या लोकांच्या फायद्याकरता व नफेबाजीकरता कोणतेही दुकान अगर स्टोअर या संस्थेच्या आश्रयाखाली न निघेल अशी खबरदारी या संस्थेने घेतली पाहिजे.

आपल्या समाजांत एक श्रीमान् सुशिक्षित वर्ग जीवित्त सरोवराच्या पाण्यावर अतिशय सुखानें पोहून क्रीडा करीत आहे. तर दुसरा रात्रंदिवस काबाडकष्ट करीत असताहि कर्जबाजारी अडाणी अशिक्षित व अन्नास महाग होऊन जीवित समुद्रांत गटंगळ्या खात बुडत आहे.

या खालच्या थरातील बुडत्या बहुसंख्य समाजास वर काढणे हे आपले कर्तव्य आहे.

आपण एक मोठी व्यापारी कंपनी कांही थोडे श्रीमानांचे शेअर घेऊन काढणार आहांत असे कळते. त्या संबंधी माझी सूचना एवढीच कीं १०।२० भांडवलवाल्यांच्या मालकीची ही कंपनी असू नये.

आपल्यातील सामाजिक विषमतेत अधिक भर घालण्यास ही संस्था कारणीभूत होऊ नये. समाज सेवेचे अवडंबर करून श्रीमंत चालकांनी आपला फायदा करून घेण्याचे कार्य साधले असा बोल

न येईल अशी काळजी घेतली पाहिजे. बहुजन समाजाचे हित संवर्धन करणे इकडेच मंडळाने मुख्य लक्ष ठेवावे.'

> या भाषणाविरुध्द शिक्षणाधिकारी ........ यांनी आक्षेप घेऊन बागलांचा उच्च ध्येयवाद निरुपयोगी व आपल्यास असंमत आहे असे सांगितले.

सभेनंतर मराठा मंडळाच्या कार्यकारी मंडळाची निवड झाली.

◆ ◆ ◆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम ४४०९१ वि: निबंध
क्रमांक ९८३० नों दि: २५/११/८८

वाळवे तालुका शेतकरी परिषद ( बोरगांव )

**अध्यक्ष विठ्ठल रामजी शिंदे**

**स्वागताध्यक्ष माधवराव बागल**

*यांचे भाषण. १४-६-३१*

( ज्ञानप्रकाश )

ही परिषद भरवण्याचा मुख्य उद्देश तालुक्यांतील कष्टाळू शेतकरी वर्गाची संघटना करावी व कॉंग्रेसशी सहकार्य करावे हा होय पण त्याचवेळीं सर्वस्वी कॉंग्रेसवर अवलंबून न राहता स्वतःच्या हर एक बाबीचा बिचार करून त्या अडचणी सोडवण्याचा प्रयत्न करावा हा आहे.

कष्टाळू वर्ग मग कोणत्याहि जातीचा असो त्याने एकजीव झाल्याखेरीज त्याचे हलाखीचे दिवस संपणार नाहीत.

हा अफाट वर्ग हक्कासाठीं उभा राहिला म्हणजे आज श्रीमंत वर्गाला अनुकून असलेले कायदे तो एका क्षणात बदलून घेईल. त्याच्या ताकतीची जाणीव त्याला अद्याप आलेली नाहीं.

धार्मिक भोळेपणा, आर्थिक विषमता व पारतंत्र्य या गोष्टी-मुळें शेतकरी हा सर्वात हैराण झाला आहे.

बसल्याजागी सावकारांना पोसणारा, पुढारलेल्या वर्गांना वस्त्र पांघरुणे पुरविणारा, सुशिक्षितांना जगविणारा हा वर्ग मात्र स्वतः उपाशी आहे.

याने हात आखडले तर वरच्या वर्गाची धडगत नाही. पण आज धन्याला कण्या व आळशाला मलिदा अशी स्थिती झाली आहे.

स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर शेतकऱ्यालाही स्वातंत्र्याचे सुख लागलीच मिळेल असे सांगता येणार नाहीं.

स्वतंत्र म्हणून समजले गेलेल्या पुष्कळ राष्ट्रातहि अद्याप कष्टाळू वर्ग गुलामगिरीतच आहे. भयंकर श्रीमंती व भयंकर गरीबी असलेल्या देशांत स्वातंत्र्याचा फायदा भांडवलवाल्यांच्याच गळी उतरलेला आहे.

हिंदुस्थानला जर स्वातंत्र्य मिळाले पण शेतकऱ्यावर सरकारी डोईजड सारा व अप्रमाणशीर जमीनदारी खंड कायम राहिला, सावकारी फास व वकीली पकड ढिली पडली नाहीं तर ते स्वातंत्र्य सुखवस्तु वर्गाच्या म्हणजे बिनकष्टाळू वर्गांच्याच फायद्यात पडणार आहे. गोरी नोकरशाही जाऊन काळी भांडवलशाही स्थापन करणें हा

स्वराज्याच्या चळवळीचा हेतू नाहीं. आर्थिक समता हाच एक त्याला उपाय आहे. स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याप्रमाणें जर कायद्यात बदल घडून आला तरच शेतकरी सुखी होईल. त्या जाहीरनाम्यातील सर्व गोष्टी तंतोतंत पदरी पाडून घेण्यासाठीं शेतकऱ्याने आतापासूनच तयारीस लागले पाहिजे.

पोट भरण्याइतकाहि जमिनीचा तुकडा ज्यांच्या ताब्यांत नाहीं. त्यांचा सारा माफ झाला. सावकार व जमिनदारावर जादा कर बसून, त्या कराचा फायदा गरीब शेतकऱ्याला मिळू लागला. गिरणीचा मालक व मजूर दोघेही फायद्याचे धनी झाले तरच हिंदुस्थान सुखी होईल.

गरीबांचे दारिद्रय नाहींसे करण्यातच श्रीमंत वर्गाचे कल्याण आहे हे समजून वागण्यातच खरा दूरदर्शीपणा आहे. याच धोरणानें यापुढें सावकारानीं व क्रेडिट सोसायटचानीं पैसे देतांना धोरण ठेवले पाहिजे.

दुसऱ्याच्या मदतीची वाट न पाहतां गावचा सर्व कारभार शेतकऱ्याने आपल्या हातीं घेण्यास आतांपासून लागले पाहिजे.

ग्रामपंचायत हीच स्वराज्याची खरी शिकवण आहे.

त्याला इंग्रजीची आवश्यकता नाहीं. आपल्या घरचा कारभार करता येतो.

शेतकऱ्याने पूर्ण स्वावलंबी झाले पाहिजे. शेतावर निघणाऱ्या धान्यात घरचे पोट भागले, शेतावरच्या कापसात कपडयांची गरज स्वतः सूत काढून भागवता आली. न्याय निवडा गावातल्या गावांत झाला लग्नापायी किंवा धार्मिक बाबतीत होणारे अनाठाई खर्च

आवरले, कष्ट करणाऱ्याला खात्रीचा आधार झाला म्हणजे शेतकरी सुखी राहू शकतो. त्याला पैशाचे ढीग रचायचे नसतात.

वरील सर्व गोष्टीचा विचार करून पुढे कार्यक्रम कसा ठरवावा याचा परिषदेत खल व्हावा. निश्चित कार्यक्रम आखून कामास सुरवात करावी हाच परिषदेचा हेतू आहे.

◆ ◆ ◆

ज्ञानप्रकाश
८-८-१९३१, पुणें.

*गांधी सप्ताहांत–*

# भाई माधवराव बागल यांचे भाषण

पुणें युवक संघाच्या गांधी सप्ताहाच्या शेवटच्या दिवशीं रे मार्केटच्या पटांगणांत डॉ. पळसुले यांच्या अध्यक्षतेखाली श्री. माधवराव बागल यांचे व्याख्यान झाले. ( दिनकरराव जवळकर हेहि बोलणार असे जाहीर झाले होते. )

श्री. माधवराव बागल यांचे भाषण–

मी स्वतःला सत्यशोधक म्हणवितो. तुम्ही सर्व ब्राम्हण, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन सत्यशोधकच आहांत असे मी मानतो.

सत्य कोणाला नको आहे ?

आज मी कोणत्याहि पक्षाचा सभासद म्हणून बोलत नाहीं. मी कोणत्याहि पक्षाचा सभासद नाहीं. तेव्हां मला डिसमेंबर होण्याची भिती नाहीं. मी स्वतंत्र मनुष्य आहे--

हिंदुस्थानांत आज फार लाथाळी सुरू आहे. हिंदू म्हटलं तर मुसलमान चिडतात. ब्राम्हण म्हटलं तर ब्राम्हणेतर डोळे फाडतात. आर्यसमाजी म्हटलं तर सनातनी गुरगुरतात !

आज ही सर्व लाथाळी गुंडाळून ठेवून आपणां सर्वांवर एक-समयावच्छेदेकरून आलेल्या संकटास तोंड देण्यास तयार होणें हे आजचे पहिले कर्तव्य आहे. आजचे आपणां सर्वांचे ध्येय एकच आहे.

स्वातंत्र्य–

देशाला आग लागली असता आपल्या पोळीवर तूप ओढण्यास नादी लागून सर्वनाश ओढवून घेऊ नका.

ब्राम्हणेंतरांनी स्वराज्यास भिण्याचे मुळीच कारण नाहीं. आमच्याच खटपटीनें स्वराज्य मिळाल्यानंतर ब्राम्हण म्हणजे कोण्या झाडाचा पाला !

ब्राम्हण अंमल गाजवतील ही गोष्ट सोडा जे अनत्याचाराने इंग्रजांना स्वराज्य द्यावयास लावतील त्यांना ब्राम्हण जड आहेत काय ?

एका फुंकीसरसी उडवून लावू. तेव्हां आपण मिळवलेले स्वराज्य ब्राम्हण घेतील ही भीतीच सोडा.

आता हे भेदभाव विसरून जा.

ज्याला जी देशसेवा शक्य होईल ती त्याने करावी. हिंदुस्थान आर्थिक स्वतंत्र झाला पाहिजे हे ध्येय सर्वांच्या डोळ्यापुढे असलेच पाहिजे.

पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र या प्रत्येकाच्या अत्यंत जरुरीच्या गोष्टी आहेत. तेवढ्या मिळवण्या पुरते तरी एक व्हा.

महात्माजी खरे सत्यशोधक आहेत. ते खरे हिंदी आहेत. मी हिंदी आहे एवढा तरी नुसता अभिमान मनात बाळगा.

मी हिंदी आहे ! हिंद देश माझा आहे. एवढे म्हणत प्राण गेला तरी धन्यता वाटली पाहिजे.

हा देश माझा आहे त्या करिताच मी जगणार एवढे जरी तुम्ही म्हणालात तरी पुष्कळ आहे.

( नंतर हिंदुस्थानच्या पूर्व परंपरेचे व संपन्नतेचे रसभरित वर्णन केले. ते म्हणाले )

ज्या वेळीं आमची संस्कृती ऐश्वर्याच्या कळसास पोचलेली होती त्यावेळीं युरोपियन संस्कृति पाळण्यात खेळत होती. ते लोक रानावनात भटकत होते, अन् त्यावेळी आमची साम्राज्ये स्थापली जात होती. अशी ही त्यावेळची पोरे आम्ही आज स्वराज्याला लायख नाहीं म्हणून मोठ्या दिमाखाने आम्हास सांगत आहेत याचे काय ? आपल्या हाती आर्थिक बळ नाही हेच याचे कारण !

मोंगल राजवटींत जुलूम झाला असेल पण त्यावेळी आमचे धंदे मारले गेले नव्हते.

आमचा पैसा आमचे जवळ रहात होता. कामकऱ्यांना पोटभर अन्न मिळत होते. ती परिस्थिती आज राहिलेली नाहीं.

डाक्याची मलमल तर जग प्रसिद्ध. इटली इंग्लंड या देशाना येथून कापड पुरवले जात असे तेव्हां त्यांना प्रतिबंधक कायदे पास करावे लागले. हिंदी सुताचा हात रुमाल वापरल्याबद्दल एका इंग्रज बाईस त्यावेळीं २०० पौंड दंड झाला होता.

आज आमची इतकी हीनावस्था झाली आहे, आमच्या प्रेतावर घालण्यासाठींसुद्धा विलायती मांजरपाटच ( मँचेस्टरचे कापड ) आणावा लागतो.

आतां यावर तोड म्हणजे महात्माजीनीं काढलेला सोपा उपाय–

स्वदेशी व खादी !

गिरणीचे कापडाने गिरणी मालकच श्रीमंत होतो. मजूर उपाशी मरतो.

> खादीने रुपयाचा प्रत्येक भाग निव्वळ देशातच नव्हे तर आपल्या गावात अन् आपल्या घरात राहतो. राजकीय सत्ता येण्याची त्याला आवश्यकता नाही. कायद्याची आवश्यकता नाही.

केवळ आपल्या हातची गोष्ट ! सरकार याला आड येऊ शकत नाही. स्वातंत्र्याची वाट पहात बसावे लागत नाहीं.

हिंदुस्थानांत १० कोटी लोकाना तीन महिने काम मिळत नाही. म्हणजे अडीच कोट लोकाना वर्षभर अर्धवट उपासमार सोसावी लागते. ही उपासमार टाळण्यासाठी महात्माजीनी चरख्याचा उपाय सांगितला आहे. त्याना चरख्यामुळे रोज दोन अडीच आण्याची मिळकत होईल व वर्षाकाठी ४५ कोटी आपल्या देशातच रहातील. पण हे सर्व तुम्ही खादी वापराल तर.

### विधवा व चरखा

विधवाना तर चरखा हा परमेश्वरच होय.

विधवावर ईश्वर कोपतो, त्याबरोबर आमचा समाजहि कोपतो. त्याना चरखा ही समाधानाची जागा ठरेल. चरखा चालवल्याने त्याना आपल्या दुःखाचा विसर पडेल. त्यात त्या तन्मय झाल्या की त्याना जगाचाहि विसर पडेल. वर्डस्वर्थ व गटे या थोर कविद्वयानी आपल्या अमर काव्यातून चरख्याची महति वर्णिली आहे. दरिद्री अस्पृश्य समाजाला चरखा जिवाचा आधार वाटेल.

### परदेशी कपडा

तुमच्या जवळ परदेशी कपडे असतील. ते फाटण्याची वाट पाहू नका. ते जाळायला झाले नाही तर घडया पेटीच्या तळाशी ठेवा व स्वराज्य मिळाल्यानंतर बाहेर काढा.

यानंतर श्री. काशिनाथबुवा पाषाणकर यांचे भाषण होऊन त्यानी बागलांचे अभिनंदन केले.

◆ ◆ ◆

महाराष्ट्र साहित्य संमेलन
अधिवेशन १७ वे १९३२

स्वागताध्यक्ष– ग्रंथप्रदर्शन मंडळ

## माधवराव खंडेराव बागलांचे भाषण

संमेलनाकडून आज जे ग्रंथप्रदर्शन भरण्यात येत आहे त्याचा उपयोग साहित्य सेवकाना तर आहेच, पण अशिक्षित प्रेक्षकांनाही त्याचा फायदा मिळण्याजोगा आहे. ओझरत्या दृष्टिक्षेपानेसुद्धां पुष्कळ गोष्टी समजून येणार आहेत.

प्रदर्शनात निरनिराळे विभाग आहेत. ग्रंथ, नियतकालिके, हस्तलिखिते, मासिके, वर्तमानपत्रे असे विभाग आहेत.

ग्रंथप्रदर्शन या विभागाकडे प्रथम लक्ष टाकू.

प्रदर्शन पाहिल्याबरोबरच ग्रंथांची संख्या एकदम दृष्टीसमोर येते. यामुळे गेल्या दोन सालातील मराठी भाषेतील वाङ्मयाची सर्व साधारण प्रगती कळून येईल.

यानंतर विभागात फिरू लागल्याबरोबर निरनिराळी पुस्तके दिसून येतील. कोणत्या रंगाचा परिणाम अधिक होतो, कोणता रंग प्रथम आपले आकर्षण करतो हे समजेल. पुढे बहिरंग नटवण्याची प्रवृत्ती कशी आहे, बांधणी साधी आहे की भपकेदार व खर्चाची आहे, सचित्र आहे कीं साधी आहे, एक रंगाची आहे कीं तीन रंगाची आहे, हे पाहता पाहता दिसून येण्याजोगे आहे. हे परीक्षण इतर धंदेवाल्याना, बायंडर, चित्रकार प्रकाशक याना फार उपयोगी आहे

यानंतर सर्व साधारण पुस्तकांचा आकार कसा आहे, छोटी पुस्तके जास्त निघत आहेत की मोठे ग्रंथ जास्त निघत आहेत, की पॅम्प्लेट्स प्रसिद्ध करण्याकडे अधिक प्रवृत्ती आहे हे दिसून येईल.

पुस्तकाच्या पानाच्या मानाने किमती कशा आकारल्या जातात, कागदाचा परिणाम किमतीवर कसा होतो, टाइपमुळे त्यात कसा फरक पडतो, टाइप कोणचा वापरण्याकडे अधिक प्रवृत्ती आहे, हे पाहिल्यानें टाइप व कागद कसा वापरावा, त्या मानाने किंमती कशा ठेवाव्यात याचा अदमास सापडण्याजोगा आहे. तसेच पुस्तकामध्यें केव्हां केव्हां आवृत्तीच्या प्रतीचा आंकडा पाहण्यास मिळतो. जास्त प्रती काढणे बरे कीं वाईट व साधारणपणें प्रकाशक काय करीत असतात या गोष्टी लेखक व प्रकाशक या दोघानाही समजणे अवश्य आहे.

एकंदर संख्या बहिरंग बांधणी, आकार, कागद, टाइप या गोष्टी पाहणे साहित्यसेवक नसलेल्यानाही मनोरंजक वाटणार आहेत.

यापुढे कांहीं गोष्टी साहित्यसेवकाना मार्गदर्शक अशा मिळतील.

साहित्यात कोणत्या भागात विशेष भर पडत आहे, राजकीय, धार्मिक, सामाजिक, आर्थिक यापैकीं कोणत्या विषयावर संख्या अधिक आहे, देशसेवा की मनरंजनाकडे, पैसा मिळवण्याकडे, की मतजागृतीकडे साहित्याचा कल आहे, कादंबऱ्या, नाटके जास्त आहेत की शास्त्रीय व भारदस्त विषयाकडें ओढा जास्त आहे; पुस्तकाचीं नावें आतील मजकुराचा अर्थबोध करणारी आहेत की निव्वळ जिज्ञासा उत्पन्न करणारी आहेत, लेखक स्वत: किती प्रकाशक आहेत, साहित्य सेवक विशेष कोणत्या प्रांतात जास्त आहेत, संस्थाने व खालसा मुलुख यात प्रमाण कसे आहे, परिस्थितीचा परिणाम विचारावर कसा होत आहे, साहित्यसेवकास अनुकूल परिस्थिती व सहानुभूती संस्थानांत अधिक मिळते की ब्रिटिश मुलखात अधिक मिळते, स्वतंत्र विचाराला पोषक ठिकाण जास्त कोणचे, सद्य:स्थितीचा परिणाम साहित्यावर कसा होत आहे, धनिकाचा आश्रय साहित्यसेवकाना मिळतो काय, सार्वजनिक संस्थेकडून सामुदाइक वाङ्मय काही निर्माण होत आहे काय, चरित्रे कुणाची लिहिली जात आहेत, खऱ्या गुणाची चीज होत आहे की श्रीमंतांचाच गुणगौरव व अवास्तव स्तुती होत आहे, या गोष्टी ग्रंथांची पाने न चाळता अजमावता येण्याजोग्या आहेत. भलत्या दिशेकडे वाङ्मयसेवा बहकू लागल्यास साहित्यसेवकांना इषारा द्यावा लागेल. साहित्यसेवक हें पैशाचे गुलाम होता कामा नयेत. तसें झाल्यास आपण भावी पिढीचा मोठा गुन्हा केल्यासारखे होईल. लेखणी अव्यभिचारी राहील अशी खबरदारी खऱ्या साहित्यसेवकाने घेतली पाहिजे; कारण आजच्या वाङ्मयाचा भावी पिढीवर परिणाम होणार आहे. त्या भावी पिढीची जबाबदारी आपल्यावर आहे हे केंव्हाही विसरता कामा नये, साहित्यसेवकाचे ध्येय पैसा हे नाही. सेवा हे आहे. नवी संस्कृती निर्माण करणारे हे साहित्यसेवकच आहेत.

हस्तलिखित मासिके यांच्या प्रदर्शनाचा फायदा विद्यार्थीवर्गास फारच आहे. याने छोटे छोटे साहित्यसंघ निर्माण होऊन साहित्याची

गोडी लहानपणातच लागते. या मासिकात, वळणदार अक्षर, सुंदर मांडणी व चित्रांची गोडी लागते. या मासिकात बहुशः चित्रे असतात. साहित्यकला व चित्रकला या अगदी सख्या बहिणी आहेत. ज्या कुंचल्यातून उदात्त व सुंदर कल्पना रेखाटल्या जातील, त्याच हातातून सुंदर साहित्य निर्माण होणे फार जड नाही दोन्हीही भावनेचेच खेळ आहेत. ज्याला भावना नाहीत, सुंदर देखाव्याने, हृदयद्रावक प्रसंगाने, ज्यांचे अंतःकरण थरारत नाही, तो चित्रकार होणार नाही, तसाच वाङ्मय विशारदही होणार नाही. तेव्हां लहानपणी चित्राची गोडी लागली तर त्याचे साहित्यातही रूपांतर सहज होऊ शकेल. साहित्य व चित्रकला यांचा संबंध फार निकटचा आहे इंग्लंडचे वाङ्मय-विशारद रस्किन, हिंदुस्थानचे कविसम्राट रविंद्रनाथ टागोर, हे उत्तम चित्रकार म्हणूनही नावाजलेले आहेत. कांहीं बाबतीत साहित्यापेक्षा चित्रकला श्रेष्ट आहे, तिचा व्याप मोठा आहे. साहित्याला भाषेची मर्यादा आहे, त्या प्रांतात किंवा त्या देशातच तिचा उपयोग जास्त आहे. पण चित्रकलेची भाषा अखिल मानव जातीची आहे. ती सुशिक्षितांची आहे तशीच अशिक्षिताची आहे. गेल्या लढाईच्यावेळी चित्रांचा फारच उपयोग करून घेण्यात आला. त्यासाठी खास एक खाते उघडले होते. अज्ञजनसमुदायात चित्राने जागृती उत्पन्न करता येते. हिंदुस्थानांत अद्याप या कलेचा असा उपयोग केला जात नाही. तेव्हां लहान मुलास या दोन्ही साहित्य भगिनीची ओळख होण्याला व त्याजवर प्रेम जडण्याला हस्तालिखित मासिकांचा फारच उपयोग आहे. आनंदाची गोष्ट की आज अशी मासिके प्रदर्शनात बरीच आली असून त्यातील बरीच प्रशंशा करण्याजोगी व उत्तेजन देण्याजोगी आहेत

वर्तमानपत्रे हे विचार जागृतीचे फार मोठे साधन झाले आहे. याचा उपयोग तसा दुरुपयोगहि होत आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांत श्रीमंत वर्गाने ही साधने विकत घेऊन आपल्या सेवेस लावली आहेत. ही वर्तमानपत्रे ज्या मानाने जास्त निघतील त्या मानाने

मतजागृती होत आहे एखाद्या वर्तमानपत्राचे धोरण काय आहे हे पान उघडल्याबरोबर समजून येण्याजोगे असते. त्यातील फोटो, त्यातील चित्रे बातम्या व लेख, एकाद्या अंकांतला जरी दृष्टिसमोर आला तरी तेवढ्यानें हे राष्ट्रीय धोरणाचे आहे, जातिविशिष्ट की पोटार्थी 'जी हाँ' करणारे आहे, ते समजून येते. अशी पत्रे म्हणजे देशाचा ऱ्हास होय. पैशासाठीं देहविक्रय करणाऱ्या वारयोषिता आणि पोटासाठीं लेखणी गहाण टाकणारे संपादक यात फार अंतर नाही. या प्रदर्शनात चांगल्या वाईटाची निवड आपल्यास करता येईल व हा व्यभिचार बंद पाडण्याला काही उपाय करता येईल की काय याचाहि विचार करता येईल. लेखकाच्या आर्थिक परिस्थितीचा, त्याच्या लिखाणावर परिणाम होत असतो आणि नाइलाजानें पोटासाठीं त्यांची लेखणी विकली जाते. यावरून होतकरू साहित्यसेवकांच्या पोटाचा प्रश्न संघशक्तीनें हलका करणें देशोन्नतीच्या दृष्टीनें किती महत्त्वाचे आहे ते कळून येईल.

वर्तमानपत्राचा उपयोग मतजागृतीकडें होतो तसाच साहित्यसेवक निर्माण करण्याकडेहि होतो. वर्तमानपत्राच्या संपादकीय मंडळावर काम करणाऱ्याला लेखनाची नियमित संवय लागते. वेळच्या वेळी ठराविक मजकूर बाहेर निघालाच पाहिजे,यामुळे खात्रीचे लेखन बाहेर पडते. ही विचार मांडणीची एकदा सवय लागली व त्याला अध्ययनाची जोड मिळाली कीं त्यातूनच ग्रंथकार निर्माण होतो, निदान निर्माण होणे फार सोपे जाते. तेव्हां वर्तमानपत्राची वाढ म्हणजे साहित्य सेवकाची वाढ असें म्हणणेही फारसे वावगे होणार नाहीं.

वरील विचारांना प्रदर्शनानें चालना मिळून इतर संशोधनालाहि सुरवात होईल. योग्य मार्ग काढता येईल.

◆ ◆ ◆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४४०७९ विः निबंध
क्रमांक १६३० नोंद दि. १५/११/७८

वसंत व्याख्यानमाला पुणे

व्याख्यान २६ वें (ता. १९ मे १९३३)

# बेकारीचे मूळ चर्चेचा समारोप.

व्याख्याते- श्री. माधवराव खंडेराव बागल, कोल्हापूर.

अध्यक्ष- प्रो. शं रा. भागवत, एल. सी. ई.

व्याख्याते ह्मणाले-

बेकारीचें मूळ हा आजचा विषय आहे. आज समाजाला लागलेला, बेकारी हा एक मोठ्यांतला मोठा रोग आहे, व तो सारखा बळावत आहे. हा प्रमाणाबाहेर गेला कीं, यांत सर्वांचीच आहुती पडण्याचा संभव आहे.

Speak not of liberty; poverty is slavery स्वातंत्र्याला, स्वराज्याला, संस्कृतीला, स्वाभिमानाला, व मनुष्याच्या सर्व उच्च गुणाला खाऊन टाकणारा हा महाबलवान रोग आहे. म्हणून या रोगाचें मूळ शोधून तें काढून टाकण्याकडे सर्व शक्ति एकवटली पाहिजे; त्याखेरीज बरचे सर्व उपाय व्यर्थ आहेत.

बेकारी हा रोग एका संस्थानपुरता, प्रांतापुरता किंवा एकाच देशापुरता आतां राहिलेला नाहीं.

जगाच्या कोनाकोपऱ्यांत बेकारी शिरूं लागली आहे. बेकारी दरिद्री हिंदुस्थानात आहे तर ज्यांच्या साम्राज्यावर सूर्य मावळत नाहीं त्या सम्राटांच्या ऐश्वर्यसंपन्न राजधानींतहि आहे. निसर्गाची कृपा

असलेल्या चीन राष्ट्रांतहि आहे. तर निसर्गावर स्वामित्व बसवलेल्या व कुबेरांनी भरलेल्या अमेरिकेंतहि आहे. या बेकारीच्या रोगाने आज कोणताही देश सोडलेला नाहीं. यांत्रिक शोधाची परमावधी झाळी. उत्पादन हजारो पटीनें वाढलें पण यंत्र साधनांनीं बहुसख्य जनतेचे काम हलके झालें नाहीं. उत्पादन वाढूनही बेकारी नाहीशी झाली नाहीं. संरक्षक जकाती भरपूर वाढल्या तरी बेकारी आहेच. खुला व्यापार ठेवला तरी बेकारी आहेच. देशांत पैशाला ऊत आला; धदे, गिरण्या वगैरे हजारों कारखाने वाढले तरी बेकारी आहेच. अशिक्षितांत आहे. तशीच सुशिक्षितांतही बेकारी वाढत आहे. संपत्ति अलोट आहे. धनधान्य, अन्नवस्त्र विपुल आहे, सुख साधने वाढली, दळणवळण वाढलें, पण पोटाची वानवा आहेच !

बेकारी म्हटल्याबरोबर त्याची दुसरी बाजू श्रीमंतीचीहि डोळ्यासमोर उभी राहते. गरिबी व श्रीमंती ही विषमता समाजांत का उत्पन्न व्हावी ? या विषमतेचें कारण काय हें सापडलें, व ही विषमता कसकशी वाढत गेली हें समजलें म्हणजे बेकारी नष्ट करण्याचा उपाय शोधून काढतां येईल.

शेतकरी, मजूर व बेकार या बेकारांच्या अवस्था आहेत. बेकार हा मजुरांचा भाऊ. मजुरांची नोकरी गेली म्हणजे त्याला बेकारी येते. मजूर हा शेतकऱ्याचा भाऊ. शेतीचा आधार तुटला कीं त्याला मजूर व्हावें लागतें. मजुरी न मिळालेला व कामावरून काढून टाकलेला मजूर म्हणजे बेकार शेतकरी. मजूर व बेकार यांचे नातें हें असें आहे. यांचा विरोधी वर्ग जमीनदार, सावकार व भांडवलवाला हा होय. दोन अनिष्ट वर्ग समाजांत उत्पन्न झाले आहेत. ही सत्ता गाजवण्याचें साधन त्याला कसें मिळालें हें समजलें म्हणजे ही विषमता काढून टाकण्याचा मार्गहि सहजच सांपडणार आहे. या दोन वर्गांत उपजत तेढ आहे असें नाहीं. मनुष्य जात स्वभावतःच लढाईप्रिय नाहीं; ती सहवासप्रिय आहे.

सहकार्यावरच मनुष्यजातीनें आपली संस्कृती निर्माण केली आहे. पण समाजांत आज संस्कृति विघातक अशी वृत्ति निर्माण झाली आहे. याकरितां समाजांत विषमता कशी वाढली हें आपल्याला पाहिलें पाहिजे.

कुठल्याही देशांतला समाज घ्या, ज्यावेळीं चार लोक वस्तीसाठीं ठिकाण शोधूं लागतात त्यावेळीं ते सुपीक जमीन शोधतात. प्रथमच्या लोकांना सुपीक जागा मिळाली तर मागाहून येणाऱ्या सर्वांना तशी ती मिळत नाहीं पण सहवास, दळणवळण, व्यापार वगैरे सोईसाठीं लोक एकमेकांजवळ राहिले. त्यांच्या जमिनीच्या कसाप्रमाणें त्यांच्या उत्पन्नांत फरक झाला. पुढें गरीबी श्रीमंती वाढू लागली. उत्तम जमिनीचा मालक पुढेंपुढें आपल्या जमिनी दुसऱ्याला खंडाला लावून कष्ट न करतां जगूं लागला कष्टावर जगणाऱ्या म्हणजे, खंड–देणाऱ्या कुळाची स्थिती पुढें पुढें बिकट होत चालली. दुष्काळामुळे, घरच्या अडचणीमुळे किंवा इतर कांहीं प्रसंगामुळें खंड भरपाई करणें जड गेल्यास, दुसऱ्या वर्षी खंडाचा बोजा अधिक वाढून, त्यांत पुनः खंड भागविण्यासाठीं काढलेल्या कर्जाच्या व्याजाचा बोजा वाढतो. या बोजांतून त्याला डोकें वर काढणें फार जड जाते. मग त्याला स्वःताची जमीन सावकाराला द्यावी लागते. मालकीची जमीन गेल्यानें खंडकऱ्याचीही जमीन जाते, कारण तारणाशिवाय जमीनदार आपली जमीन त्याला लागणीस देऊं शकत नाहीं. अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या मालकीच्या एक एक जमिनी सावकारांच्या ताब्यांत जाऊन खालचा वर्ग दिवसें–दिवस बेकार होत चालला आहे. जमिनीच्या चांगल्या वाईट कसामुळें समाजांत अशी स्वाभाविक विषमता वाढत गेली याच विषमतेंतून बेकारीची वाढ झाली बेकारीचा हा एक प्रकार झाला.

समाजांत सरदारांची जात निर्माण झाली. आपल्या खेड्यांचे संरक्षण व दुसऱ्या लोकांवर स्वारी करण्याचे काम या सरदारवर्गानें

आपल्याकडे घेतले. अशा बलवान सरदारांना नंतर राजांकडून सन-दापत्रे मिळाली व हे लोक त्या राजांचे मदतनीस झाले.

पण पुनः या राजानें दुसऱ्या राजाला पादाक्रांत केल्यानंतर त्या राज्यांतल्या जमीनी त्यानी आपआपल्या लोकांना वाटून टाकल्या. कष्टाळू शेतकऱ्याला हुसकून लावून तेथे आपल्या आश्रितांचे व बगलबच्च्यांचे स्वामित्व स्थापन झाले. राज्याला पूर्ण स्थैर्य आल्यानंतर देशांतील बेबंदशाही नाहीशी झाली. कायदा व सुरक्षिततेचें व सुव्यव-स्थेचें राज्य सुरु झाले. यामुळे आपल्या इस्टेटीची व दिलेल्या पैशाच्या परतफेडीची श्रीमान वर्गाला सुरक्षितता वाटूं लागली. व हळूहळू शेतकऱ्यांच्या जमीनी सावकरांच्या मालकींत जाऊं लागल्या व कालेकरुन ते कंगाल झाले सरदारांनी व सावकारांनी बहुसंख्य वर्गाच्या लोकांना देशोधडीस लावले. व त्यामुळे बेकारांच्या संख्येत भर टाकली.

## राजा; धर्म व कायदा

> राजाच्या कायद्याला धर्मांचा आधार देवून त्याला देवाचा अवतार बनवला व धर्मगुरूंनी समाजांत मान्यता वाढवण्या-करितां त्यांना राजदरबारी उत्थापन मिळूं लागले त्यांची जाहीर पाद्यपूजा होवूं लागली. एकमेकांनीं परस्परांचा दर्जा वाढवून स्वतःचा स्वार्थ साधून घेतला. राजांनी धर्मगुरूंना कायमची उत्पन्ने करून दिलीं, त्यांना रक्षण दिले व धर्मगुरूनीं राजाच्या शब्दाला धर्माज्ञा करून टाकली.

त्यांत राजाच्या स्वार्थी इच्छा गोवून त्याला कायद्याचे स्वरूप दिले. नीतीच्या तत्वांत धूर्ततेनें स्वार्थ गोवल्यानें अज्ञानी जनतेवर त्याचा त्यांचे इच्छेप्रमाणें पगडा बसवतां आला. मोठमोठी मंदिरे, त्यांचे उत्सव त्यांच्या मिरवणुकी यांनी देव देवांचे दलाल यांना धार्मिक मान्यता मिळाली. स्वर्गनरकाची भीति दाखवून अज्ञानी

जनतेकडून दक्षिणेच्या नांवाखाली धार्मिक खंड वसूल करण्यास सुरवात झाली. देवाच्या नांवाखाली पुजाऱ्यांनी आपली उत्पन्नें वाढवली. इनाम गांवे मिळविली. देवाला सोन्यारुप्यांनी मढवून दाग-दागिनें साठवले. अन्नदानाच्या निमित्तानें फुकट खाऊसाठी अन्नछत्रें उघडलीं. या अन्यछत्रांनी त्या देवाचे प्रस्थ माजून भिक्षुगण ह्या त्या त्या देवांच्या वर्णनाच्या जाहिराती फडकावूं लागला.

नंतर राजांकडून राष्ट्रधनांत काडीची भर न पडता त्या धनाची बेजबाबदार उधळपट्टी होऊ लागली; मग बेकारी कां येऊं नये? असें सांगून श्री. बागल पुढें म्हणाले कीं आजच्या यांत्रिक युगांतील भांडवलवाल्याला बेकारी ही अत्यंत किफायतशीर आहे. यांची संख्या जितकी जास्त तितका भांडवलवाल्यांचा फायदा जास्त; कारण बेकारांचा भरणा वाढला कीं, मजुरांचा पगार भराभर उतरवता येतो. कारण नोकरी किंवा भीक असा प्रसंग आल्यास कितीही खडतर व कमी पगाराची नोकरी असली तरी ती त्याला पतकरणें भाग असते, यंत्राचा ताबा मालकाकडे असल्यानें पोटाचाही ताबा त्याच्याकडे जातो. ह्या यंत्राचा एक ताबा मालकाकडे गेल्यानें यंत्रातून निघणाऱ्या सर्व मालाचा ताबा त्यांचेकडे जातो. तर मजूर सुखी कसा होणार? व यांत्रिक सुधारणेच्या फायद्यानें बहुसंख्य जनता सुखी कशी होणार? हें दुर्भिक्ष यंत्राची, कारखान्यांची व जगण्यास लागणाऱ्या साधनांची मालकी जोंपर्यंत अल्पसंख्य भांडवलवाल्या वर्गाचे हाती आहे. तोपर्यंत कायमच रहाणार. जमिनदार व सावकार यांचे ताब्यांत जमीन गेल्यानें शेतकरी उघडा पडला व जगण्याच्या इतर वस्तू निर्माण करणाऱ्या गिरण्या भांडवलवाल्यांना खास फायद्यासाठी चालत असल्यानें मजूर खालावत चालला व बेकारीचे प्रमाण वाढले.

सरकारी फाळयाचे प्रमाण कुठल्याही देशांतले पाहिले व खंड व्याज व भांडवलवाल्यांचे अर्थशोषण पाहिले तर सरकारी फाळा त्या मानाने किती तरी कमी असतो.

जमिनदार, सावकार, व भांडवलवाले हे प्रत्यक्ष रयत, कूळ व मजूर यांच्या श्रमावर जगत असूनही, त्यांच्या कल्याणाची काडीचीहि जबाबदारी, कायद्यानें त्यांच्यावर लादलेली नाहीं नैतिक जबाबदारी एखाद्या व्यक्तीस वाटली तरी उत्पन्नाची साधनें जमीन, खाणी, गिरण्या वगैरे जोंपर्यंत एका वर्गाच्या हातीं आहेत तोंपर्यंत कष्टाळू जनतेचे हाल कमी होणार नाहींत व बेकारीचा रोग आवरतां येणार नाही व सामाजिक विषमता कमी होणार नाही. राष्ट्रधनाची मालकी थोड्या लोकांचे स्वाधीन असणें हें बेकारीचे मूळ आहे.

" धंदे, गिरण्या, कारखानें वाढले व भांडवलाची वाढ झाली कीं, मजूराला जास्त पगार देतां येईल. बहुसंख्य जनता सुखी होऊन बेकारी नाहींशी होईल." या विधानाचा आतां विचार करूं.

धंदे, गिरण्या, कारखाने, यांची वाढ पाश्चिमात्य राष्ट्रांत भरपूर झाली आहे.अमेरिका याबाबतीत अगदी शिखराला जाऊन पोहोचली आहे. अमेरिकेचे भांडवल जगभर पसरलेले आहे. पण अमेरिकेंत बेकारीचे प्रमाण वाढत आहे. कारखाने असून भांडवल भरपूर असून बेकारी नाहींशी होत नाही भांडवलांतून मजूराला पगार पोहोचतो ही गोष्टही साफ खोटी आहे.

भांडवल आहे म्हणून मजूराला काम मिळते हे म्हणणे सकृत्–दर्शनी खरे दिसले तरी ते वस्तुतः खरे नाही.

बँकेंतून ठेवीदाराला पैसा मिळाला म्हणजें त्यां बँकेचे ठेवीदारावर उपकार झाले असे केव्हांच म्हणतां येणार नाहीं तेव्हां हा व्यक्तिविषयक ताबा गेल्याखेरीज, समाजांतून वाढत आलेल्या संशोधनाच्या सुधारणेचा यांत्रिक प्रगतीचा व त्या साधनांचा ताबा समाजाच्या ताब्यांत आल्याखेरीज जनता सुखी होणार नाही. मनुष्यास जगण्यास लागणाऱ्या बहुतेक सर्व वस्तू जमिनीपासून काढतां येतात.

तेव्हां सर्वांना पोसणारी ही जमीन समाजाच्या सामुदायिक ताब्यांत असल्याखेरीज समाजाचे दारिद्र्य जाणे शक्य नाहीं. बेकारी नष्ट करण्याचा उपाय एकच व तो म्हणजे जनतेची जगण्याची सर्व **साधनें** जनतेच्या ताब्यांत असणें हा होय. देशांतील अर्थवाहिन्यां बरोबर वाहिल्याखेरीज बेकारीचा रोग नष्ट होणार नाही.

◆ ◆ ◆

सौंदर्य नगरी

## कोल्हापूर चित्रकला प्रदर्शन

## राजाराम आर्ट सोसायटी

उद्‌घाटक– छ. राजाराम महाराज

व्हा. प्रे. दि कोल्हापूर आर्ट सोसायटी– भाई माधवराव बागल

यांचे भाषण ५–१–३५

श्रीमत् छत्रपति महाराज

आणि बंधूजनहो–

ऐतिहासिक दृष्टया शिवछत्रपतींची गादी म्हणून, धार्मिकदृष्या दक्षिण काशी म्हणून करवीर शहराला विशेष महत्व आहेच. पण या वैशिष्ठ्याला सजावट चढवण्या–करतां निसर्गानेही आणखी वरदहस्त ठेवला आहे.

उत्कृष्ट हवा, मुबलक जलसंचय, नयनमनोहर वनराजीं आणि उद्विग्न मनाला सुद्धा उल्हासित करणारे निर्झर व सरिता, यांच्या सान्निध्यानें शहराला विशेषच रमणीयता प्राप्त झाली आहे.

निसर्गाच्या उपकारातून उतराई होण्याकरताच कीं काय मानवी कौशल्याने हीं येथे पराकाष्टा केली आहे. प्राचीन व अर्वाचीन संस्कृतीचा येथे गोड मिलाफ झाला आहे.

दोन्ही कालातील शिल्पकलेचे उत्कृष्ट नमुने या राजधानीत पाहण्यांस मिळतील. दक्षिण महाराष्ट्रात तरी शिल्पकलेच्या बाबतीत या नगरीस तोड नाही म्हटले तर मुळीच अतिशयोक्ती होणार नाहीं.

सृष्टि सुंदरीचे तर हे अत्यंत आवडते विलास भुवनच आहे.

प्रभातकालीं परमुलखांतून येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागत करण्याकरता लगबगीनें आपली शुभ्र शाल दूर करून शहर सीमेवर सदा तत्पर असलेली त्र्यंबुली देवी, त्यांच्या आगमनाची ग्वाही फिरवणारे देवालयातील घंटानाद आणि गिरण्यांच्या तुताऱ्या, उंच उंच मनोऱ्यावर व शिखरावर सहस्र रश्मीचा, सहस्र पताका. पहिल्याच दृष्टिक्षेपांत त्याचे मन आकर्षण करून घेतील.

शहरांत पाऊल टाकताच धार्मिक समतेच्या राज्यांत आपण आलांत, असे आश्वासन देण्याकरता शाहूमहाराजांची आधुनिक शिल्पकलेची कलापूर्ण भव्यमूर्ति पुढें येते व त्यानंतर एकामागून एक निरनिराळ्या शिल्पकारांचे नमुने व इमारती ठिकठिकाणी दिसू लागतात.

शहराच्या मध्यभागी प्राचीन शिल्पकलेचे सर्वांग परिपूर्ण असे महालक्ष्मीचे मंदिर, जवळच भाग्यशाली छत्रपतींचा भव्य प्रासाद त्यावर अखिल हिंदुवासियात स्वातंत्र्याची ज्योत पेटवणारा शिवबांचा पवित्र भगवा झेंडा ही सर्व दृश्यें स्फूर्तिदायी आहेत.

अशा शिवबांच्या पदस्पर्शानें पुनीत झालेल्या पुण्यमय नगरीला नटवण्याकरितां व नागरिकाना रिझवण्याकरितां निसर्गही श्रमाने

झटत आहे. कळंबा, रंकाळा, पंचगंगा, कोटितीर्थे, कात्यायनी व पन्हाळा यानी सर्व वातावरणांत सौंदर्याची भर टाकली आहे.

केवळ या एका शहरात चित्रकाराना जन्मभर गुंतवून ठेवील इतके सौंदर्य भरून आहे. पहावे तिकडे Beauty Spots सौंदर्य स्थळे विखुरली आहेत. म्हणूनच आबालाल, परांडेकर सारखे ख्यातनाम चित्रकार येथें या परिसरात निर्माण होऊ शकले.

जन्मतः मनुष्याच्या अंगी कितीही गुण असले तरी त्या गुणाची वाढ होण्याला अनुकूलता नसली तर स्फूर्ती येत नाहीं. ही वाण येथील चित्रकाराना केव्हांही भासणार नाही. एका पंचगंगेच्या घाटावर कितीतरी वर्षे पुरतील इतके देखावे आहेत. ब्रम्हपुरी तर करवीरची 'हॅम्स्टेड हीथ.' रंकाळ्यावर तर आकाश पृथ्वीचा हात धरून सदा नाचरंग खेळत असतो.

सर्व शहराभवती अशी रत्ने विखुरलेली आहेत. पण त्याला रत्न पारखी मात्र पाहिजे. जनतेला ती दृष्टी देण्याचं काम चित्रकारांच्या कलाकृतीच देऊ शकतात. लंडनच्या नागरिकाना टर्नरने तेथील धुकं दाखवलं कोशेनं, जलाशयांत बुडी मारून बुद्धाचा शांति सदेश बाहेर काढला ! आबालालनी कोनाकोपऱ्यात दडून बसलेलं ओढून बाहेर काढलं. अन् कुंचल्याच्या शस्त्रानें कागदावर पकडून ठेवलं.

या दृष्टीनें आमच्या या संस्थेचं विशेष महत्व आहे. नेहमी खालून जाणाऱ्या देखाव्यात सुद्धा सर्व साधारण मनुष्याला विशेष असे कांही वाटत नाही दिसत नाही पण त्याच देखाव्याचे चित्र त्याच्यासमोर ठेवले तर त्या जागेकडे पाहण्याची त्याची दृष्टी लागलीच बदलू शकते. त्या जागेबद्दल त्याच्यात प्रेंम उत्पन्न होते.

विद्यार्थ्यांना तरी या दृष्टींची फारच आवश्यकता आहे. निव्वळ पुस्तकी ज्ञानाने त्यांचे मन प्रगल्भ होणार नाही. निसर्गांत भरलेले ज्ञानभांडार समजून घेण्याची बुद्धी त्याच्यात उत्पन्न झाली पाहिजे. ही कलाकृतींच्या अवलोकनाने त्यांच्यात उत्पन्न होऊ लागेल. म्हणून वाढत्या विद्यार्थी सस्थेला आमच्या या संस्थेपासून फायदा झाल्या–खेरीज राहणार नाहीं. तसंच येथील निसर्ग चित्रांच्या संग्रहालयानें शहरांतील व संस्थानातील सौंदर्यस्थलांची कल्पना अगदी थोड्या वेळांत करून देता येईल.

सर्वच चित्रकार होऊ शकत नाहीत हे जरीं खरे असले तरी कलावंताच्या मनोवृत्तींची सर्वांनाच आवश्यकता असते.

> व्यापारी चढाओढीतून युद्धाच्या ठिणग्या पडतात. तर कलेच्या चढाओढीतून हृदयाची फुले उमलतात.

यांची महत्वाकांक्षा एकमेकाच्या आड येत नाहीं ती सह-कार्याची व संस्कृतीची वाढच करते आपल्या श्रमाची स्फूर्तीची फुले जगास अर्पण करून विस्खलित झालेली हृदयें जवळ आणतात. म्हणून कलावंत हे जगाचे शांतिदूत होत.

चित्रकारांत जात, धर्म, वंश हे भेद आड येत नाहीत. ते त्यांची हृदयें आकर्षण करू शकतात जिंकू शकतात. कला मानवतेची भाषा आहे.

It is an alliance that combines unlimited compeition with unlimited co-operation.

• • •

ज्ञानप्रकाश
२५-५-३५

*सिनेमा महर्षि बाबुराव पेंटर यांच्या*
*उषा चित्रपटाच्या गौरव प्रसंगी*

## भाई माधवराव बागल यांचे भाषण.

'बाबुरावांच्या कीर्ती बरोबर करवीर शहराची कीर्ती वाढत आहे. म्हणून त्यांच्या या उपकारातून उतराई होण्याकरता त्यांचे अभिनंदन करणे हे आमचे कर्तव्य आहे.

करवीर नगरीत सिनेमा सृष्टींची प्राणप्रतिष्ठा बाबुराव पेंटरनी केली.

आणि त्या कलामंदिरावर कळस चढवण्याचे कामही पण आता त्यांच्याच हातून होत आहे.

युरोपातील कलेचा उगम इटली व ग्रीस या देशात झाला. मायकेल अँजेलो, रॅफेल, लि ओनार्डो डा व्हिन्सी याना चित्रकलेचे आद्य प्रवर्तक म्हणता येईल. तेथून खऱ्या कलेला सुरवात झाली. यानंतर शेकडो वर्षे गेली. हजारो चित्रकार निर्माण झाले. अनेक चित्रशाळा स्थापन झाल्या. त्या कलांच्या शास्त्रीय शिक्षणाला सुरवात झाली. पण त्या आद्य गुरुवर्यांवर वरचढ करणारे कलावंत अद्यापही निर्माण झाले नाहीत. त्यांची कला अद्यापही आदर्शभूत होऊन राहिली आहे.

महाराष्ट्रापुरते तरी असेच म्हणावे लागेल कीं,

बाबुरावनी केलेला सिनेमा सृष्टीतला आरंभ अद्याप आदर्शभूतच ठरेल.

आज हिंदूस्थानभर गाजणाऱ्या प्रभात कंपनीच्या चालकांचे गुरुत्व बाबुरांच्याकडेच येते. अनेंक मंडळीना सिनेमाचा श्रीगणेशा बाबुरावनीच घालून दिला. तसेच अनेक कंपन्यातून हजारोनी पगार मिळवणारे कितीतरी लोक बाबुरावांच्या शिष्यगणातच मोडतात.

आज सिनेमा सृष्टीत बोलपटाने भलतीच क्रांती घडवूत आणली आहे. चांगल्या बरोबर वाईट गोष्टीही आल्या आहेत.

आता बोलपटाने प्रसंगाची कल्पना बोलवून दाखवता येते. माणुस चांगला वाईट हे तोंडाने सांगता येंतं. हे वाचासाधन मूकपट-काली नसल्यामुळे कथानक परिणामकारक वाटणे फारच अवघड होऊन बसले होते असें असूनही आजच्या महाराष्ट्रांतील बोलपटांना सैरेंद्री व सिंहगडचा दर्जा मिळविता आला नाहीं.

बोलपटानें सिनेंमा सृष्टीत अजब क्रांती घडवून आली असली तरी पूर्वीचे डायरेक्टरचे कौशल्य कमी झाले. कथानकातील सर्व प्रसंग निव्वळ हावभाव व चित्ररूपानें दाखवणें किती तरी अवघड!

आज मनुष्याचे विचार भावना स्वभाव बोलून दाखवता येतात त्यावेळी केवळ पडद्यावर येणाऱ्या चित्रानीच ते दाखवावे लागत म्हणून ॲक्टिग सेटिंग डायरेक्टिग या गोष्टी आजहून अवघड असत.

बोलपटामुळे हे कलाचातुर्य मागे पडले त्याचे विशिष्ट तंत्र नाहींसें झाले. त्या तंत्राची वाढ नाहींशी झाली. खुंटून बसली.

आता बोलपटाला जवळ जवळ नाटकाचे स्वरुप आले. कथानकाचे महत्व कमी झाले आहे. देखण्या नटी छचोर गाणी, विनोद पाहिजे म्हणून विनोद. गाण्याचा विनोदाचा संबंध कथा-नकाला पोषक म्हणून नव्हे तर नटी आवडणारी म्हणून तिला त्यात गोवायची अमकीचे गाणें आवडते म्हणून तिला गायला

लावावयाची असे विकृत व अस्वाभाविक स्वरुप बोलपटाना येऊ लागले आहे. यामुळे कला या दृष्टीनें धंद्याची व आवड या दृष्टीनें लोकांची फारच हानी झाली आहे. लोकाना तरुण पिढीला भलतेच वळण लागले आहे. बोलपटांना जलशाचे स्वरुप येत चालले आहे. दंगा मारामाऱ्या अश्लीलता याची रेलचेल होत आहे. खालचा अशिक्षित समाज खूष होत आहे. त्यांच्या हीन वासनाना खाद्य मिळत आहे. या आवडीच्या निष्कर्षावर बाबुरावांचा उषा चित्रपट अशा लोकांची निराशाच करील.

उषा चित्रपटात गाण्याच्या ताना हरघडी ऐकू इच्छिणाऱ्यांचा विरस होईल. तेथे श्रृंगार चेष्टा दिसणार नाहीत. मारामाऱ्या शिटया टाळयांना खाद्य नाहीं.

उषा चित्रपट म्हणजे जनतेच्या बिघडू लागलेल्या आवडीना लगाम होय.

सौंदर्यातला साधेपणा आणि साधेपणातील सहज सौंदर्य उषेत साधलं आहे.

निसर्ग सौंदर्यापासून तिची सुरवात झाली आहे. वसंताच्या फुलाफळानी भरलेल्या सृष्टीतून उषेचा जन्म झालेला आहे.

सृष्टीचे मुग्ध सौंदर्य पक्षिगणांच्या राजाचे ते नयन मनोहर जिवंत नाचणारे सौंदर्य, निसर्गाच्या व प्राणीं कोटीच्या सौंदर्याशी क्रीडा करणारे मानवी सौंदर्य आपल्या कृत्रीम सौंदर्यांची भर घालीत उषेच्या कथानकाला सुरवात होते.

उषा म्हणजे जणु सर्व सौंदर्यांचं मीलन !

विश्वाला प्रेमरज्जूत गोवणाऱ्या अहिंसा तत्वाचे गोड गान !

प्रत्येक गोष्ट सहजासहजी घडत आहे. त्यातून जनतेला बोधामृत पाजले जात आहे. गाणे पण किती योग्य प्रसंगी.

चित्रलेखा रंगवता रंगवता खुषीत येऊन गाणे गात आहे. किती स्वाभाविकपणा भरला आहे त्यात. मला हे दृश्य पाहून स्कूल ऑफ् आर्टचे प्रिन्सिपॉल ग्लॅडस्टन सालोमन यांची आठवण झाली. ते ही रंगवता रंगवता असेंच तंद्रीत येऊन सीट वाजवींत. अशा वेळी पद टाकणे कितीं संयुक्तिक. नेहमीच्या आयुष्यातील संवादात गाणे असते कुठे!

असे अस्वाभाविक गाणे टाळण्याची बाबुरावनीं शिकस्त केली आहे.

तसेच फोटोग्राफीचे सौंदर्य सर्वत्र खेचून भरले आहे. ते पाह–ण्याची दृष्टी मात्र पाहिजे. उषेतींल सौंदर्यांचे अत्यंत मनोहर देखावे सहजासहजीं कुठेही आढळणाऱ्या जागेतून निवडण्याचे बाबुरावांचे कौशल्य अप्रतीम आहे. अशापैकीच एक देखावा कधी न विसरण्या–जोगा आहे.

झाडाचा जाड बुंधा. त्या भोवतालचे गवत झुडपे फुलझाडे आणि गवतावर चांदण्याप्रमाणें चकाकणारी पांढरी पांढरी फुले, त्यांत जिवंतपणा ओतणारा जवळचा जलाशय, त्यात क्रीडा करणारे पक्षी हा देखावा कुठेही दिसावा पण तो घ्यावा बाबुरावानीच.

साध्या गोष्टीतील सौंदर्य पाहण्याला डोळे पाहिजेत.

पृथ्वीवर स्वर्ग आणता येतो आणि आपली दुःखे क्षणभर तरी विसरता येतात ही गोष्ट बाबुरावानी आपल्या कलाकृतीनी जनतेला व कलावंताना पटवून दिले.

निव्वळ मनरंजन करून घेणाऱ्याना त्यात मनरंजन आहे. तत्वबोध घेणाऱ्यांना त्यात तत्वबोध आहे.

प्रेम परंपरेचा बंधारा जुमानत नाही. भेदाभेदाच्या तटानें कोंडून रहात नाहीं, शस्त्रास्त्रानें नाहीसे करता येत नाहीं. शत्रुला जिंकण्याचे सामर्थ्य एका प्रेमात आहे हा संदेश श्रीकृष्णाच्या तोंडून त्यानी वदवला आहे.

उषास्वप्न– चित्रलेखा म्हणजे चित्रपटावर चित्रकाराच्या कुंचल्यापासून निर्माण झालेली स्वप्न सृष्टीच !

हा बोलपट सर्वांग परिपूर्ण झाला असे मी म्हणत नाहीं. दोष आहेत ते बाबुरावांचे नव्हेत त्यांच्या मनाजोग्या न मिळालेल्या साधनांचे आहेत.

◆ ◆ ◆

## गोहत्येवर श्री. माधवराव बागलांचे विचार

विश्वविलास–१६ मे १९३६

यज्ञातील पशुहत्या बंद करण्यासाठी ज्यांनी प्राणांतिक उपोषण करण्याचे जाहीर केले आहे त्या वीर 'पंडित शर्मा, यांचे व्याख्यान ता १३।५।३६ रोजी सायंकाळी रामाचे पारावर श्री माधवराव बागल यांचे अध्यक्षतेखाली झाले.

गो-पालनाचीं धार्मिक आवश्यकता किती आहे. शिवाजी महा–राजानी गो-पालन प्रत्यक्ष प्राण पणाला लावून कसें केले, आज आपल्या हिंदु धर्माला कशी काळोखी लागली आहे... हे सांगून आपण हे कलंक दूर केले पाहिजेत. खरे ब्राम्हणत्व आम्हाला आले पाहिजे. हिटलर हा

आजचा खरा ब्राम्हण आहे. हिटलर म्हणजे हरीचा सेवक ? असा अर्थ करून पशुहत्या विशेष संस्था स्थापण्याची विनंती केली.

यावर अध्यक्ष श्री माधवराव बागल म्हणाले 'गोहत्या' पशुवध वगैरे गोष्टीकडे पाहण्याची माझीं दृष्टि बऱ्याच जणाहून निराळी आहे. धर्मदृष्टया या गोष्टीकडे पाहण्याचा दृष्टिकोन माझ्याहून फार निराळा असू शकेल पण या बाबतीतली माझीं प्रामाणिक मते अप्रीय वाटली तरी बोलून दाखवणें हे माझे कर्तव्य आहे. या नव्या कालाला मी नेहरू युग असे म्हणतो.

म. गांधीचे राजकारण, समाजकारण, अर्थकारण व स्वत:चे आचरण धर्मांच्या पायावर अधिष्ठित होते. प्राचीन धर्म समजूतीला व संस्कृतीला धरुनच ते माझ्या मते आपल्या कार्याची दिशा आखीत आले. दैवीशक्ति, दैवीप्रेरणा, दैवी संदेश यावर त्यांचा विश्वास आहे.

नेहरू युगानें यापुढें मजल मारली. त्यांच्या चळवळीचे अधिष्ठान विवेकाच्या पायावर आधारलेले. धर्मभावना जागृत करून दैवी संदेशानें भारून त्यानी जनतेवर आपली मोहिनी पसरलेली नाही. म्हणून त्यांच्या भाषणात देवधर्म या शद्बांचा धिगाणा दिसून येत नाही. गोड गोड शद्बांची मोहिनी नाही. आत बाहेर शुद्ध जवाहिराप्रमाणें चकाकणारे निर्मल विचार सडेतोडपणे असंदिग्धपणें त्यांनी देशापुढे ठेवले. धर्माखाली किवा सत्तेखाली नमलेले ते विचार नाहीत. त्यांनी हिंदुस्थानच्या जनतेत विवेक जागृत केला. गुलामगिरीची बेडी त्यानी झुगारून दिली. नवयुगाचे ते प्रणेते आहेत. कटु पण सत्य बोलण्याचे धाडस करून त्यानी सनातन्याना सावकारांना व जमीनदारांना दुखावले आहे. नवविचार प्रथम पचण्याजोगे नसतात ते अव्यवहारीच वाटतात पण विवेक जागा करून, शांतपणें, पूर्वग्रह टाकून नि:पक्षपातीपणानें विचार करू लागलो म्हणजे तेच विचार सत्य आणि व्यवहारी वाटतात.

> तेव्हां विवेक जागा करूनच आपण गोहत्या वगैरे गोष्टीकडे
> पाहिले पाहिजे.

अहिंसेच्या दृष्टीने गोहत्त्या अगर बकऱ्याची, रेड्याची किंवा ढेकणाची हत्त्या सारखीच.

> स्वार्थाच्या दृष्टीने मात्र गोहत्या सर्वांत वाईट

कारण कृषिप्रधान हिंदुस्थान देशाला शेतीसाठीं बैलाचा यंत्राभावी फारच उपयोग आहे. गाईचे दूध तर अमृतच समजले जाते. लहान मुलांचे ते सर्वोत्कृष्ट अन्न आहे.

मेलेल्या बैलाच्या कातडीचा हरतऱ्हेचा उपयोग होतो. तेव्हां उपयुक्ततेच्या दृष्टीने इतके महत्वाचे जनावर मला तरी दुसरे कोणते दिसत नाही.

म्हणून मुसलमानांनीसुद्धा गोहत्त्या करणें स्वार्थदृष्टया चुकीचे ठरेल.

> पण गो-पालन हा परमधर्म समजून रोगी व पंगू अशा गाई बैलांचे संगोपन केल्यास त्यांच्यापासून भिकार पैदास निघेल व निरर्थक जनावरांना पोसण्यांत जनतेच्या पैशाचा अपव्यय होईल.

आता यज्ञातील पशुहत्त्येबद्दल बोलायचे तर ती एक अत्यंत गर्हणीय व मानवतेला लांछनास्पद अशी गोष्ट आहे. ते दृश्य भयानक आहे. मानवांतील पशुवृत्तीचे ते गलिच्छ प्रदर्शन आहे. पण त्यासाठीं प्राणांतिक उपोषण करणें माझ्या मते चुकीचे आहे. ही चुकीची धर्म भावना आहे.

भारताच्या देहाची जी वाढ खुंटली आहे. तो मनाने, देहाने, विचारानें, आचरणाने जो गुलाम झाला आहे त्याला कारण आमचा देवधर्म.

त्याने आमचा विवेक नाहीसा झाला आहे. स्वतंत्र विचार करण्याची बुद्धी नष्ट झाली आहे. गुलामगिरी बौद्धिक कां असेना–तिची वाढ झाली की तिच्याबरोबर निरनिराळ्या स्वरूपातल्या तिच्या बहिणीं थैमान घालू लागतात.

केडगांवचे वेड, उपासणीच्या लीला, जातीभेदाचे वीष हे रोगातून उत्पन्न होणारे अनेक प्रकार होत. हा देवाधर्मांचा आधार ढासळून टाकणें नव्या युगातील नव्या पिढीचे कर्तव्य आहे.

हिटलरला व्याख्यात्यानी सेवक खरा ब्राम्हण असे म्हटले आहे. त्याने ज्यू लोकांचा चालवलेला छळवाद वाचला म्हणजे त्याला माणूस सुद्धा म्हणता येणार नाही.

◆ ◆ ◆

## महाराष्ट्र चित्रकार संमेलन

१९३६

( भाषणाचा सारांश )

बालवयापासून मीं निसर्गाचा वेडा! हे वेड जर माझ्या ठिकाणी नसते, तर माझ्या आयुष्यांतल्या कितीतरी आनंदाला मी मुकलो असतो ! मला आमंत्रण देऊन बोलावण्याजोगे असे माझ्यांत कांहीच नसते. हे निसर्गाचे वेड मला लागले नसते तर मी चित्रें काढली नसतीं, मला लिहावेसे वाटले नसते, राजकारणांत भाग घेण्याची ऊर्मी कधीच आली नसती, खेडोपाडी हिंडावे असे वाटले नसते. मी भावनाशून्य असा मांसाचा गोळाच राहिलो असतो.

मग जो परिणाम मजवर होऊं शकतो. तो दुसऱ्यावर होणार नाही असे कसे म्हणतां येईल.

> माझ्या मतें निसर्गापासून मिळणारा आनंद मनुष्य संस्कृतीस आवश्यक आहे.

The sense of beauty is the mainspring of civilization ( Fredrick Hedge ). धर्माचा मुख्य हेतु सर्वांनीं सुखानें नांदावें हाच असतो. विश्वबंधुत्व हें धर्माचे ध्येय आहे. विचारवंत तेच प्रतिप्रादन करीत आहेत. शास्त्राची प्रगती त्याला मदत करीत आहे.

> चित्रकलेची प्रगति आणि कलावतांची वृत्ति ही विश्वबंधुत्वाला पोषकच आहे.

चित्रकला म्हणजे प्रेमाची बंडखोरी आहे.

> व्यापारी चढाओढीने व राष्ट्रीयत्वाच्या कोत्या कल्पनेमुळें उभे केलेले सरहद्दीचे तट फोडून परराष्ट्रांना मायाजालांत गुरफटून अंकित करण्याची महाबलवान शक्ति या कलेत आहे

मुसोलिनीच्या राक्षसी महत्वाकांक्षेमुळें त्याचा आपल्याला कितीहि तिटकारा आला तरी मायकेल रॅफेलच्या आठवणीनें पुनः इटलीबद्दल प्रेम उत्पन्न होते. हिटलरची पाशवी गर्जना बिथो-व्हॅनच्या गोड तानेखाली विरली जाते; आणि जगाला अंकित करण्याचे सामर्थ्य दारुगोळ्यांत व शस्त्रास्त्रांत नसून तें प्रेमांतच आहे हें सिद्ध करतें ! कारण ही जबरदस्तीची साम्राज्यसत्ता फेकून देण्यासाठी अहोरात्र झटणारे, शेक्सपियर, शेले, गटे यांच्या प्रभुत्वा-खाली जाण्याला केव्हांहि नाकारणार नाहीत ! स्वखुषीने

तयार होतील. कोणीहि चित्रकार मायकेल रॅफेलच्या पायाखाली नम्र होऊन धडे घेण्याला नाखुष होणार नाही.

कलेची वाढ द्वेषमुलक न होता ती प्रेममूलकच झाली आहे. भांडवलशाहीच्या वाढीप्रमाणें कलेची वाढ व्यक्तीच्या किंवा राष्ट्राच्या विकासाला आड येऊंच शकत नाहीं. राष्ट्रीयत्वाच्या अतिरेकामुळें द्वेषांत मात्र सारखी भर पडत आहे. कलावंताची मैत्री कोणासहि अपायकारक होऊ शकत नाहीं.

" An alliance in art, then symbolizes and anticipates that pure anarchy which philosophers assure us would be the most perfect social condition-every man doing exactly what he likes to the full extent of his powers and not only not injuring his fellows thereby but helping them and so contributing to the general harmony.

लेखक व चित्रकार यांत चित्रकार यांना परकीयांशीं आपलें हृद्गत बोलणें अधिक सोपें जातें-कारण लेखकाला दुसऱ्या लोकांशी विचारविनिमय करणें परभाषेंमुळें जड जातें. चित्रकाराला ही अडचण उद्‌भवत नाहीं. कारण तो बोलतो मूकभाषेनें. ती डोळयांना समजते व हृदयाला उमगते. यामुळे चित्रकार आपुलकीच्या भावनेनें जसे परस्पराजवळ झटकन् येतील तसे इतर येऊं शकणार नाहींत. याच धाग्यामुळें मीहि आपल्याकडे ओढलो गेलो. आपण पुण्याचे, मी कोल्हापुरचा, आपण ब्राम्हण, मी मराठा असे कोते विचार तुम्हांला शिवले नाहींत. या दृष्टीनें आपण कलावंत सहजासहजी अगदी अंतःस्फूर्तीनें एक थोर राष्ट्रकार्य करीत नाही काय ?

कलावंताच्या हातून कलाकृति बाहेर येण्याला स्फूर्तीची आवश्यकता मात्र आहे. ही चालना मिळाल्याखेरीज कलावंताच्या हातूनच काय पण कोणाहि मनुष्याच्या हातून मनुष्यत्वाला साजेसें कृत्य होणार नाहीं.

अशी चालना देण्याला निसर्गाची फारच मदत होते. म्हणून सृष्टिसौंदर्याची आवश्यकता व उपयुक्तता सर्वांनाच आहे असें माझें तरी मत आहे.

मोठ्या शहरांत राहणाऱ्यांचे तर निसर्गसौंदर्याकडे क्वचितच लक्ष जाते ! मुंबईसारख्या शहरी तर विचारूं नका. आकाशसुद्धां दिसण्याची मारामार. दिसलेंच तर धुरांनी घाण झालेलें. यामुळें निसर्गापासून मिळणाऱ्या आनंदाला, ज्ञानाला, उत्साहाला ते मुकतात. त्यांचे डोळे विकृत होतात व या नेहमीच्या संवयीमुळें त्यांना निसर्गाकडे आपुलकीच्या दृष्टीनें पाहण्याची बुद्धीच होत नाहीं. यामुळें त्यांच्या कितीतरी उच्च भावना खुरटल्या जातात या आनंदाच्या अभावी त्यांचे कितीतरी नुकसान होतें.

हीच गत शहरांतील विद्यार्थ्यांची. ते या सृष्टिज्ञानापासून पारखे होतात. त्यांना निसर्गाचें गूढ पोहचूं शकत नाहीं. वर्डस्वर्थचा अनुभव त्यांना मिळू शकत नाहीं. Books in running brooks हें वाक्य तेवढे समजतें !

" The men who are formed by the school and polished by society of the capital may yets in many ways, have their powers shortened by the absence of natural scenery and the mountaineer neglected-may have been taught things by the clouds and streams which he could not have learned in College......Ruskin.

निसर्ग नानाविध यत्नांनी तुमचे रंजन करीत आहे. त्यानें कधीहि न संपणारा सौंदर्याचा ठेवा तुमच्यापुढें ठेवला आहे. नभोमडळाच्या चित्रपटावर अनादिकालापासून सारखे बदलणारे देखावे तो तुम्हांला दाखवीत आहे. आकाशांत ढग चित्रविचित्र स्वरूपें धारण करून तुमच्या कल्पकतेला चालना देत आहेत–थकलेल्या पांथस्थाला, भग्नहृदयी दुःखिताला, एकलकोंडचा जीवाला निसर्गाइतका प्रेमळ मित्र कुठेंतरी मिळेल काय ? निसर्गाशी तादात्म झाल्यास तुमची बुद्धि व विचार व्यापक झाल्याखेरीज राहणार नाहीत. आणि निसर्गातून मिळालेला आनंद-तो आनंदक्षण तुमचं जीविन सुखमय केल्याखेरीज राहणार नाहीं.

अशाच एका प्रसंगाची मला राहून राहून आठवण येते व ते चित्र पुनः डोळचांसमोर उभे राहते; ते चित्र आपल्यासमोर ठेवण्याचा मोह मला आवरत नाहीं. आपण कलावंतच आहांत तेव्हां त्या सुंदर देखाव्याचा आपल्याला कंटाळा येईल असे मला तरी वाटत नाहीं. त्या सुखाचा आपल्याला वांटा देतां आला तर द्यावा हाच हेतू.

"अगदी पहांटेची वेळ. रंकाळा तलावाच्या कांठी बसलो होतो मी !"

एकीकडे दिनराजाच्या आगमनार्थ दिशा खुलूं लागल्या होत्या. दुसरीकडे पौर्णिमेचा चंद्र, स्वयंप्रकाशित सम्राटाचा अम्मल सुरूं होणार म्हणून, मलूल व फिक्या पडलेल्या चेहऱ्यानें नभोमंडळाचा ताबा, अजिंक्य रवीस देऊं लागला होता ! आपले राज्य हवाली करतांना त्याचे डोळचांतून पडणारी टिपे खालील आरशांत स्पष्ट दिसत होती !

तलावाकांठी कोंकणच्या गाडचा वस्तीस उतरलेल्या होत्या. पहांटेच्या थंडीमुळें एकानें उठून पाचोळा पेटवला. जवळच घोंगडी

पांघरून पडलेल्यानें झोपेच्या गुंगीतच तुकोबाचे अभंग भक्तिभावानें गुणगुणण्यास सुरवात केली. त्याला शेजारी पटकूर लपेटून पडलेली म्हातारी साथ देऊ लागली. हळुहळु त्यांतले जागे होतील तसे त्यांत भाग घेऊं लागले. हृदयाच्या कळवळ्याने बाहेर पडलेले अभंग कानीं पडतांच खरोखरीच माझ्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. ते आनंदाचे होते कीं दुःखाचे होते ते मला कांहीं कळेना. हृदय भरून मात्र आले होते. "

त्यावेळीं रंगवण्यासाठीं बसलो होतो मी. पण पुढें माझा ब्रश चालेना. तो दूर ठेऊन मी स्वस्थ बसलो. चित्र अपुरेच राहिले. पण त्यामुळे मनाला वाटणारे समाधान कांही अवर्णनीय होते. किती तरी सुषुप्त भावनांना त्यानें जागे केले असेल. अद्याप तो क्षण ताजाच आहे.

या अशा गोड धक्क्याची मनुष्याच्या जीविताला फार जरूरी आहे.

There is a genuine ecstacy of the soul in which it hears the voice of the eternities calling to it–and the prisoning body becomes suddenly intolerable,

(Nivedita)

मनुष्याच्या उच्च भावना जागृत करून त्याला कार्यप्रवृत्त करण्याला या रोमांच क्षणाची आवश्यकता आहे.

जें गाण्याबद्दल म्हटले जाईल तेंच सौंदर्याबद्दल म्हटले जाईल.

आकाशांतील अष्टौप्रहर चालणाऱ्या खेळाकडे ज्याचे डोळे वेधले जात नाहींत, सुंदर चित्रें पाहतांना ज्यांना आनंदाचे भरते येत नाहीं, आर्तस्वरानें ज्यांचे अंगावर शहारे उभे रहात

निसर्ग नानाविध यत्नांनी तुमचे रंजन करीत आहे. त्यानें कधीहि न संपणारा सौंदर्याचा ठेवा तुमच्यापुढें ठेवला आहे. नभो-मंडळाच्या चित्रपटावर अनादिकालापासून सारखे बदलणारे देखावे तो तुम्हांला दाखवीत आहे. आकाशांत ढग चित्रविचित्र स्वरूपें धारण करून तुमच्या कल्पकतेला चालना देत आहेत–थकलेल्या पांथस्थाला, भग्नहृदयी दुःखिताला, एकलकोंड्या जीवाला निसर्गा-इतका प्रेमळ मित्र कुठेंतरी मिळेल काय? निसर्गांशी तादात्म झाल्यास तुमची बुद्धि व विचार व्यापक झाल्याखेरीज राहणार नाहीत. आणि निसर्गातून मिळालेला आनंद-तो आनंदक्षण तुमचं जीविन सुखमय केल्याखेरीज राहणार नाहीं.

अशाच एका प्रसंगाची मला राहून राहून आठवण येते व ते चित्र पुनः डोळ्यांसमोर उभे राहते; ते चित्र आपल्यासमोर ठेव-ण्याचा मोह मला आवरत नाहीं. आपण कलावंतच आहांत तेव्हां त्या सुंदर देखाव्याचा आपल्याला कंटाळा येईल असे मला तरी वाटत नाहीं. त्या सुखाचा आपल्याला वांटा देतां आला तर द्यावा हाच हेतू.

"अगदी पहांटेची वेळ. रंकाळा तलावाच्या कांठी बसलो होतो मी !"

एकीकडे दिनराजाच्या आगमनार्थ दिशा खुलूं लागल्या होत्या. दुसरीकडे पौर्णिमेचा चंद्र, स्वयंप्रकाशित सम्राटाचा अम्मल सुरूं होणार म्हणून, मलूल व फिक्या पडलेल्या चेहऱ्यानें नभोमंडळाचा ताबा, अजिंक्य रवीस देऊं लागला होता ! आपले राज्य हवाली करतांना त्याचे डोळ्यांतून पडणारी टिपे खालील आरशांत स्पष्ट दिसत होती !

तलावाकांठी कोंकणच्या गाड्या वस्तीस उतरलेल्या होत्या. पहांटेच्या थंडीमुळें एकानें उठून पाचोळा पेटवला. जवळच घोंगडी

पांवरून पडलेल्यानें झोपेच्या गुंगीतच तुकोबाचे अभंग भक्तिभावानें गुणगुणण्यास सुरवात केली. त्याला शेजारी पटकूर लपेटून पडलेली म्हातारी साथ देऊ लागली. हळुहळु त्यांतले जागे होतील तसे त्यांत भाग घेऊं लागले. हृदयाच्या कळवळ्याने बाहेर पडलेले अभंग कानीं पडतांच खरोखरीच माझ्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. ते आनंदाचे होते कीं दुःखाचे होते ते मला कांहीं कळेना. हृदय भरून मात्र आले होते."

त्यावेळीं रंगवण्यासाठीं बसलो होतो मी. पण पुढें माझा ब्रश चालेना. तो दूर ठेऊन मी स्वस्थ बसलो. चित्र अपुरेच राहिले. पण त्यामुळे मनाला वाटणारे समाधान कांही अवर्णनीय होते. किती तरी सुषुप्त भावनांना त्यानें जागे केले असेल. अद्याप तो क्षण ताजाच आहे.

या अशा गोड धक्क्याची मनुष्याच्या जीविताला फार जरूरी आहे.

There is a genuine ecstacy of the soul in which it hears the voice of the eternities calling to it-and the prisoning body becomes suddenly intolerable,

(Nivedita)

मनुष्याच्या उच्च भावना जागृत करून त्याला कार्यप्रवृत्त करण्याला या रोमांच क्षणाची आवश्यकता आहे.

जें गाण्याबद्दल म्हटले जाईल तेंच सौंदर्याबद्दल म्हटले जाईल.

आकाशांतील अष्टौप्रहर चालणाऱ्या खेळाकडे ज्याचे डोळे वेधले जात नाहींत, सुंदर चित्रें पाहतांना ज्यांना आनंदाचे भरते येत नाहीं, आर्तस्वरानें ज्यांचे अंगावर शहारे उभे रहात

नाहींत, त्यांच्या हातून मानवांची सेवा कसली होणार ! तो आपल्या देशाची सेवा कसली करणार !

हृदयाची कालवाकालव झाल्याखेरीज मनाला तळमळ लागल्याखेरीज, जीव थरारल्याखेरीज त्याचे पाऊल पुढें पडणार नाहीं. निसर्गाचे गोड आघात या वृत्तीला पोषक असतात. निसर्गांशी तादात्म होणारा, समरस होणारा– दुःखिताशी सहज समरस होऊं शकतो.

या वृत्तीमुळेंच जवाहरलालजी हे राष्ट्राच्या दुःखी जनतेशी समरस होऊं शकले असे नाहीं कां म्हणता येणार ? निसर्गाशीहि त्यांचे हृदय असेंच तन्मय होऊं शकते हे त्यांचे आत्मचरित्र वाचतांच कळून येते– त्यांत त्यांनी निसर्गाची कितीतरी सुंदर चित्रें रेखाटली आहेत.

चित्रकारालाच नव्हे तर प्रत्येक मनुष्याच्या जीवनाला त्याला कार्यप्रवृत्त करण्याला हे धक्केच कारणीभूत होत असतात. ही स्थिति ( mood ) ज्या मानाने त्याचे ठिकाणी अधिक काल राहील त्या मानाने त्याच्या हातून त्याचे ध्येय लवकर साध्य होईल. मग तो चित्रकार असो, लेखक असो, शास्त्रज्ञ असो, किंवा देशसेवक असो.

चित्रकाराला तर या वृत्तीची फार फारच आवश्यकता. त्याची स्फूर्ति या धक्यानें जागीं होते. म्हणून त्यानें तर निसर्गसौंदर्याकडे अधाशाप्रमाणें पाहिले पाहिजे. Some sort of thrill must be felt, some chord touched, or there is no motive and Labour will be lost ...... ( Adrian strokes– R. A. ) निसर्गांतील या गोड आघातानें स्मृति जागी झालीं म्हणजे त्याची कलाकृति सुलभतेनें बाहेर पडू अकते. स्फूर्तीशिवाय काढलेल्या चित्रांत जीव येणार नाही. ते एक सजवलेले प्रेतच होईल.

निसर्गनिरीक्षणाची, निसर्गप्रेमाची आवश्यकता केवळ निसर्ग रंगवणाऱ्यालाच ( Landscape painter ) आहे असे नाहीं.

मनावर आघात करून खळबळ उडवण्याचा गुण जो निसर्गात आहे. तो गुण चित्रकाराच्या कृतीत आल्याखेरीज त्याचे चित्र केव्हाच परिणामकारक होणार नाहीं.

चित्र कशाचेही असो–निसर्गाचे असो, ऐतिहासिक असो, काल्पनिक असो अथवा सत्यनिदर्शनाचे असो,– प्रेक्षकांच्या मनावर दुरून पाहतांच जर पकड बसली नाहीं,–आकर्षण करून घेतले नाहीं, तर त्या चित्राच्या आंतील गोष्टीकडे सहानुभूतीनें पाहण्याची बुद्धीच होणार नाही. ' as Bergson says, it is through rhythm and harmony that art attains its true object. '

कलावंताला तशींच प्रेक्षकालाही सहानुभूतीच्या मन:स्थितीची आवश्यकता असते. आणि ही सहानभूति ( aesthietic mood ) जागृत होण्यासाठी पहिल्या आघाताची जरूरी आहे. तो आघात स्फूर्तीला चालना देऊं शकतो. मग तो कशापासूनही होवो.

प्रेक्षकाच्या दृष्टीवर हा गोड आघात करून त्याच्या हृदयांत भावना जागृत करण्याची--स्फूतिला चालना देण्याची–शक्ती निसर्ग-सौंदर्यांत विशेष आढळूत येते; आणि हे साधन कुठही सहज पैदा होण्याजोगे असल्याने त्याचा सर्वांना फायदा मिळजोगा आहे.

निसर्ग ज्या सहाय्यानें हा आघात करूं शकतो तो गुण चित्रकाराच्या कृतीत आला, तरच त्या चित्राकडे पहावेसे वाटेल. रंग आणि रचना यांमुळे हा आघांत केला जातो. चित्रांत मन–आकर्षक रंग नसेल व त्याची मांडणी जर मनोवेधक नसेल, तर त्या चित्रावर कितीही मेहनत घेतली तरी ते परिणामकारक होऊं शकणार नाहीं. हे रंग आणि रचनाशास्त्र तुम्हांला निसर्गापासून शिकता येते. एक देखावा आकर्षक, कीं दुसरा नाही का, याची छाननी केलीं, त्यावर

विचार केला, कीं या तत्त्वाचा शोध लागू शकेल. आर्किटेक्टलासुद्धां निसर्गनिरीक्षणाची पण तितकीच आवश्यकता आहे. Truth in Architecture means design based upon nature's laws of proportion, symmetry harmony, ornament and colour.

Gunning King

निसर्गसौंदर्याची कलावंताला आवश्यकता कां आहे व मनुष्य जीवीताला का आहे, ते मी माझ्या अल्प मतीप्रमाणे आपल्यापुढे मांडले आहे.

हृदय जागे करण्याचे काम निसर्ग करू शकतो-यातून स्फूर्तिला चालना मिळते-त्यातून सहानुभूती वृत्ति निर्माण होऊं शकते-आणि या वृत्तीला मग जसे वळण मिळेल तसे ती काम करू शकते-या सहानुभूतीनें आपण आपल्या समाजाकडे पाहूं लागलों-व कृतीला सुरवात केली तर ही कृति समाजपोषक व मानवसंस्कृतीत भर घातल्याखेरीज कधीहीं राहाणार नाहीं.

याच सहानुभूतीच्या हृदयांतून समोवतालच्या परिस्थितीशी समरस होऊन निघालेली कला–बाहेर पडलेले वाङ्मय–यालाच मी जिवंत वाङ्मय म्हणेन, तिलाच राष्ट्रीय कला म्हणेन.

चालू जीवनाशीं जिचा संबंध नाहीं, जी बुद्धीला आकलन होऊं शकत नाही, स्वतःच्या अनुभवाचा जिला आधार नाहीं, नवयुगांतील प्रगतींशीं, विचाराशीं जिचा संबंध नाही, अशा त्रेतायुगांतील चित्रांना ध्येय मानून काढलेलीं चित्रे यांना राष्ट्रीय कला मानून त्यांचाच उदोउदो करणें हे कलावंताच्या स्वतंत्र वृत्तीला, स्वयंप्रेरणेला पोषक होणार नाहीं.

Art must always be moving with the times and real art is the expression of the Thought of the times......

—E. B. Havle.

राष्ट्रीय जीवनाशीं समरस होऊन बाहेर पडलेली कला तीच राष्ट्रीय कला होय! ती समाजपोषक झाल्याशिवाय कशी राहील?

यावेळी सहजासहजी प्रश्न उद्भवेल—' कलेचा हेतू समाजसेवा आहे काय ? समाजाला त्यावर टीका करण्याचा अधिकार आहे काय ? कलेचा हेतू निव्वळ कलाराधण नव्हें काय ? कलाव्यामंगी नसल्याचे तिनें आकर्षण केले पाहिजे काय ? Art for art's sake नव्हे काय ?

आपल्या चित्राविषयीं किंवा एकाद्या चित्राविषयी कलावंत नसलेल्या मनुष्यानें मत प्रदर्शित केले—आणि ते विशेषतः प्रतिकूल केले म्हणजे पुष्कळ कलावंताच्या तोंडून उद्‌गार निघतात-' त्याला यांतले काय समजते ? चांगले वाईट ठरवण्याची त्याच्यांत पात्रता काय ?' त्यांना वाटतें कीं कलाव्यासंगी नसलेंल्यांना कलाकृतीविषयी मत देतां येणें शक्य नाही व त्यांना तो देण्याचा अधिकार नाहीं.

कांही वर्षे चित्रशाळेत काढलेल्यांनी असें उद्धार काढले म्हणजे साधारण मनुष्यही दचकतो व मनाशी म्हणतो, ' खरेच ! हा कांहीं आपला विषय नव्हे. '

' Art for Art's sake ' या समजुतीला धरुनच वरील वागणूक आहे.

पण हे म्हणणें सत्याला धरून असु शकेल काय ?

चित्र म्हणजे कलाकृति—कलावंताचा हेतू निव्वळ कलाकृति

निर्माण करणें एवढाच असतो काय ? गाण्याचा हेतू निव्वळ गाणें हाच असूं शकेल काय ? गोष्ट लिहिण्याचा हेतू निव्वळ लिहिणें एवढाच असतो काय ? एवढाच असेल असे मला तरी वाटत नाहीं.

चित्रांत कांही तरीं संदेश असतो. All art is an appeal from One mind to another ( G. king. ) संदेश म्हटल्याबरोबर-नेणारा व ग्रहण करणारा-या दोन व्यक्ति असाव्याच लागणार; म्हणजे कलावंताखेंरीज तेथे दुसरी व्यक्ती उभी राहिली. आतां तो संदेश कसला असेल ते त्या व्यक्तीवर अवलंबून राहील. तो निव्वळ आनंदाचा असेंल, तत्वबोध असेंल, टीका असेल, निव्वळ वस्तुस्थितीनिदर्शक असेंल, पण कांहींतरी संदेश पोचवणें हा असतो. लेखक गोष्ट लिहीतो ती कांहीतरी सांगावे म्हणुनच लिहितो आपल्याला आलेले अनुभव आपल्या कलेद्धारे कलावंत जगासमोर ठेवतो-येथेंच कलेचा व जगाचा संबंध आला-ही वृत्ति प्रत्येक मनुष्यांत कमीअधिक प्रमाणानें वास करींत असते.

प्रत्येक मनुष्याला आपल्या सुखदुःखाचा कोणीतरी बांटेकरी असावा असे वाटते यांत वांटेकरी जेवढें मिळतील त्या मानानें त्याचा आनंद वाढतो, दुःख हलके होते. मग कलावंत याला अपवाद कसा असूं शकेल ?

गटेंच्या दुःखांत जगानें भाग घेतला आहे. त्याचे दुःख त्याच्या पुरते राहिले कुठे ? तेव्हां कलावंताच्या कृतिचा परिणाम जगावर होत असतो. ज्या मानाने तो अधिक होईल, चांगला वाईट होईल, समाजास व मानवसंकृतीस पोषक होईल त्या मानानें त्या कलेचा दर्जा ठरला जाईल. मग कलावंताखेरीज इतर व्यक्तीना त्यावर टीका करण्याचा अधिकार साहजिकच पोंचतो.

कलेचा आनंद केवळ कलावंतालाच तेवढा भोगता येत असेल,

> तर त्याचेखेरीज त्याचे चित्र दुसऱ्यांना आनंद देवू शकणारच नाही. आणि असें असेल तर अशी सर्व कलाकृति जमिनीत गाडून टाकण्याच्याच किंमतीची ठरेल !

कारण त्या कलावंताखेरीज तिचा दुसऱ्यांना काय उपयोग ?

पण राष्ट्र कलेची जोपासना करते, कारण राष्ट्राला ती उपयुक्त आहे असे वाटते. म्हणून-तेव्हां कलाकृतीची पारख आणि श्रेष्ठत्व तो ज्या मानानें उपयुक्त ठरेल, अधिकांत अधिक लोकांची सेवा करूं शकेल त्यावर अवलंबून नाही कां राहणार ? ज्यामुळे राष्ट्राची अधिक सेवा घडेल तीच खरी राष्ट्रीय कला असे मी तर म्हणेन. ‘ Works of art are to be judged by the extent of their use.--Tolstoy.

पण अशी राष्ट्रीय कला निर्माण व्हायला–जिवंत कला निर्माण व्हायला – त्या राष्ट्रांतील कलावंत गुलाम असता कामा नयेत. त्यांच्या स्फूर्तीला व स्वतंत्र वृत्तीला मारक अशी समाजरचना असता कामा नये – ते समाजाचे Torch bearers आहेत मार्गदर्शक आहेत. पण त्यांचीं स्फूर्तीची ज्योत पेटायला तेलाचा भरपूर पुरवठा पाहिजे-पोटाचा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहता कामा नये. दरिद्री कलावंताच्या हातून–पोटासाठीं दुसऱ्यावर अवलंबून राहणाऱ्या कलावंताकडून समाजपोषक व अंतःस्फूर्तीची राष्ट्रीय कला निर्माण होणें शक्य नाहीं. पोटासाठीं विव्हल झालेल्या कोकिलेच्या गळ्यांतून सुस्वर गान बाहेर पडणार नाहीं. चंडोलाच्या गगनभेदी उच्च भराऱ्या चारा नसेल तर आकाश व्यापुं शकणार नाहींत– म्हणून राष्ट्राच्या जीवनांतून बाहेर पडणाऱ्या कलेला जीवनाची पण आवश्यकता आहे, हें आपल्याला कधीही विसरून चालणार नाहीं. जीवनच नसेल, अन्नच नसेल, तर स्फूर्ती येणार कोठून ?

हिंदुस्थानचे बहुतेक कलावंत आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र नसल्या-मुळें व त्यांचे गिऱ्हाईक व आश्रयदाते राजे-महाराजे व धनिक हेच विशेष असल्याने त्यांची कला अंतःस्फूर्तीची, स्वतंत्र वृत्तीची राहू शकत नाहीं. ती श्रीमंताची दासी बनलेली असते. गिऱ्हाइकांना खूष करण्याकरितां त्यांना आवडेल, पसंत होईल, अशाच कलाकृति कला-वंत तयार करण्याचा प्रयत्न करतो. यामुळे अद्याप तरी याकलेची सर्वां-गीण वाढ होऊं शकली नाही-राजेरजवाडे व धनिकांनाच या कलेची आवश्यकता. मोठ्या इमारतीखेरीज या कलेला वाव नाहीं, कलेला असें वळण मिळाल्यानें ती democratic होऊ शकली नाहीं-त्यांना आवडतील अशीच चित्रे कलावंतांना काढावी लागणार-तेथे खालच्या वर्गाच्या आयुष्यांतील प्रसंग चित्रित करणें अशक्य होणार-बहुजनसमाजाला ही कला मग पोषक कशी होईल ? तेव्हां पोटासाठीं निघालेली कला - दुसऱ्याच्या छायेखाली जगणारी, त्यांना खुष करण्यासाठीं, बाहेर पडलेली कला ' राष्ट्रीय कला ' हें उच्च नामाभिधान मिळवूं शकणार नाहीं. ती खऱ्या राष्ट्रीय जीवनांतून आली हि असें म्हणतां येणार नाहीं.

आर्थिक स्वातंत्र्याखेरीज ही स्वयंस्फूर्ती येणें फार कठीण आहे. तेव्हां देशांत कलेची आवड सार्वत्रिक होण्याला, खरी राष्ट्रीय कला बाहेर यायला, देशांतील दारिद्र्य नाहींसें होणें भाग आहे. आज याही स्थितींत जी कलाकृति केवळ धनिकांना खूष करण्याकरितां बाहेर पडली नसेल - जी स्वयंस्फूर्तीची असेल ती ' राष्ट्रीय कला या नांवाला सार्थ ठरेलच ठरेल.

दास्यांतून मुक्त होणें हें कलावंतानाही पण अत्यंत आवश्यक आहे. कारण मग ती गुलामाची कला राहणार नाहीं ती स्वयं-स्फूर्तीची राहील तीवर सर्वांना हक्क सांगता येईल

Art appreciation no longer the monopoly

of the few will become the inheritence not of kings and lords, but nations, not crowns and thrones but men. – A Wilson

'and it must appeal to the receptive faculties of a layman, the common man in the street'

आता येथें या प्रसंगी Lanbscape painting ची technical बाजू मांडणें पुष्कळांना कंटाळवाणें वाटेल. व या बाबीतले माझे विचार माझ्या 'कला आणि कलावंत' भाग १ ला या पुस्तकांत येऊन गेलेहि आहेत. आणि माझीं कामेंच आपल्या-समोर असल्यानें–तींच माझ्याबद्दल अधिक बोलतील. मात्र त्यांच्याकडे पाहतांना ती ( Finished ) पुरी कामें आहेत असें समजून आपण पाहिल्यास ती त्याज्य वाटतील. ती पुरी करण्याचा प्रयत्नच मी केला नाहीं.

> माझी चित्रें म्हणजे माझ्या मनावर उठलेल्या क्षणिक लाटा आहेत. त्यांनी माझ्या मनाचें समाधान केलें आहे. तें समाधान होताच मी ब्रश खालीं ठेवला आहे.

दुसऱ्यांना खूष करण्याकरतां ती मी काढलेली नाहीत. गिऱ्हाइकांना आवडण्यासाठीं त्यांत details घातलेले नाहींत पेंटिंग करतांना मी कोणतीहि विशिष्ट पद्धति स्वीकारलेली नाहीं. ज्यावेळीं जसें सुचेल तसें केले आहे.

घाईघाईने बदलत्या रंगांना पकडतांना जो आनंदाचा लाभ (thrills) मला मिळूं शकला, तो घरीं ड्रॉइंग आणून ते पुरे करण्याचा प्रयत्न करतांना कधीं कधीं झाला नाहीं– यामुळें वेळ जाई–

करमणूक होई– पण तो पहिला उन्माद कांहीं निराळाच. प्रियकरणीच्या प्रथम भेटीच्या आलिंगनांत मिळणारा, जीव थरारणारा आनंदच त्याची बरोबरी करूं शकेल. नंतरच्या करमणुकीला–नंतरच्या विवाहस्थितींतील सुखमय आयुष्याची उपमा देतां येईल. पहिला आनंद नेहमींच कसा मिळणार ? आणि कसा टिकणार ? म्हणून मग घरबसल्या करमणुकीची आवश्यकता आहेच आहे. मोठमोठी, मोठ्या आकाराची, पुष्कळ श्रम करून पुरी केलेली कामे ही– उन्माद अवस्थेनंतरच्या मन:स्थितींतून तयार झालेली असतात.

मी मात्र पहिल्या प्रेमाचा खेळच आपल्यासमोर मांडला आहे. माझी बहुतेक कामे माझ्या आनंदाचा क्षणच दाखवतील. माझ्या विशिष्ट भावनाच दाखवतील. म्हणून ती अपुरीच वाटतील. तेव्हां माझ्या चित्रांत अपुरेपणाची उणीव आहे हे जाणूनच आपण त्याकडे पहावे अशी विनंती आहे.

माझ्या चित्रकलेचा उगम निसर्गसौंदर्यांतून आहे तसा इतर चित्रकारांच्या कृतींतूनहि आहे, ही गोष्ट न मानणें कृतघ्नपणाचे होईल.

टर्नरच्या भपकेबाज, रंगश्रीमंतीनें सजलेल्या चित्रांचा, कोरोच्या शांत वातावरणाचा– विल्सन व कॉक्सच्या रचनाचातुर्यांचा परिणाम कांहीच झाला नाहीं, त्यांनी स्फूर्तींला चालना दिली नाहीं, असे कसे म्हणतां येईल ?

केव्हां केव्हां उत्कृष्ट चित्रें पाहिल्यामुळेंच मी निसर्गाकडें धांव घेतली आहे.

साध्या गोष्टींतून गूढ रहस्यमय वातावरण निर्माण करणारी फ्रँक ब्रँगवीनची चित्रें– अर्नेसबी ब्राऊनचे भव्य आकाश आणि

निसर्गाला उठाव आणणारी रानांतील खिल्लारे, ऑल्फ्रेड ईस्टची निसर्गाची निवड– रसेल फ्लिटचा साधेपणा आणि काटकसर वगैरे दृष्टिखालून जाणाऱ्या अनेक चित्रांनी माझ्या मनांत निसर्गाइतकीच खळबळ उडवली आहे. आणि मला तर असे वाटते की, कलेच्या भक्तांनी कोते राष्ट्रीयत्व टाकून सर्वसंग्राहक बुद्धी ठेवावी. आपल्या ध्येयाला व आवडीला पोषक असे जेथें जेथें मिळेल तेथून आणि त्या त्या राष्ट्राकडून मिळवण्यास कसलाहि कमीपणा न मानतां आपली कला समृद्ध करावी– यानेच आपल्या राष्ट्रीय कलेचा विकास होईल. रॉयल ॲकेडमीचे मोठ्यांतले मोठे अध्यक्ष सर जोशुया रेनाल्ड यांच्या शद्बांतच बोलायचे तर–

The artists should learn their profession by endeavouring to form an idea of perfection from the different-excellences which lie dispersed in the various schools of painting.

पाश्चिमात्य आणि पौर्वात्य–प्राचीन व आधुनिक कलेचा गोड मिलाफ करूनच आपली कला आपण वृद्धिगत करा– जुन्याच्या चांगल्या गोष्टी अवश्य घ्या पण जुने तेच राष्ट्रीय असे मानून नवे शोध व प्रगति टाकूं नका– अजंठा चित्रकलेंत घेण्याजोगे पुष्कळ आहे. त्यांतली रंगरचना आणि मेहनत अनुकरणीय आहे. पण त्यापुढे जग गेले आहे, हे विसरूं नका. पुरातनकालच्या कल्पना चित्रित करून अंधश्रद्धेचे पोषण करू नका.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४४०८१ वि: निबंध
क्रमांक १०७३० नोंद दिः प्रकाशन

# वाळवें तालुका राजकीय परिषद

ता. १५ मे १९३७

अध्यक्ष– श्री. माधवराव खंडेराव बागल

( ज्ञानप्रकाशवरून ता. २० मे १९३७ )

( वाळवे ता. राजकीय परिषद ता. १५ रोजीं येलूर येथे माधवराव खंडेराव बागल यांचे अध्यक्षतेखालीं भरली. सदर परिषदेतील अध्यक्षांचे भाषण. )

मी संस्थानी प्रजाजन असूनहि आपण मला जो मान देत आहात त्याबद्दल मी आपला फार आभारी आहे. संस्थांनी मुलुख व ब्रिटिश मुलुख हा भेद काढून टाकण्याची राट्रपति जवाहिर लालजीनी जे धोरण ठरवले आहे त्यालाच अनुसरून आपण माझी निवड केली आहे असे मी समजतो.

एकेकाळी वाळवे तालुक्याचा समावेश कोल्हापूर संस्थानांत केलाहि जात होता. पण परकीयांना आज आम्हांमध्ये सरहद्दीचे कृत्रीम तट उभे केले असले तरी आम्हामध्ये.

प्रेमदुवा जोडणारी पवित्र वारणा अद्याप कांही अटलेली नाहीं. तसेंच संकटकाली दोन्ही कडच्या प्रजाजनानी एकमेकाकडे धाव घेतलीच आहे. तुम्हां–आम्हांमधील हा प्रेमसंबंध स्वातंत्र्य लढ्यामुळें जवळजवळच येत जाईल यांत शंका नाहीं. एकमेकांच्या हातात हात घालून आपण स्वातंत्र्याचे ध्येय गाठण्याचा प्रयत्न करू. काँग्रेसच्या गेल्या अनत्याचारी युद्धांत तुम्ही केलेली कामगिरी व गेल्या निवड-

णुकीचे वेळीं कॉंग्रेसला मिळवून दिलेले यश पाहून व ऐकून आम्हाला आनंदाचे भरते येत असे. कारण–

तुमच्या यशांत आमचे यश आहे. तुमच्या पराजयांत आमचा पराजय आहे. ही जाणीव आम्हामध्यें उत्पन्न झाली आहे. तुमच्याकडे सूर्योदय झाल्यानंतर आम्ही आमची दारे कितीहि घट्ट लावून घेतली तर बारक्यासारख्या फटीतून त्याचा उजेड आम्हांला जागा केल्याखेरीज राहणार नाहीं.

असो. शेतकरी बधूहो, तुम्हाला अध्यक्षपदावरून चार शद्ब सांगण्याचा अधिकार मला पोचतो कीं नाही हे मला समजत नाही. कारण हिंदुस्थानच्या शेतकऱ्यांना दारिद्रयात लोटणारे जे अनेक वर्ग आहेत, त्याच एका वर्गापैकी मी आहे.

> आम्हा वर्गावरचे हे पाप नाहींसे व्हायचे असेल, आमचे जिणें स्वाभिमानी व स्वावलंबी व्हायचे असेल तर कष्टकाम न करता कोणालाहि जगता येणार नाही अशीच समाजव्यवस्था बसविली पाहिजे.

तसें झाले म्हणजे, आज दिसणारे कितीतरी कलह नाहीसे होतील व फुकटखाऊ श्रीमंतांना आज जो मान मिळतो तो कमी होऊन काम करणाऱ्यांची योग्यता वाढेल.

'शेतकरी सुखी तर जग सुखी' ही म्हण सर्वांच्या ओळखीची आहे. ही म्हण पडली त्यावेळीं शेतकरी सुखी असेल. आज मात्र असे म्हणणे म्हणजे शेतकऱ्याची चेष्टा करण्यासारखेच आहे.

उत्तम शेतकी, मध्यम व्यापार आणि कनिष्ट नोकरी या ऐवजी आतां उत्तम नोकरी, मध्यम व्यापार व कनिष्ट शेतकी अशी उलटी स्थिती झाली आहे.

हिंदुस्थान शेतकऱ्यांचा म्हणजे दारिद्र्यांचा असे आज झाले आहे.

पण हिंदुस्थानचे सर्व लोक दरिद्री आहेत काय ? नाहींत. भरपूर ऐषाराम भोगीत असलेले लोक आम्ही पाहतो ! मग दरिद्री कोण ? जे बारा तास शेतात राबतात, पळभर विसावा न घेता जे घरासकट पोराबाळासकट मजूरी करतात.

ज्यांना विसावा माहित नाही तेच लोक दरिद्री ! ज्यावर सर्व लोक जगतात तो धान्य पिकवणारा शेतकरी दरिद्री आणि उपाशी ! सर्वांना धडुत, पांघरुण घालणारा गिरणीचा मजूर दरिद्री आणि उघडा ! ज्यांनी मनगटाच्या जोरावर देश जिंकिले आणि देशासाठीं रक्त सांडले, ज्यांच्या संख्याबलावर साम्राज्याची इमारत उभी केली तोच दुर्बल, दीन आणि दरिद्री.

मात्र याच दरिद्री, गरीब बहुसंख्य वर्गाच्या श्रमावर सावकारांनी, भांडवलवाल्यांनी, गिरणीच्या मालकांनीं, राजांनी आणि धर्मोपदेशकांनी सर्व सुखे भोगावीत. देवाधर्माची भीति दाखवून यांनी मात्र या जन्मी वाटेल ती सुखे खुशाल भोगावीत !

हे देवाचे दलाल, भट, पाद्री आणि धर्मगुरु यांनी स्वतःच्या स्वार्थासाठीच देवाचे स्तोम माजवले आहे. अडाणी शेतकऱ्यांच्यात देवाची भीति घातली आहे.

राजसत्तेचा आधार या फुकटखावू धर्मगुरूना पाहिजे असल्यामुळे त्यानीच राजाला देवाचा अवतार बनवला होता.

त्यामुळे राजानें कसलाही अन्याय केला तरीं तो देवाचा अवतार या कल्पनेंनें लोक त्याला क्षमा करीत आज या दोन्ही संस्था एक-

ग्रंथ ... क्र. १५८२९

मेकाला सावरुन धरण्याचा प्रयत्न करीत आहेत. लहान मुलांना वडील मडळी जसे गप्प बसवितात. व त्या भितीवर वाटेल ती कामे करून घेतात तसेच या धर्मगुरुनीं देवाची भिती दाखवून गरीब शेतऱ्याकडून पैसा उकळला व त्याला दास बनविले. जे होते ते सर्व पूर्व जन्मीच्या पापपुण्यामुळे होतें अशी अडाणी शेतकऱ्याची समजूत करून दिल्या–मुळे सावकरानी त्याला कितीहीं पिळून काढले, इनामदारांनी कितीहीं छळले, भांडवलवाल्यानीं कितीही राबविले तरी हे सर्व जे आपण भोगतो त्याला हे लोक जबाबदार नसून याला कारण गेल्या जन्माचे पाप असे या बिचाऱ्याला वाटतें. आणि मग तो आपल्याला छळणाऱ्याचा कांही प्रतिकार करीत नाही. अशी ही देवाची मदत वरच्या श्रीमंत वर्गाला मिळून गरीबाचे डोके मात्र फुटते.

> म्हणून भाई हो, या धर्मगुरुंच्या थापावर विश्वास ठेवू नका व अवतारावर भाळू नका. स्वतः समर्थ व्हा.

म्हणजे तुम्हाला गुलाम करण्याची शक्ती कोणाच्याही अंगीं नाही असे तुम्हाला आढळून येईल. तुम्हीं मग सहजासहजी फसणार नाहीं.

तुम्हाला किती जणानीं फसवावे ! तुमचे कल्याण करतो असें सांगून खोटीनाटी अनेक आश्वासनें देऊन, मी तुमच्या जातीचा, मलाच मते द्या. असें म्हणून निवडून येंणाऱ्या लब्ध प्रतिष्ठितानी निवडून येताच स्वार्थ साधून घ्यायचा, आपल्या आप्तेष्ठाना नोकऱ्या मिळवून द्यायच्या व आपली तुंबडी भरुन घ्यायची !

शेतकऱ्याचा फायदा घेऊन अखेर त्यालाच दगा द्यायचा. हा क्रम चालू आहे. म्हणून राजकीय सत्ता आता शेतकऱ्या-मजूरानींच पुढे होऊन आपल्या हाती घेतल्याखेरीज त्यांचे हित साधणार नाही.

राजकारणांत शेतकऱ्या-मजूराला काय समजते असे म्हण-

णाऱ्याचे वर्चस्व आता कमी होत चाललें आहे. निपडून येणाऱ्या इसमाला इंग्रजी आलेच पाहिजे. तो पदवीधर किंवा वकील पाहिजे. नाहो तर त्याला कलेक्टरशी बोलता काय येणार असे म्हणूनही निवडणुका लढविण्यांत आल्या. आणि इंग्रजी न जाणणारी पण शेतकऱ्यांच्या खऱ्या कळकळीची मडळी मागे पडलीं !

पण कॉंग्रेसने हा पदवीधराचा आब नाहीसा केला आहे. व शेतकऱ्याची खरी कळकळ वाहणारी मंडळी हीच खरी लायक मंडळी होत ही गोष्ट लोकांना कृतीनें पटवून दिली आहे.

निव्बळ जात सांगून स्वतःचा स्वार्थ साधून घेणाऱ्या लोकांच्या गोड गोड थापाला आता यापुढे तुम्ही भाळू नका.

निव्वळ जातीकडे पाहण्याचे दिवस आता जात चालले आहेत.

श्रीमंत आणि गरीब अशीच जाती आता पडू लागल्या आहेत. मराठा सावकार मराठा कुळाला तो आपल्या जातीचा म्हणून दया दाखवील ही आशा फोल आहे. सावकार कुळाची जात पहात नसतो. जैन सावकार जैन कुळाला विशेष सवलती देतो आणि मराठ्या कुळाला नागवतो असे आढळून येणार नाही. कुळाला सर्व सावकार सारखेच. त्यांची जात एकच. म्हणून शेतकऱ्यांनी व मजूरांनी जातिवाचक संकुचित भावना टाकून एक झाले पाहिजे. त्यानी आपली अभेद्य अशी एकजूट केली पाहिजे. तरच त्या बलावर त्यांना आपले दारिद्र्य नाहीसे करता येईल.अशी अहिंसेच्या तत्वावर एकजूट झाल्यास रक्तपाताच्या क्रांतिशिवाय हा अफाट समाज, पूर्वीच्या चुकीच्या तत्वावर टिकून राहिलेली ही समाज व्यवस्था खास बदलू शकेल.

स्वतःची शक्ति वाढवून पूर्ण स्वावलंबी होण्यानेंच हिंदुस्थान स्वतंत्र होणार आहे.

ग्रामपंचायती सारख्या पूर्वीच्या संस्थानचा पुनरुद्धार करून खेड्या तील छोटे छोटे धंदे सुरु करून आर्थिक दृष्टया कांही काल तरी शक्य तितके स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करून जनतेला आपली ताकद वाढवता येणार आहे.

अस्पृश्यता हा प्रश्नही अद्याप सुटलेला नाही. हिंदु-मुसलमान तेढ ही नाहीशी झालेली नाही ! तरी या गोष्टी हाती घेतल्याच पाहिजेत. तिकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

◆ ◆ ◆

## कोल्हापूर संस्थान प्रजापरिषद

अधिवेशन दुसरे कोल्हापूर ता. १ व २ जून १९४२

स्वागताध्यक्ष श्री. माधवराव बागल यांचे भाषण

### ऐक्यविघातक संघटना नको

प्रजापरिषदेच्या कार्यांत आम्हांमधील जात, धर्म आणि पंथ या गोष्टी आमच्या ऐक्याआड येता कामा नये. ही प्रजापरिषद मुसलमानांची आहे, तशीच ती ख्रिश्चनांची आहे. ती सर्व जातींची आहे.

आजचे जागतिक युद्ध एकाच धर्मांच्या लोकांत सुरु झाले व त्यास एकमुखानें टक्कर देणाऱ्या रशियांत अनेक धर्म व अनेक भाषा आहेत. म्हणून भिन्न जाति व भिन्न धर्म राष्ट्रीय ऐक्याच्या आड येतात असें नाहीं. प्रजापरिषदेची हीच एक राष्ट्रीयत्वाची भूमिका आहे.

## खरा प्रश्न पोटापाण्याचा

> ज्यांना बहुसंख्य जनतेच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडवावयाचा नसतो, त्यांना हें जातीचे व धर्माचे खूळ उभे करून पुढारीपण टिकवावयाचे असते.

त्याला स्वार्थत्यागाची जरूरी लागत नाही. अज्ञ जनता या जातीय भावनेला कांही काळ बळी पडतें, पण कष्टकरी व गरीब जनतेपुढे खरा प्रश्न व्याज, खंड, फाळा, जीवनवेतन यासंबंधी प्रामुख्याने असतो. आपण कर्जमुक्त कसे होऊ, आपण कसें जगूं हीच काळजी लागून राहिलेली असते.

> शेतकरी आणि मजूर हा आम्हा सर्वांचा अन्नदाता परमेश्वर आहे ही जाणिव परिषद आणि तिचे कार्यकर्ते आजच्याप्रमाणें सदैव डोळ्यापुढे ठेवतील असा मला विश्वास वाटतो.

## लोकशाही हे आमचे ध्येय

कालाबरोबर माणसे बदलतात, त्यांच्या ध्येयसिद्धीचें मार्ग बदलुं शकतात. पण स्वातंत्र्य हे ध्येय बदलणारे नव्हे.

> स्वातंत्र्य आणि लोकशाही हे आमचे जीवितध्येय आहे.

जगांतील कोणत्याही स्वाभिमानी माणसाला पारतंत्र्याची चीड येतेच येते. मग ती गुलामगिरी परक्याची असो, किंवा घरच्या माणसाची असो ! हें युग लोकशाहीचे आहे. हुकूमशाही, सर्वाधिकार-शाही, अनियंत्रित सत्ता याविरुद्ध आजचें जागतिक युद्ध चालूं आहे. मग संस्थानी प्रजा व कोल्हापूर प्रजापरिषद अनियंत्रित सत्तेचे व सर्वाधिकारशाहीचे स्वागत करील ही गोष्ट संभवनीय नाही. असे स्वागत करणारे कोणी असतील तर ते देशद्रोही, प्रजाद्रोही, स्वार्थी कपाळकरंटेच होत.

## सुराज्य नव्हे—स्वराज्य पाहिजे !

आमची धडपड निव्वळ सुराज्यासाठी नाहीं,स्वराज्यासाठीं आहे. पेरीमंत्रिमंडळ कितीही कार्यक्षम असलें, कितीही चांगलें असले तरी ते लोकांना जबाबदार नाहीं. राणीसाहेब व मंत्रिमंडळ यांच्या अमदानींतील सुराज्यासाठी आमची धडपड नाहीं. आम्हाला स्व-राज्य राज्यकारभार जनतेच्या हाती पाहिजे. ही आमची अगदी सरळ, स्पष्ट व निःसंदिग्ध अशी मागणी आहे. सर्वाधिकारी मग तो रामावतारी असला तरी तो आम्हाला नको आहे. चुका आमच्या आम्हांला करूं द्या. आमच्या हाती आमचा कारभार येऊं द्या.

आतांपर्यंत या प्रजापरिषदेच्या कार्यासाठीं ज्यांनी स्वखुषीनें देहदंड सोसला, घरचा व पैशाचा मोह टाकून करवीर जनतेची प्रामाणिकपणानें, निःस्वार्थीपणाने व धडाडीनें सेवा केली, असे कित्येक कार्यकर्ते त्यांना चरितार्थाच्या साधनाभावी आम्हां स्नेही मंडळीना व संस्थानाला टाकून निव्वळ पोटापाण्यासाठी, जगण्यासाठी बाहेर जावे लागले आहें. त्यांना कसलाही आधार आम्ही देऊं शकलो नाहीं. कृतज्ञतेच्या अश्रुंची ठेव तेवढी त्यांना देता आली. आजहि आपल्या पोटाला चिमटा देऊन आपल्या जीवाची पर्वा न करतां एक वेळ जेऊन रात्रंदिवस परिषदेच्या कार्यासाठी सर्वस्व वाहून घेतलेले निष्ठावंत व थोर कार्यकर्ते आपल्यांत आहेत. ज्यांना मानाची व सुखाची नोकरी सहजी मिळवतां आली असती, असे त्यागी तरूण आपल्या कसल्याही अडचणीची वाच्यता न करतां काय करीत आहेत ? त्यांची नांवे घेतली तर त्यांना अपमानाचे वाटेल म्हणून मी ती घेत नाही. पण त्यांच्याच जिवावर हा परिषदेचा पसारा आम्ही पार पाडू शकलो. जनतेने त्यांच्या जीवनाकडे व ते आपले जीवन कसें काढीत असतील व चरितार्थ कसा चालवत असतील हे पाहिले पाहिजें. त्यांना सुखात ठेवण्याची नव्हे तर जगविण्याची जबाबदारी जनतेनें घेतली पाहिजे. सर्व कांहीं ठीक चालले आहे. या दृष्टीनें या कार्यकर्त्यांकडे पाहूं नये.

हा प्रश्न फक्त कोल्हापूर संस्थानांत नाही, तर सर्व संस्थानांतील कार्यकर्त्यांची स्थिति हीच आहे. संस्थानी चळवळीला स्थैर्य यावे, संघटना वाढावी व संस्थानी प्रजाजनांचे भवितव्य उज्वल व्हावे म्हणून कार्यकर्त्यांची ही चाललेली आर्थिक आबाळ थांबविणें अवश्य आहे. यासाठी पगारी प्रचारक नेमण्याची व्यवस्था विचारांत घेण्यांत यावी.

### विधायक कार्यक्रम

आज आम्ही विशिष्ट परिस्थितींत जमत आहोंत. युद्धजन्य परिस्थिति व महागाई यामुळें जनतेची मनें हवालदोल झालेली आहेत. यावेळीं संघटना आणि सहकार्य याशिवाय आम्हांला या संकटांतून पार पडता येंणार नाहीं. राजकीय अधिकार आणि जबाबदार राज्यपद्धति हा परिषदेचा धृवतारा राहील, पण या धृवताऱ्याकडे जाण्यासाठी विधायक कार्याचा मार्ग स्वीकारला पाहिजे. परस्पर सहकार्य, स्वावलंबन, स्वसंरक्षणक्षम संघटना करून मार्ग सुकर केला पाहिजे. विधायक कार्यक्रम पार पाडण्यांतच परिषदेचे यश अवलंबून आहे.

◆ ◆ ◆

## सांगली संस्थान प्रजापरिषद
## अधिवेशन १८ वें

अध्यक्ष– माधवराव बागल यांचे भाषण
कवठेमहांकाळ, ता. ५-११-४४.

सांगली संस्थान प्रजापरिषदेच्या १८ व्या अधिवेशनाचे अध्यक्षपद आपण मला देऊन माझा जो

गौरव केला आहे त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सांगली संस्थान प्रजापरिषदेचे अध्यक्षपद कै. गणपतराव अभ्यंकर दे. भ. शंकरराव देव, दे. भ. अण्णासाहेब लठ्ठे यांसारख्या नामवंत मंडळीनी भूषित केले आहे. त्या स्थानावर माझ्यासारख्या शेतकरी आणि मजुरांच्या सेवकांची योजना करून आपण शेतकऱ्यांचा व मजूरांचा गौरवच केला आहे.

## स्वामित्व जनतेचं

हिंदुस्थानांतल्या कुठल्याहि भागाचा राज्यकारभार असो,ज्यांच्या सहाय्यावर व श्रमावर तो चालतो; त्यांच्याच हाती म्हणजे त्यांच्या प्रतिनिधींच्या हाती तो आला पाहिजे. राजा या एका व्यक्तीला तो आता सर्वस्वी आपल्या हाती ठेवता येणार नाहीं. कुठल्याहि राज्यावर या पुढें एका व्यक्तीची अनियंत्रित सत्ता चालता कामा नये. राज्याची मालकी ही जनतेच्याच हाती आली पाहिजे.

## राजाहून प्रजाही श्रेष्ठ आहे

'Sovereignty rests with the people and not with the King'

राजाच्या अस्तित्वापूर्वी प्रजेचेच अस्तित्व होते. प्रजेला कांहीं राजानं निर्माण केलेलं नाहीं. प्रजेनं राजाला स्वतःच्या सोईसाठीं निर्माण केलं आहे. राजा हा प्रजेच्या सेवेसाठीं आहे. प्रजेचा सेवक आहे पण सेवावृत्ती जाऊन त्याच्यांत निव्वळ स्वामित्वाचाच दंभ वाढला आहे. सोईसाठीं निर्माण केलेलं हे साधन, डोईजड झालं आहे. म्हणून या संस्थेत आता आमुलाग्र बदल घडवून आणला पाहिजे. निव्वळ सुराज्याने ( good Govt.) शांत होण्याचा काल आता

उरला नाहीं. राजा चांगला असावा की वाईट असावा हा प्रश्न आज संस्थांनीं प्रजेसमोर नाहीं. राजसत्ता आता प्रजेच्याच हातीं पाहिजे. मग त्या कारभारात कितीहि चुका होवोत त्या परवडल्या. त्या चुकाच आम्हाला योग्य मार्ग दाखवतील. पण दुसऱ्यानें चारलेला गोड घासहि आम्हाला नको आहे.

## नामधारी राजे

राजाचं राज्यपद धार्मिकदृष्टया आता उरलेल नाहीं. धर्मानें घालून दिलेली कर्तव्यें कोणीच पाळीत नाहीं. राजकीयदृष्टया ते राज्यपद त्यांना सांभाळता आलेले नाहीं. त्यांचे तेज नष्ट झाले आहे. सरक्षणक्षमना नाहीशी झाली आहे. ते साम्राज्यसरकारचे निव्वळ मनीम बनले आहेत. खेळातल्या बाहुल्याप्रमाणें साम्राज्यसरकारच्या तारेवर त्यांचा स्वाभिमानशुन्य नाच चालला आहे. इंग्लंडचे टाइम्स या राजे लोकांचेबद्दल म्हणते 'या राजे लोकांना आम्ही जबाबदारीशिवायची सत्ता दिली आहे. त्यांच्या दुर्बलतेला दुर्गुणांना आणि दुराचाराला आमच्या प्रबल सत्तेचे संरक्षण दिले आहे. आणि दुर्दैवी संस्थांनी प्रजेला या अशा व्यक्तीची सेवा करावी लागत आहे.

## सनदा पत्रांचा आधार

या राजे लोकांना प्रजेच्या प्रेमाचा आधार नको, सेवेचा आधार नको. सनदापत्राच्या आधारावर, आणि परकीयांच्या बळावर हे हिंदी राजे आपले अस्तित्वच नव्हे तर आपली अनियंत्रीत सत्ता टिकवूं इच्छितात. पण त्यांची ती सनदापत्रें प्रजेला कस्पटाइतक्याहि किंमतीची वाटत नाहींत. साम्राज्य सरकारहि त्यांना तितकीच किंमत देते.

चालू जागतिक युद्धांत या सनदापत्रांच्या व करारांच्या बावड्यांची वाताहत होत असताना राजेलोक ती अखंड ठेवू इच्छितात.

जगाला ग्रासणाऱ्या एक एक हुकुमशहाचा डोळ्यासमोर नाश होत असताना, जगाचा नकाशा क्षणोक्षणी बदलत असताना, आपल्या टिचभर राज्यावरची हुकुमशाहीं सत्ता टिकवण्याचा प्रयत्न लोकशाहीच्या प्रचंड शक्तीपुढे किती वेळ टिकाव धरू शकेल ?

## भांडवलशाहीची वीण

नाशीवाद, फाशींवाद व साम्राज्यवाद यांत कांहीही भेद नाही हे हिंदी जनतेला पूर्णपणे कळून आले आहे. त्याच साम्राज्यशाहीच्या आसऱ्याखाली जीव धरून राहिलेली रोपडी म्हणजे ही संस्थाने होत. साम्राज्यशाहीच्या नाशाबरोबर यांचा नाश ठरलेला आहे

पण स्वखुषीच्या त्यागाने मात्र ते आपले व्यक्तित्व राखू शकतील. जनतेचे पुढारीपण मिळवू शकतील. साम्राज्यशाहीचे पारडे हलके करु शकतील. बदलत्या कालाबरोबर ते बदलले नाहीत तर ते आपले अस्तित्वही टिकवू शकणार नाहींत.

## जगाचे घटक-

संस्थाने लहान असोत, थोर असोत. ती जगाचे घटक आहेत. संस्थानाबाहेरील राजकीय चळवळीचा, जागतिक व्यवहाराचा, वैचारिक आंदोलनाचा, आर्थिक घडामोडीचा, युद्धातील बदलत्या यशापयशाचा व राजकीय धोरणाचा परिणाम त्यांच्यावर सारखा होत आहे.

सार्वत्रिक महागाई, धान्य टंचाई व जीविताची असुरक्षितता हे त्याचे परिणाम देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत, राजमहालापासून ते भिकाऱ्याच्या झोपडीपर्यंत जावून पोहोंचले आहेत.

## युद्ध कालात-

आता तर हिंदुस्थान ही रणभूमी होत चालली आहे. तथापि आपल्या देशाचे संरक्षण करण्याला जी आत्मियता उत्पन्न व्हावी

लागते ती साम्राज्य सरकार निर्माण करीत नाहीं. हिंदी राजेही निर्माण करू इच्छित नाहींत. स्वार्थामुळें चर्चिल अमेरी प्रमाणेंच राजे लोकांचीही बुद्धी चळली आहे. यामुळे यांचा, लोकशाही घोषणेवरचा विश्वास उडाला आहे.

### युद्धानंतर-

हिंदी जनतेला युद्धानंतरही चांगले दिवस दिसतील असें मानण्यास जागा नाहीं. समाजाचा नैतिक ऱ्हास, आर्थिक नष्टचर्य, राजकीय गुलामगिरी यांतून हिंदुस्थानला वर काढण्याचा प्रयत्न इंग्रज सरकारकडून होईल अशी आशा आता कोणाला वाटत नाहीं.

युद्धोत्तर पुनर्रचनेच्या नांवाखाली पुनः भांडवलशाहीचे आसन स्थिर आणि प्रबल करण्याचेच विचार व प्लॅन्स बाहेर पडू लागले आहेत व साम्राज्याच्या तालावर नाचणाऱ्या कळसूत्री बाहुल्याप्रमाणें संस्थानानीही हेच धोरण स्वीकारले आहे. भांडवलवाल्यांच्या ताब्यांत सर्व देश जाण्याची लक्षणे दिसत आहेत.

### राजकीय व आर्थिक संघटना

याला तोंड देण्याकरितां संस्थानी प्रजेनें आपली राजकीय तशी आर्थिक संघटना केली पाहिजे. केवळ आपल्याच संस्थानापुरते पाहून आताच्या यांत्रिक युगांत चालण्याजोगे नाहीं.

संस्थानें अखंड भारतापासून व अखंड भारत जगापासून अगदी अलग व अगदी स्वतंत्र ठेवता येणार नाहीं. मग खालसा मुलुखातील कॉंग्रेसच्या संघटनेपासून आपल्याला दूर राहून कसे चालेल ?

केवळ आपल्या संस्थानच्या संघटनेच्या जोरावर संस्थानी प्रजेनें स्वातंत्र्य मिळविणे ही गोष्ट जवळ जवळ अशक्य आहे. म्हणून कॉंग्रेसशी सहकार्य करूनच आपण हिंदुस्थान स्वतंत्र करू शकूं. ही

गोष्ट अलग प्रयत्नाने होऊ शकणार नाहीं. सुरुवात म्हणून संस्थानी प्रजेचे संबंध जवळ आणले पाहिजेत. दक्षिणी संस्थानांची संघटना जोरदार केली पाहिजे.

संघटना विधायक तशी राजकीय स्वरुपाचीहि करावी लागणार.

## साम्राज्यशाही युद्ध

इंग्रज सरकारला युद्धांत हिंदी प्रजेचे सहकार्य नको आहे. हिंदुस्थानला गुलामगिरीत ठेवून ते सहकार्याची अपेक्षा करतात. ही गोष्ट मानवी स्वभावाला सुटून आहे. चीन व रशिया वगळल्यास हे युद्ध साम्राज्यशाही वृत्तीच्याच राष्ट्रांत चालू आहे हे सिद्ध करण्याचे कारण नाही. कारण याबाबत चर्चिल साहेबांनींच आपली भूमिका स्पष्ट केली आहे. 'साम्राज्य घालवण्याकरता मी प्रधानगिरी स्वीकारली नाहीं' असे त्यांनी जाहीर केलेच आहे. म्हणून राष्ट्र-सभेनें व संस्थानी प्रजापरिषदांनी युद्धविरोधी भूमिका जरी घेतली नाहीं, तरी आहे या परिस्थितींत युद्धात भाग घेणे हे साम्राज्य सरकारच्या स्वार्थी धोरणामुळें अशक्य होऊन बसले आहे. याच धोरणामुळें हिंदी प्रजेला प्रथम आपले स्वातंत्र्य व मग जागतिक युद्ध भूमिका चर्चिल अमेरीनी निर्माण करून ठेवली आहे.

## समाजवाद

पण आपले स्वातंत्र्य व त्यानंतरची आपली राज्यव्यवस्था कशी असावी याचाहि विचार आतापासून केला पाहिजे.

आपल्याला ध्येय या दृष्टीनें कुठे जायचे आहे ते ठरवले पाहिजे म्हणजे त्या अनुरोधाने आपले प्रयत्न होऊ लागतील.

युद्धाचा शेवट हा केव्हांतरी लागणारच आहे. पण युद्ध संप-ल्यानें युद्धाचे कारण नाहीसे होत नाहीं. युद्ध सपले आणि

साम्राज्यशाही व भांडवलशाही यांचे वर्चस्व राहिले तर पुनः युद्ध हे ठरल्यासारखेच आहे.

जगांत सार्वत्रिक सुखशांती व समाधानीला पोषक वातावरण उत्पन्न व्हायचे असेल, बहुजन श्रमजीवी जनतेच्या विकासाला भरपूर वाव मिळायचा असेल तर परोपजीवी वर्ग नाहीसा झाला पाहिजे.

> समाजसत्तेच्या राज्यांत साम्राज्यशाही राजशाही व भांडवलशाही याला स्थान नाहीं. राजेलोकांच्या अस्तित्वाला जागा नाहीं. युद्ध कलह व राक्षसी चढाओढ थांबायची असेल तर समतावाद स्वीकारल्याशिवाय जगाला तरणोपाय नाहीं.

## समाजवाद व गांधीवाद

> पण समाजवाद म्हणजे रशियाचे अंध अनुकरण नव्हे.

स्टॉलिनची सुटलेली फर्मानें आपला देशाभिमान टाकून निर्बुद्ध जनावराप्रमाणें पाळणें नव्हे.

> हिंदुस्थानातील समतावादाला गांधीवादाची जोड दिल्याखेरीज विशुद्ध लोकशाही येथे निर्माण होणार नाहीं.

राष्ट्रीकरणाच्या नांवाखाली होणाऱ्या आर्थिक केंद्रीकरणांतून एक नवी तज्ञांची हुकुमशाही निर्माण होत आहे इकडेही दुर्लक्ष करून चालणार नाहीं. हा दोष गांधीवादामुळे त्यांच्या विधायक कार्यक्रमाने व अहिंसेच्या धोरणामुळे नाहीसा होणार आहे.

राजसत्तेनें व यंत्रसत्तेनें सर्व समाजावर जीं पकड बसवली आहे. त्यामुळे बहुजनसमाज गुदमरून गेला आहे. म्हणून ग्रामसंघटना व छोटे धंदे हेच हिंदुस्थानच्या भावी समतावादी राज्यव्यवस्थेचे आधार ठरतील.

जोपर्यंत राजकारणातला मक्ता व पुढारीपण खेडुताशी समरस न झालेल्या, पांढरपेशा सुखवस्तू श्रीमंताकडे व सुशिक्षिताकडे आहे तोपर्यंत तीं कायदेमंडळे तुम्हांला उपकारक होणार नाहींत व त्यांची घटना पण तुम्हांला अनुकूल अशी बनणार नाहीं. त्या कायदेमंडळात तुमच्यासाठी झगडलेले, तुमचा कैवार घेऊन भांडणारे, तुमचा विश्वास सपादन केलेले लोकच गेले पाहिजेत. निव्वळ पदवीधर म्हणून, ' बडे बाप के ' बच्चे म्हणून कोणालाही निवडून देतां कामा नये.

पण निव्वळ कायदेमडळात माणसें निवडून देण्यानें तुम्हांला चांगले दिवस दिसणार नाहीत. खरी राजसत्ता राजधानीत नाहीं. ती खेडयावर आहे. ती खेडयावरची, खेडूतांची राज्ये इंग्रजी अमदानीनें मोडून टाकली आहेत. त्यांचा पुनः उद्धार केला पाहिजे.

खेडी सर्व दृष्टया स्वावलंबी बनण्याचा आता प्रजापरिषदेनें प्रयत्न केला पाहिजे. ती खेडी आपला राज्यकारभार आपण वाहणारी अन्नवस्त्रासाठी दुसऱ्याकडे न पाहणारी, गावच्या अवश्यक गरजा शक्य तों आपणच भागवणारी खटले-खेकटी, पंचायती मार्फतच मिटवणारी, सहकारी संस्था स्थापन करून सावकार व दलाल यांच्या तडाख्यातून सुटलेंली बनली पाहिजेत.

प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्यांनीं आता हे काम हाती घेऊन खेडी संघटित केलीं पाहिजे.

> प्रजापरिषद म्हणजे पांढरपेशाचे वादविवादमंडळ न होता खालच्या वर्गांत जागृती करून त्यांचे देनंदिन लढे लढविणारी गरीबाचा कैवार घेणारी व संस्थानातील कृतिम विषमता नष्ट करणारी अशी संस्था बनली पाहिजे.

आतापर्यंत खालच्या वर्गाच्या अज्ञानावर, खालच्या वर्गाच्या श्रमावर जो वर्ग जगला व धनवान झाला त्यानें आपले ऋण फेडले पाहिजें या शेंतकरी मजूराच्या सेवेनेच ते ऋण फिटेल.

अशा सर्व लोकांच्या त्यागानें बलवान झालेली प्रजापरिषद सांगलीचा राज्यकारभार चालवण्याला समर्थ ठरेल.

◆ ◆ ◆

## धामणगांव सोलापूर शेतकरी परिषद

२२-११-४५

भाई माधवराव बागलांचे भाषण

( सारांशानें )

महाराष्ट्रातील मराठ्याना मी एक सेवक म्हणून हाच संदेश देईन तुम्ही आपल्या जातिवाचक वातावरणातून बाहेर पडलेच पाहिजे.

मला विश्वास आहे की महाराष्ट्रात जातिवादाची आवरणें काढून टाकण्यास जर कोणती जात समर्थ असेल तर ती मराठाच होय.

आमची एवढी प्रचंड आहे. आमचा समाज एवढा बलवान आहे की प्रतिक्रिया म्हणूनसुद्धां जातिवाचक होण्याचे तुम्हांला कारण नाहीं.

सर्व जातीच्या बांधवांना आतमसात करून खऱ्याव्यापक आणि लोकसंग्राहक हिंदुधर्माची दिक्षा देण्याचे सामर्थ्य तुम्हा मराठ्यांत आहे.

भावी भारताचे नेते या प्रचंड सामर्थ्यवान मराठ्यातून निर्माण होणार आहेत.

इतर जातींचे राजकीय गट निर्माण होत आहेत म्हणून तुम्हांला भिण्याचे कारण नाहीं.

अखिल मुंबई इलाखा

# हरिजन विद्यार्थी परिषद पुणे

अधिवेशन पुणे

१६-१२-४५

अध्यक्ष- श्री. माधवराव बागल यांचे भाषण.

आपली सेवा करण्याचा आपण मला जो मान दिला आहे त्यामुळें मला अत्यानंद होत आहे. आपली सेवा करणें हे केवळ निव्वळ कर्तव्यच नव्हे तर ते उच्च वर्णीय म्हणवून घेणाऱ्यांचे पापक्षालण होय. आम्हा स्पृश्य वर्गाचे आपल्यावर इतके अन्याय व जुलूम होत असतांनाहि त्याच वर्गापैकी माझ्यासारख्याला आपण अध्यक्षपद देत आहात हा आपला थोरपणा आहे. आपली थोर सेवा न जाणता आपल्यापाशी स्पृश्यवर्ग अद्यापहि कृतघ्नपणानें वागत आहे ही आम्हाला लाजिरवाणी गोष्ट आहे. याचमुळें हिंदुधर्मावरचा व स्पृश्यवर्गावरचा आपला विश्वास उडाला तर त्याला आपण जबाबदार नाहीं.

तथापि आपण ही गोष्ट जाणता कीं या पापाला केवळ आजची पिढी जबाबदार नाहीं. अस्पृश्य तसे स्पृश्य चालत आलेल्या रुढीचे गुलाम आहेत. म्हणून सुज्ञानी स्पृश्याचा तुमच्यावर होत असलेला जुलूम दुष्ट हेतूने होत नसून तो रुढीत सांपडलेल्या गुलामी वृत्तीमुळें आहे. पण सुबुद्ध स्पृश्य जाणून बुजून जातिवर्चस्व ठेवीत आहेत ते पापी होत. ते देशाचा व समाजाचा नाश करणारेच ठरत आहेत त्यांचे-

> ही रुढी व धार्मिक गुलामगिरी तुडवून टाकण्याकरिता ज्या धर्मग्रंथानी तुम्हाला गुलामगिरीत ठेवण्याचा प्रयत्न केला त्याना जाळा असे डॉक्टर आंबेडकर यानी म्हटल्यास कांही वावगे झाले असे मला तरी वाटत नाही.

राजकीय गुलामगिरीहूनहि ही धार्मिक गुलामगिरी तुम्हाला अधिक सतावत आहे. पावलोपावली तुमची मानहानी होत आहे. म्हणून मंदिरप्रवेशाला आपले स्पृश्याबरोबरचे हक्क प्रस्थापित करण्यापुरतेच मी महत्व देत आहे. या पलीकडे आपण त्यांत गुंतून पडू नये. मंदिर प्रवेशासाठीं सत्त्याग्रह करावा पण प्रवेश मिळाल्यावर मूर्ति व भट डोक्यावर घेऊन नाचू नये.

या जातीभेदाला धर्मानेंच आधार दिला आहे. या जातीभेदानें आमची माणुसकी मारुन टाकली आहे. सर्वत्र अविश्वास साशंकता, शत्रुत्व निर्माण केले आहे. यातून निघालेले हलाहल म्हणजे अस्पृश्यता ! याने हिंदुधर्मांचे पावित्र्य नष्ट केले आहे.

तथापि माझी आपल्याला विनंती आहे कीं आपण राष्ट्रीय चळवळीकडे आपुलकीनें पाहिले पाहिजे. स्पृश्यवर्गानें तुमच्यावर अन्याय केला असला तरी कॉंग्रेस तो दूर करू इच्छिते. म. गांधी अस्पृश्यतेचा कलंक धुवून काढण्याकरता प्राणहि अर्पण करण्यास तयार असतात. कॉंग्रेसचे अनेक पुढारी आपल्यासाठी तळमळणारे आहेत. आपल्यासाठी झटणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांना न लाथाडता त्यांचे सहकार्य घेऊन आपण काम करावे. सारे स्पृश्य हे आपले शत्रू हे मानण्याची राष्ट्रघातक वृत्ती कांही लोक फैलावीत आहेत. हा राष्ट्रघात आहे. तसा आत्मघातहि आहे. आपण आपल्या हक्कास जागरूक रहा. पण त्याचबरोबर राष्ट्राचे पारतंत्र्य काढून टाकण्यास कॉंग्रेसला सहाय्य करा. कॉंग्रेस ही कुठल्याहि जातवाल्यांची मिरासदारी नाहीं. तशी मिरासदारी दिसून आली तर तुम्ही संख्येच्या बळावर यांना हुसकून देऊ शकाल.

मी जातीवाचक संघटनेचा पुरस्कर्ता नाही. पण कांही काल कांही जातींना त्याची जरुरी आहे.

पण काँग्रेस विरोधी अशा राजकीय संघटना असू नयेत. त्यानें स्वातंत्र्य दुरावेल ! देशांतील सर्व जातींना घेऊन साम्राज्यशाहीशी लढणारी ती एकच संस्था आहे.

सात कोटी हरिजन ही एक राष्ट्राची प्रचंड शक्ति आहे. हिंदुस्थानांतला खरा ' प्रोलिटेरिएट ' बेकार, भिकारी, दरिद्री, ज्याला धर्माचा आधार नाही, पैशाचा आधार नाहीं, समाजाचा आधार नाही, ज्याला गमवायचे असे कांहीच नाही असा निर्धन, ज्याला कोणाचीच भीती बाळगण्याचे कारण नाही असा वर्ग हा आपला अस्पृश्यांचा आहे.

You have nothing to lose but your charms ' तुमचे कांही गेलेच तर त्या गुलामगिरीच्या शृंखलाच. ' लेनिननें याच वर्गाच्या सहाय्यावर जगत् क्रांती घडवून आणली. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाच्या प्रतिकारातून जी प्रचंड लाट उसळेल त्याने चालू समाजव्यवस्थेची उलथापालथ होऊन जाईल. तुम्ही धार्मिक तशी राजकीय गुलामगिरी फेकून देऊ शकाल. तुमच्या बडखोरीनें जातीवादाचे भूत कायमचे गाडले जाईल व हिंदुधर्माला उजाळा मिळेल.

तुम्ही विद्यार्थी हे उद्याच्या जगाचे नेते आहात तुम्ही खेडोपाडी जाऊन तुमच्या जातीची संघटना करा. न्याय हक्कासाठी स्पृश्याशी लढा द्या. सार्वजनिक जागा, पाणोठे, देवालये येथे जाण्याचा तुमचा हक्क प्रस्थापित करा. त्यासाठी कोणाची कदर बाळगू नका. वर्गविग्रह व जातिकलहाची भीति घालून सत्ता गाजवणाऱ्याना दूर सारा. विग्रह नको म्हणून सत्ता कायम राखणारे ढोंगी, देशाला स्वातंत्र्य मिळवून देणार नाहीत. तुम्हालाही स्वतंत्र करणार नाहींत.

मी व माझ्या घराण्यानें आपली थोडीबहुत सेवा केली आहे पण आपली आच व तळमळ माझ्यात येऊ शकणार नाही. आपले प्रश्न आपणच सोडवले पाहिजेत.

◆ ◆ ◆

## सावंतवाडी संस्थान परिषद

अध्यक्ष—२९-१२-१९४५ सारांश

मी छत्रपतीच्या राजधानीतला माणूस आहे. मी शिव छत्रपतींचा अभिमानी आहे. पण त्यांचा काल व आपला काल यात जमीन-अस्मानाचं अंतर आहे...आज शिवाजी महाराज प्रकट झाले आणि हिंदूपतबादशाही स्थापन करतो म्हणाले तर आजचे हिंदुधर्मीय त्याला मान्यता देणार नाहींत मग इतरांची गोष्ट कशाला ? त्यांना निवडणुकीला उभे रहावे लागेल......

आमचे संस्थानिक शिवछत्रपतींच्या पुण्याईवर व पूर्वजांच्या लौकिकावर आता फार काळ जगू शकणार नाहींत. अंधस्वामिभक्तीचे व राजनिष्ठेचे धुके आता वितळू लागलें आहे. पूर्वज कसे होते इकडे पाहण्याची दृष्टि जाऊन तुम्ही कसे आहांत यावर तुमचे स्थान राहणार आहे.

शिवछत्रपतींच्या काली स्वराज्य म्हणजे आपल्या धर्मांचा किंवा आपल्या जातीचा राजा गादीवर बसला म्हणजे ते राज्य आपले ही भावना होती. आता तो आभास नाहीसा झाला आहे.

◆ ◆ ◆

> कारण मराठा जातीतील बोटावर मोजण्याइतके सरदार जहागिरदार व राजे सोडले तर सारा मराठा समाज शेतकरी कामकऱ्यांचाच. शेतकरी कामकऱ्यांची जात म्हणजे मराठ्याची जात. इतके ते शेतकऱ्यांचे जीवनाशी समरस झाले आहेत.

निव्वळ निवडणुका जिंकण्याकरता सरदार इनामदार वगैरेनी स्वतःला मराठा म्हणवून घेतले तरी त्यांचे हितानहित व मराठा शेतकऱ्यांचे हितानहित एक नाहीं. त्याहून जातीतील शेतकरींच त्यांना जवळचे आहेत. म्हणून ज्यांना बहुजनसमाजाची सेवा करायची आहे, संघटना करावयाची आहे. महाराष्ट्र स्वतंत्र करावयाचा आहे.

> त्या मराठ्यानी जातिवाचक संघटना न करता महाराष्ट्रीतील शेतकरी कामकऱ्यांच्या संघटनेस प्रामाणिकपणे लागावे.

शेतांत जाऊन पहा तेथें पोराबाळासकट राबणारा कामकरी बहुतेक मराठाच दिसेल. गिरण्यांत जा तेथेही तोच जास्त दिसेल.

> या शेतकरी कामकऱ्यांची संघटना म्हणजे मराठ्याचीच संघटना होय. या मराठा शेतकऱ्याचे दुसऱ्या जातीतील शेतकरी मजूरपासून भिन्न कुठे आहे.

मग जातिवाचक नांव घेऊन इतरापासून दूर कां जाता ? निदान महाराष्ट्रापुरते तरी स्वच्छ म्हणतां येईल. की शेतकरी मजूरांचे राज्य म्हणजे बहुसंख्य मराठ्यांचेच राज्य. काँग्रेसने तर तीच घोषणा केली आहे. काँग्रेस शेंतकरी मजूरांचे राज्य स्थापन करण्यासाठी वचनबद्ध आहे. काँग्रेसमध्ये कोणीही गेला तरी त्याला त्याच धोरणानें चालावे लागेल. मग तो जातीनें कोणीही असो.

> शेतकरी मजूर कोणत्याही जातीचा असो त्याला आपल्या जातीतील सावकार जमीनदार व भांडवलवाल्यापेक्षा दुसऱ्या जातीतील शेतकरी व मजूर जवळचा असतो.

कारण त्याचे हितानहित जवळचे असते. सावकाराच्या व जमीनदाराच्या गुलामगिरीतून मोकळं व्हावं असं न वाटणारा शेतकरी कुठंच मिळणार नांही. सावकार आपल्या जातीचा असला ह्मणजे तो कुळाला लाडका असतो असं थोडच आहे.

ह्मणून मराठा हा मुख्यतः शेतकरी असल्यामुळे इतर कोणत्याही जातीचे शेतकरी असोत तेच त्याला जवळचे होत.

यामुळें जातिवाचक वाचक राजकीय संघटनेची मराठ्यांना मुळीच आवश्यकता नाही.

कारण मराठ्यांचे जातिवाचक स्वरूप जाऊन त्या जातीला वार्षिक स्वरुपच आले आहे. ह्मणून मराठ्यांची संघटना ह्मणजे शेतकरी मजुरांची संघटना होय.

◆ ◆ ◆

## पुसेगांव (खटाव तालुका)
## कॉंग्रेस युवक परिषद

१५–१२–४५

अध्यक्ष, माधवराव बागल यांचे भाषण.
(सारांश)

आज आपण येथें जमलेले सर्व युवक आहांत.

माझ्या मते तारुण्य हे वयावर अवलंबून नाहीं. अंगच्या जोमावर, कर्तृत्वावर व आपल्या लढावू वृत्तीवर अवलंबून आहे.

महात्मा गांधी वयानें वृद्ध असले तरी मनानें तरूणच आहेत. मी तर असं म्हणेन कीं, सातारा तरूण आहे. कारण सातारा

जिल्ह्यांतील सारी जनता लढाऊ आहे. सातारा सर्वांना स्फूर्ति व प्रेरणा देत आहे.

साताऱ्याचा सर्वत्र जयजयकार होत आहे. साताऱ्यानें शिव-छत्रपतींच्या कीर्तीत भर घातली आहे. सातारचा मराठा अजिंक्य आहे. लढाऊ आहे. त्यागी आहे. हे त्यानें साऱ्या भारताला पटवून दिले आहे. मावळा जिवंत आहे.

लढाई पुकारल्याशिवाय केवळ संघटनेच्या बळावर तो ग्राम-राज्यें स्थापू शकतो. एकीच्या बळावर आपले तंटे मिटवू शकतो. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर जी ग्रामराज्यें स्थापली जातील, त्याची तयारी साताऱ्यानें आजच केली आहे. सत्ता एका ठिकाणीं केंद्रीभूत न होता ती विभागली जावी या तत्वाचा वस्तुपाठ साताऱ्यानें अगो-दरच गिरवला आहे.

महात्माजीनीं अहिंसा युद्धाचा पुकारा केल्यास छातीवर गोळी हसतमुखाने कशी झेलावी हे साताऱ्यानें दाखवून दिले आहे.

भटशाहीला झुगारून देऊन, सावकारशाहीला पुरा शह देऊन त्याच बरोबर साम्राज्यशाही विरुद्ध बंड पुकारण्याची धमकी देऊन वग्र विग्रहाची भीति साताऱ्यानें टाकून दिली आहे. बहुजन मराठा व श्रमजीवी समाज एकाच वेळीं देशी भांडवलशाही व गोरी भांडवल-शाही विरुद्ध बंड पुकारु शकतो. त्याला धनिकांची भीति बाळगण्याचे कारण नाहीं. हा साताऱ्याचा अनुभव महाराष्ट्रांतील कार्यकर्त्यांना मार्गदर्शक ठरेल.

साताऱ्याचे व कोल्हापूरचे ऐतिहासिक संबंध आहेत. शिव-छत्रपति ही आम्हांमध्यें प्रेमाचा दुवा जोडणारी दिव्य स्फूर्ति आहे. वारणा आम्हां दोन्ही भागांतील जनतेत प्रेमाचा जिव्हाळा सारखा ओतीत आहे. आपल्यांतील थोर कार्यकर्ते हे माझ्या जिवाभावाचे

स्नेही आहेत एकेकाळी त्यांनी व मी एकत्र दौरे काढले आहेत. दोन तीन परिषदांचे अध्यक्षपद देऊन यापूर्वीच आपण माझा गौरव केला आहे. आजहि आपण त्याच प्रेमाच्या धाग्यानें मला येथे आणले आहे.

सातारा आणि कोल्हापूरच्या सहकार्यानें आपण नवा तजेला चढवू. सर्व जातीना आत्मसात करून नव्या समाजाची घडण बनवू.

आपण सर्वच मराठे आहोत. सर्वच काँग्रेसभक्त आहोत. जातिवादाला पायाखाली तुडवून "जय हिंद"ची घोषणा करीत– अहिंसेची पताका हाती धरून आम्हीं दिल्ली गांठणार आहोत.

भाईहो, तुम्ही लढवय्ये मराठे आहांत.

जातीच्या अभिमानाऐवजीं स्वातंत्र्याचा अभिमान बाळगा.

'जातीसाठीं माती' खाणें हा आपला धर्म नव्हे. देशासाठीं प्राण देणें हाच मराठ्यांचा खरा धर्म.

देशासाठीं मरणारे तेच खरे मराठे ! मरणाला न हटणारे ते खरे मराठे ! या दृष्टीनें सारा सातारा मराठ्याचा आहे.

साताऱ्याने आंदोलनात अग्रेसरत्व पटकावले आहे. कायदेमंडळातही त्याला मानाची जागा हक्कानेच प्राप्त होईल. पण–

युवकांनों, तुम्हीं मानाचा विचार न करता खेडी संघटित करा.

काँग्रेसचा जो आदेश मिळेल, तो पार पाडण्याची तयारी करा. तोपर्यंत विधायक कार्यक्रमाला बांधून घ्या.

गांधीजी हेच खरे नेते आहेत. त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवा. यापेक्षा मी आणखी ते काय सांगणार !

◆ ◆ ◆

# अहमदनगर जिल्हा काँग्रेसनिष्ठ युवक परिषद

स्वागताध्यक्ष २–२–४६

या अशा परिषदांचे उद्‌घाटन करीत असतांना मी ही क्रांतीची कोठारे उघडत आहे. असा मला भास होतो. या परिषदांच्या निमित्तानें आगामी लढ्यातील मोक्याच्या जागेवर आपण या मोठमोठ्या क्रांतीच्या तोफा उभ्या करीत आहोत. या क्रांतीच्या तोफा कधी न फुटणाऱ्या अशा पोलादाच्या आपण बनवल्या पाहिजेत. ही आमचे कणखर पोलाद म्हणजे आमची संघटना होय. या तोफेत आमच्या निश्चयाची व अलोट धैर्यांची दारु ठेचून भरली पाहिजे. कधी न विझणाऱ्या सत्याच्या ठिणगीने ती पेटवली पाहिजे. म्हणजे आम्हाला अपयश कधीच मिळणार नाही. आम्ही शेतकरी आणि मजुरांच्या अभेद्य अशा संघटना जर बनवल्या तर त्यावर हावित्सरचा माराहि परिणामकारक होणार नाही. शेतकरी–मजुरांची ही फळी दुभंगणार नाही. मी शेतकऱ्यांना नेभळट बनवण्यासाठीं 'येथे आलो नाहीं. निशस्त्र असलो म्हणून भ्यायचे कारण नाही. आपली निर्भयता हीच आपल्या ठिकाणची प्रचंड शक्ती आहे. अशी संघटित निर्भयता स्वातंत्र्य हमखास मिळवू शकेल. किसान आणि मजूर राज्य हे तुमच्या संघटनेच्या जोरावरच तुम्हाला मिळवायचे आहे.

■ ■ ■

# शेतकरी परिषद लोणी. जि. पुणें.

अध्यक्ष—१८-२-४६

शेतकऱ्यांचा प्रश्न म्हणजे हिंदुस्थानचा प्रश्न. हिंदुस्थान नव्वद टक्के शेतकऱ्यांचाच आहे.

शेतकरी म्हणजे शेत करणारा, असेच मी मानतो. मग तो जमीनीचा मालक असो किंवा त्या शेतावर काम करणारा निव्वळ मजूर असो. जमीन कसणारा तो शेतकरी. किसान आणि मजूरांचे राज्य म्हणजें या जमीन कसणाऱ्यांचे राज्य. या शेतकरी मजूराकरितां, त्याच्या कल्याणाकरितां चालवलेले राज्य.

आम्हाला बेगडी स्वातंत्र्य नको.

शेतकरी राजकीयदृष्टया, आर्थिकदृष्टया तसा धार्मिकदृष्टया स्वतंत्र झाला पाहिजे.

सर्वत्र गावराज्ये स्थापन करा. आपआपल्या खेड्यावर स्वयंपूर्ण स्वावलंबी किसान आणि मजूर राज्याची स्थापना करा.

'चले जाव' या एकाच मंत्राने पाऊल टाका.

▪ ▪ ▪

# पुरंदर तालुका शेतकरी परिषद

वाल्हे पुणे, ३०-५-४६

अध्यक्ष

आता इंग्रज काढता पाय घेऊ लागले आहेत. काँग्रेसच्या राजवटीला प्रांतो प्रांती सुरवात होत चालली आहे. पण 'किसान मजूर' राज्य अद्याप दूर आहे. ते जवळ आणण्यासाठी आतां शेतकरीं व मजूर या बहुजनसमाजाने आता पासून तयारीस लागले पाहिजे तुमच्याच जोरावर काँग्रेस हे करू शकणार आहे. तुम्ही सर्व कांही काँग्रेस करील म्हणून स्वस्थ बसलात तर काँग्रेसमधले भांडवलवाले किसान मजूर राज्य पुढे ढकलण्याचा प्रयत्न करतील. तेव्हां या सावकार, जमीनदार व भांडवलबाले यांच्याशी तुम्हांला लढा द्यावा लागणार आहे असे समजून संघटनेस लागा. शेतकरी व मजूर यांची बलवत्तर एकी रक्तपाताशिवाय समाजक्रांती करु शकेल.

तुम्ही प्रथम एकी करा. एकीच्या जोराबर 'गावराज्ये' स्थापन करा. पंच लोकांनीं निवडले पाहिजेत. त्यांत सावकार, जमीनदार, भांडवलवाले व काळाबाजारवाले असता कामा नयेत.

तसेंच देवाधर्मांवर जगणाऱ्या प्रत्येक जातीतल्या भटाभिक्षुकांचे उच्चाटन करा. या बौद्धिक गुलामगिरीतून दुसऱ्या गुलामगिऱ्या चिकटतात. गुंडांचा सुकाळ बंद पाडा. अहिंसेने प्रतिकार करण्याचे धैर्य नसल्यास स्वसंरक्षणाकरता कोणताही उपाय करा पण निर्भय व्हा.

■ ◆ ■

## घामोड शेतकरी परिषद

पेटा राधानगरी–जिल्हा कोल्हापूर.

१–६–४६

खेडोखेडी मी पंचायती स्थापन करण्याचा प्रयत्न करीत आहे. खेडुतांना राजकीय शिक्षण देण्याचा माझ्या मते आज तरी मला हाच मार्ग दिसतो. सर्व शेतकरी साक्षर झाले पाहिजेत. पण तोपर्यंत त्यांनी दुसऱ्याकडून घास घ्यावा हेहि कांही बरे नव्हे. अडचणी येतील तसा मार्ग काढता येतो.

रोगाची माहिती व उपचार सहकारी संस्था, दुकानें, खरेदी-विक्री अशा अनेक बाबी पुढे येतील.

सावकारी, जमीनदारी, भांडवलशाही नष्ट करण्याची घोषणा काँग्रेसनें जरी केली असली तरी त्याला मूर्त स्वरूप यायला कांही काल जावा लागेल.

कष्टकरी शेतकऱ्यांनी अभेद्य अशी एकी केल्यास सावकारानी सनदापत्रानी मिळविलेल्या मालकी जमिनीचे उत्पन्न ते पदरांत पाडून घेऊ शकतील. खंड कपातीच्या जोरावर त्यांचे उत्पन्न शेतकरी आपल्या पदरांत पाडून घेऊ शकतील.

मी जे पंच निवडतो, त्यांत सावकार जमीनदार यांना घेत नाहीं. खंड कपात– हे निःशस्त्र शेतकऱ्यांचे परिणामकारक शस्त्र आहे. सावकारशाही, जमीनदारशाही या विरुद्ध हे उघड बंड आहे. सत्याग्रह युद्धातला हा चढाऊ कार्यक्रम आहे.

या भागांतील बहुसंख्य जनता मराठा जातीची आहे. त्यांना आपुलकीच्या भावनेनें मी सांगतो कीं, आपल्याला राजकीय बाबतीत जाति संघटना करण्याचे कारण नाही. शेतकरी–मजूर संघटना म्हणजे मराठा संघटना असे महाराष्ट्राबाबतीत तरी म्हणता येईल. म्हणून जातिसंघटनेचं वेड काढून टाका.

◆ ◆ ◆

## प्राथमिक शिक्षक परिषद

पुणे जिल्हा व पुणे शहर

अध्यक्ष– माधवराव बागल यांचे भाषण

२४–२–४६

आपल्याला मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने मी आलो नाहीं. माझा तो अधिकार नाही. मी शिक्षक नाहीं. मी एक अभ्यासू आहे.

ज्यांच्यापासून आम्ही शिकायचं तेच जर संकटात पडले तर हे मार्गदर्शन कोण करणार?

देशाला अन्नाइतकीच ज्ञानाची आवश्यकता आहे. शिक्षक वर्गाने पोटासाठी टाहो फोडायचा हे देशाचे दुर्भाग्य होय.

बुद्धि विकासाला पायबंद घालणें म्हणजे मनुष्याला पशुकोटीत ढकलण्यासारखे आहे. पशुना राबवणं सोपं जातं. ते गुलामगिरीत राहू शकतात. अशा देशावर राज्य करणं सोपं जातं म्हणून त्यांना आपली प्रजा अडाणी असावी व रहावी असे वाटत असते. याच वृत्तीतून शिक्षकाची ही उपासमार होत नाही ना?

प्रसन्नता आणि स्फूर्ति, हा मानवी वृक्षाचा बहर होय. पाण्याच्या जीवनाखेरीज वृक्षवल्लीना बहर येत नाही. फळेफुले येत नाहीत. ती तशीच वाळून जातात. खायला मिळालं नाही तर बुलबुल बोलू शकत नाही. चंडोल आनंदाच्या भराऱ्या मारु शकत नाहीं.

तीच गत शिक्षकांची !

शिक्षकांचं अन्न बंद केलं तर प्रसन्नता आणि स्फूर्ति येणार कोठून. प्रसन्नता ही तर काव्याची आणि कल्पकतेची जननी. ती गेलीं, ती मारुन टाकली की माणूस हा निव्वळ मांसाचाच गोळा राहणार नि असा हा निर्बुद्ध गोळा भावी पिढीत काय चैतन्य ओतणार ! कोणती स्फूर्ति देणार ? कसले काव्य शिकवणार ? निव्वळ जडातून कल्पनामय सृष्टि कशी उभी करणार ? उद्याच्या स्वराज्याची व समाज–धडीची कल्पना काय देणार ?

शिक्षकाची उपासमारी करणे म्हणजे स्वराज्याचा पाया खणून काढण्यासारखे आहे.

मी हे अध्यक्षपद स्वीकारलं ते उपकाराच्या बुद्धीनें नसून स्वार्थाच्या बुद्धीने स्वीकारले. कारण आपला हा प्रश्न स्वराज्याच्या प्रश्नाशी निगडीत आहे. आपला प्रश्न म्हणजें आमच्या मुलाबाळांचा प्रश्न आहे. म्हणून आपली मागणी ही केवळ शिक्षकांची नसून सर्व जनतेची आहे असे मी समजतो.

मी शिक्षक नाहीं. पण शिक्षकांच्या परिस्थितीची मला कल्पना करता येते. मी मजूर व शेतकरी यांच्यासाठी झटणारा माणूस आहे. पोटासाठी मजुरांचें संप मी लढवलें आहेत. मजुरांचा प्रश्न मी हाताळल्यामुळें आपली मागणी किती सार्थ आहे हे मी जाणू शकतो.

आजचा मजूर आणि आजचा शिक्षक याची तुलना केल्यास शिक्षकांची स्थिती मजुराहून किती तरी बिकट असल्याचे आढळून येईल.

बहुतेक मजूर अशिक्षित असतात. त्यामुळे त्यांच्या आशा-आकांक्षा मर्यादित असतात. सुखाची कल्पना मर्यादित असते. बौद्धिक वाढ झाली नसल्यामुळें ज्ञानाची भूक कमी असते, यामुळे ज्ञानाच्या व्यासंगासाठी लागणारा खर्च करण्याची, ज्ञानाच्या करमणुकीची त्याला अधिक अवश्यकता भासत नाही. यामुळें याबाबत कराव्या लागणाऱ्या खर्चाची त्याची साहजीकच बचत होते.

शिक्षकाला ज्ञानाच्या भुकेची आच लागल्यामुळें ती भूक शांत करण्याकरिता जादा खर्च करावा लागतो. हा त्या पगारांतून करावा लागतो. मजुराची राहणी गरीबीची असते. मजूर पांढरपेशा वर्गांत मोडत नाहीं. श्रीमंताशेजारी अगर पांढरपेशा वर्गाच्या अंगाशी अंग लावून बसण्याचा प्रसंग येत नाही. कपडे घाण असले काय स्वच्छ असले काय, त्यासाठी त्याला कोणी नावे ठेवीत नाहीं. टापटीप स्वच्छतेची कल्पना कमी. कसलाहि खुराडा मिळाला की त्यात तो राहू शकतो. यामुळे यासाठी लागणाऱ्या खर्चाची साहजीकच बचत होते

शिक्षक हा मुलांना आदर्श वाटतो. त्या शिक्षकाचे कपडे घाण असल्यास तो मुलाना स्वच्छतेचा उपदेश कसा करु शकेल ? फाटके कपडे घातल्यास मास्तर मुलावर आपला बोज कसा ठेवू शकेल ? गलिच्छ वस्तीत खणाच्या खोलीत राहिल्यास शाळेतील मुलांना तो आपल्या घरी कसा बोलावू शकेल !

तेव्हां याकरतां मजूराहून घर भाड्यावर, कपड्यावर साबणावर, ज्ञानार्जनासाठी पुस्तकावर, मध्यमवर्गाची राहणी

संभाळण्याकरिता अवश्यक लागणाऱ्या गोष्टीवर त्याला पैसा खर्च करावा लागतो.

गिरणीतील मजूराहून त्याचा सामाजिक दर्जा मोठा आहे. त्याची मुले, त्याची बायको, त्याची राहणी, त्याची मान्यतेची कल्पना मजूराहून भिन्न यामुळे आर्थिक संकटातून निघण्याकरितां मजुराला ज्या गोष्टी करता येतात त्या शिक्षकाला त्याच्या दर्जामुळे करता येत नाहीत. प्रपंचाला पैसा कमी पडला तर मजूर पडेल ते काम करील पाटचा उचलील, हमाली करील, गटारे साफ करील. खोली मिळाली नाही तर फुटपाथवर रात्र काढील. जागा सापडली कीं चार वेळकुटचा उभा करून आडोसा निर्माण करील. दरिद्री मजूराला व खालच्या वर्गातील बेकाराला ज्या सवलती विधीनिशेध न मानता भोगता येतात, त्या शिक्षक वर्गाला घेता येत नाहीत. त्याचा दर्जा त्याला आड येतो.

मजूराला आपला पगार अपुरा पडला तर त्याची बायको गिरणीत कामावर जाऊ शकते. कोणा सुखवस्तूच्या घरी हलकी कामे करू शकते. मुलग्याला पोसणें जड झाल्यास त्याला मोल मजूरीवर पाठवता येतें. अशा प्रकारे मनांत आणल्यास प्राप्तीत भर घालता येते. त्याबद्दल त्याला कमीपणा वाटत नाहीं. मानसिक यातना होत नाहींत.

शिक्षकाला अशी भर तर घालता येत नाहीच पण या सर्वांना घरी बसवून पोसावे लागते. मुलांना कपडेलत्ते व शिक्षण द्यावे लागते. बायकोला कपडे राहणीला शोभण्याजोगे द्यावे लागते. हा सर्व खर्च अंगावर पडतो. या सर्व परिस्थितीचा विचार करता शिक्षकाच्या आवश्यक गरजा पुरवायच्या झाल्यास मजूराहून तरी त्याला जास्त पगार द्यायला हवा. कारण त्याच्या गरजा मजूराहून अधिक आहेत.

पगारवाढीसाठी मजूर सहजी संप करू शकतो. शिक्षकवर्ग हा सर्वत्र विभागल्यामुळे त्याची एकी होणें फार अवघड असते.

आणि सर्वांची मोठ्या प्रमाणांत एकी झाल्याखेरीज संप यशस्वी होऊ शकत नाहीं.

जवळ जवळ अशक्य अशी ही गोष्ट आज घडून येत आहे. शिक्षकांचे हाल पराकोटीला गेले आहेत म्हणूनच ही गोष्ट शक्य होत आहे. यांत असमंजसपणा, हटवादीपणा, अरेरावी असण्याचा तिळमात्र संभव नाहीं. उगाच अडवणूक करावी ही वृत्ती असणेंच शक्य नाहीं. संपाचे हे पहिलेच उदाहरण आहे. हा कांही प्रयोग म्हणून करण्यात येत नाही. यामुळें त्यांच्यावर उपासमारीचा प्रत्यक्ष प्रसंग येणार आहे. अगोदरच उपवासी असलेला मनुष्य हा प्रयोग सुखानें करीत नसतो.

हा उपवास म्हणजे भुकेल्या शिक्षकांची मानवतेला हाक आहे सरकार तर परकेच आहे पण जनतेवर ही एक जबाबदारी पडली आहे. शिक्षक संपावर असतांना त्यांना जगविणें व त्यांचा संप टिकवण्यासाठीं त्यांना सर्व प्रकारे सहाय्य करणें हे आम्हा सर्वांचे पवित्र कार्य आहे.

> किमान वेतन हा प्रत्येक मनुष्याचा जन्मसिद्ध हक्क आहे.
> मनुष्य हुषार असो किंवा जड बुद्धीचा असो.

अशिक्षित असो सुशिक्षित असो. साहित्यिक असो निरीक्षर असो. दोहोनाहि जगण्याचा हक्क आहे. ही प्राथमिक गरज दूर झाल्यानंतर मग त्याच्या वेतनात त्याच्या पात्रतेप्रमाणें चढउतार करता येईल पण कोणत्याहि सबबीवर त्याचा हा 'किमानवेतनाचा' म्हणजे जगण्याचा हक्क हिरावून घेता येणार नाहीं.

शिक्षकांचा हा प्राथमिक हक्कसुद्धां मान्य झालेला नाहीं! जगण्याच्या हक्कालाहि मान्यता दिलेली नाहीं. जनावरालासुद्धां

किमानवेतन द्यावं लागतं. पोटापुरतं घालावं लागतं. त्याखेरीज ते पाऊल उचलत नाही. एखादा बैल म्हैंद असेल, दुसरा तल्लख असेल पण दोघानाहि जगवावं लागतं.

शिक्षकाना आपण जनावराहून तरी वरच्या दर्जाचे मानायला नको काय ? पण तेही मानले जात नाही. जगू देत नाही. मरू देत नाहीं !! अशी पाळी शिक्षकावर यावी हा राष्ट्राचा केवढा अध:पात !!

तेव्हां उपकार म्हणून नव्हे तर आपले कर्तव्य म्हणून, आपला स्वार्थ म्हणून भावी पिढीच्या कल्याणासाठी म्हणून व देशाच्या विकासासाठी म्हणून हा प्रश्न समाधानकारक सोडविला जाईल अशी प्रत्येकाने खटपट केली पाहिजे.

■ ■ ■

# जत संस्थान प्रजापरिषद

अध्यक्षीय भाषण—१४-९-४६

(सारांशानें)

दलित वर्गाच्या उन्नतीआड ज्या व्यक्ती किंवा जो वर्ग येत असेल त्या विरुद्ध बंड करणें हे मी माझे जीवित ध्येय समजतो. दलित वर्गाच्या उद्धाराकरिता प्रजापरिषद हे एक साधन आहे असे मी मानत आलो आहे.

या दलित वर्गाच्या उन्नतीआड केवळ राजाच येतो असे नाहीं. बुद्धीच्या, संपत्तीच्या व सत्तेच्या जोरावर दुसऱ्यास राबवून स्वत:

सुखानें जगणारा परोपजीवी वर्ग हा श्रमजीवी समाजाच्या उन्नती-आड येत असतो. या सर्वांच्या गुलामगिरीतून मुक्त होणें हेच आपल्या चळवळीचे ध्येय राहिले पाहिजे. केवळ राजसत्ता नाहीशी होण्यानें बहुजन समाजाची गुलामगिरी नाहीशी होईल असे कोणी समजू नये

अलीकडें जातिभेदातीत मानले गेलेल्या व राष्ट्रीय समजलेल्या छोटयामोठया संस्थेतही हा जातिवाद निराळया स्वरुपानें शिरू लागला आहे. लायकीच्या निमित्ताने सर्व जागा आपल्या पदरी पाडून घेण्याचा अल्पसंख्य सुशिक्षित वर्ग 'जातिभेदातीत' दृष्टीचे सोंग करून जागा पटकावतो. यामुळें मागासलेल्या जातीतील सुशिक्षित दुखवले जातात व मग जातिवादाचा फैलाव वाढत जातो.

लायकीची एक ठराविक अट घातल्यानंतर पुनः ही मालकी परिक्षेतील मार्काच्या तराजू पर्यंत ओढत नेली तर शिकलेल्या हरिजनांना सुद्धा सरकारी नोकरीची आशा धरणें अशक्य होऊन जाईल.

> विशेषतः हरिजनांच्या बाबत तरी मी असे सांगू शकेन की, या वर्गातील सुशिक्षिताकडे कांहीं काळ तरी पक्षपातानेच पाहिले पाहिजे.

त्याना जादा सवलती देणे भाग आहे. या वर्गातील माणूस कलेक्टर, मामलेदार, फौजदार, रजिस्टर या जाग्यावर आल्यास अस्पृश्यता निवारणेला मदत होईल. म्हणून केवळ हरिजनच नव्हे तर सर्वच मागासलेल्या वर्गाकडे या दृष्टीनें पाहिले पाहिजे.......

> आतां राजापासून टप्याटप्यानें राजकीय हक्क मागण्याचे दिवस गेले.

आतां राजे लोकांनी ताबडतोब आपली सत्ता प्रजेच्या हवाली करणें हेंच धूर्तपणाचे आहे. व आपण इतर माणसाप्रमाणेंच एक आहोत

असे समजून वागले पाहिजे. राजे यापुढें व्यक्तिशः टिकणार नाहींत व संघ बनवूनहि टिकणार नाहींत...... यानंतर

कार्यकर्त्यांना इशारा देतो कीं, आपल्या देशात वेगळी लोकशाही स्थापन व्हायची नसेल तर श्रमजीवी समाजात लोकशाहीची पाळेमुळे गेली पाहिजेत.

ग्रामपंचायत हा राजकीय शिक्षणाचा श्रीगणेशा आहे. समानसत्ताक राज्यपद्धतीची पार्श्वभूमि या ग्रामपंचायतीने निर्माण करतां येईल.

■ ■ ■

## कोल्हापूर संस्थान प्रजापरिषद मध्यवर्ती सभेतील

माधवराव बागल यांचे भाषण

( सारांश )

१९ डिसें. १९४६ (अखंड भारत)

आतापर्यंतचे सर्व लढे करवीर जनतेने आपल्याच ताकतीवर दिले आहेत. लढ्याचे नियंत्रण व मार्गदर्शन करवीर जनतेनेच केले आहे. कॉंग्रेसनें किंवा बाहेरील संस्थेनें अधिकृत असे सहकार्य दिलेले नाहीं. बाहेरच्या मदतीवर आम्ही अवलंबून राहिलो असतो तर आमची शक्ती आज जशी वाढली आहे तशी वाढली नसती. आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याची हिंमत ज्याचे अंगी नसते त्याला दुसऱ्याची मदत कल्याणकारी होत नसते.

मावळ्यांच्या टोळ्यांनी ज्या साम्राज्याचें सिंहासन खिळखिळें केले त्यांचेच आम्हीं वंशज आहोत. स्वराज्यासाठी सर्वस्वाचा होम करण्याची शिकवण आम्हाला शिवछत्रपतींनीच दिली आहे. स्वराज्यासाठी अन् स्वातंत्र्यासाठी बलिदान हेच आपल्या जन्माचे सार्थक समजणारे तुम्ही वीर आहात.

तुम्हाला मी विसावा देणार नाहीं. आपले ध्येय साध्य होईपर्यंत आम्हाला विसावा घेता येणार नाहीं.

आपण तयार असल्याची ग्वाही नागरिकांनी तर केव्हाच दिली आहे. अपयशाची कल्पनाही मनाला शिवू देऊ नका. अपयश कुणाला ? जे प्रयत्न करीत नाहीत त्यांना ! प्रयत्न हेच यश आहे. यश–अपयश हे ध्येयाच्या मार्गातले टप्पे होत. जनता तयार आहे. असंतोषाचे कोठार भरले आहे. फक्त ठिणगीच पडायची फुरसत. जनता फक्त आदेशाची वाट पहात आहे. जे पूर्वीं पुढें आले नव्हते असे अनेक नवे तरुण पुढे सरसावल्याखेरीज राहणार नाहींत. कार्यकर्त्यांची उणीव भासू देणार नाहीत. ठिणगीचा प्रचंड वणवा दिसू लागेल.

मात्र लढा शांततेनें अहिंसेच्या धोरणानें व शिस्तीनें चालेल अशी खबरदारी घ्या. यातून प्रतिसरकार स्थापन करु. हत्येशिवाय सत्ता बळकाऊ.

मजूरांनी फार तर प्रथम व्यक्तिविषयक भाग घ्यावा. पण खास आदेशाशिवाय संप पुकारू नये. संप व सारावंदी ही लढ्याचीं निर्णायक अवस्था होय.

पुढारी पकडल्यानंतर जनतेनें हातपाय गाळू नयेत. चळवळ चालू झालीं की पुढाऱ्यांची वाण पडत नाही. अनपेक्षित भागातून वीर

सरसावतात. आज जमलेले बहुतेक सर्व कसलेले लढवय्ये आहेत. नवे तयार होत आहेत. त्या सर्वांचे मी नव्या लढ्यासाठी स्वागत करूं इच्छितो. व त्यांना तात्काळ कामास लावू इच्छितो.

लढाव कार्यक्रम जाहीर करण्यांत आला आहे. माझ्या कार्यकारी मंडळात कसलेले लढवय्ये असल्यामुळे प्रजापरिषदेच्या आजपर्यंतचा लौकिक राखण्यास ते आपल्या जिवाची कुर्बान केल्याखेरीज राहणार नाहींत. येथे दुर्बलांचीं भाषा एकाच्याही तोंडून निघणार नाहीं अशी मला खात्री आहे.

अनेंकाना शिक्षा होतील. पण शिक्षा झालेल्यानी आपल्याला प्रजापरिषद सोडवून घेईल ही भावना टाकून लढ्यात भाग घेतला पाहिजे. म्हणजें तुमच्यावर पश्चातापाची पाळी कधीही येणार नाहीं. आपण जनतेच्या स्वातंत्र्यासाठी लोकांच्या कल्याणासाठी लढत आहोत. या एकाच भावनेने लढ्यात भाग घेतला पाहिजे. युद्धातला शिपाई परत सुखरुप येण्यासाठी लढत नसतो. तो मागचा विचार करीत नसतो. याच धैर्यानें व निश्चयानें आपण लढ्यास सुरवात केली पाहिजे.

■ ■ ■

## छत्रपतींनी शेतकरी-कामकरी राज्यात अडथळे आणले तर—

भाई माधवराव बागल यांचे भाषण.

अध्यक्ष- शंकरराव मोरे.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ दि: ........
........ नों: दि: ........

११-३-४८ (दैनिक पुढारी)

"कोल्हापूर संस्थान हिंदी संघराज्याचा एक स्वतंत्र व स्वायत्त

घटक रहावे असे ज्यावेळी आम्हीं म्हणतो त्यावेळी प्रजापरिषदेचे ध्येय लक्षात घेतले पाहिजे. १९३९-४० पासून किंबहुना त्याहिपेक्षा अगोदर पासून आज अखेर प्रजापरिषदेचे ध्येय छत्रपतींच्या हातातील सत्ता जनतेच्या हाती द्यावे हेच होते. यासाठींच संपूर्ण जबाबदार राज्य पद्धतीसाठीं अनेक हुतात्म्यानी रक्त सांडले.

इंग्लंडच्या राजाप्रमाणेच छत्रपति नामधारी राजे रहावेत व शिवछत्रपतींच्या परंपरेनुसार शेतकरी मावळ्यांची सत्ता कोल्हापुरात प्रस्थापित करावी याचकरितां आजवर प्रजापरिषदेनें अनेक लढे दिले. शिवछत्रपतीनीं राजमंन्यास म्हणजेंच राज्य उपभोग मानून, महाराष्ट्राची गुलामगिरी नष्ट करून स्वातंत्र्य सपादन केले. भगवा ध्वज हा त्याचं त्यागी राज्यसंन्यासाचा प्रतीक आहे छत्रपतींची व्यक्तिविषयक अंधभक्ति आम्ही मानीत नाहीं... वैयक्तिक भोग घेणाऱ्या छत्रपतींच्याकडे आम्ही पहात नाही.

"शेतकरी–मजुरांचे राज्य प्रस्थापित करण्याच्या मार्गांत छत्रपति शहाजी महाराजानी जरी अडथळा निर्माण केला तर कोल्हापूर हे रिपब्लिक म्हणजे राजा नसलेले राज्य म्हणून घोषित करू. राजाला सांगू, बाजूला व्हा. मला आशा आहे, खात्री आहे कीं आपण समाजसत्तावादी सरकार निर्माण करू. आमची छत्रपतींचे हुजरे म्हणून राहण्याची इच्छा नाहीं.' (११–३–४८ दै. पुढारी)

"मुंबई प्रांतात कॉंग्रेसचे राज्य असूनही अद्याप तेथें समाजसत्तावादी राज्य स्थापन झालेले नाही. त्या ठिकाणी बहुजनसमाजाच्या विकासाला वाव नाहीं."— आमचे मंत्रीमंडळ हे गिरणीवाल्यांचे अगर सावकारांचे प्रस्थ चालू न देणारे आहे. आम्ही

जातिभेद मोडून आमच्या मनाप्रमाणें कोल्हापूर हे केंद्र निर्माण करू. सत्तेचे विकेंद्रीकरण, राजकीय तसे आर्थिक झालें पाहिजे.-

> आम्हाला समतेचे रामराज्य स्थापावयाचे आहे.- मुंबईच्या अगोदर आम्ही कोल्हापुरात शेतकरी-मजूर राज्य स्थापन करु अशी आमची महत्वाकांक्षा आहे.

शेतकरी-मजूर राज्य स्थापण्याचे ध्येय गाठण्यासाठी विलिनीकरण नको. महाराष्ट्र जर झब्बुशाही व भांडवलशाही लोकांच्या हातात जाणार असेल तर त्यांतही आम्ही विलीन होणार नाही. महाराष्ट्र जर समाजवादी तत्वावर तयार होईल तर त्यांत आम्ही विलीन होऊ."-- (१०-३-४८ दै. सत्यवादी)

◆ ◆ ◆

## द्विभाषिक विरोधी परिषद मुंबई

उद्घाटक- भाई माधवराव बागल यांचे भाषण

( नवयुग ७-८-५६ )

आपण माझी निवड करून बहुजन समाजांतील सर्वसामान्य माणसालाच महत्त्व दिलं आहे हें सर्वसामान्य माणसाचंच आहे. आजच्या राजकारणातहि वरपांगी कां असेना, त्यालाच स्थान देण्यांत येत आहे. पुढाऱ्यांचा मोठेपणा, त्याचं स्थान त्यांच्यावरच अवलंबून आहे. तो समाज जाणता झाला तर राज्याचं वळण देण्याचं सामर्थ्य त्यांच्यातच आहे. सुदैवानें हा जाणतेपणा संयुक्त महाराष्ट्र प्रश्नामुळे त्यांच्यांत येऊ लागला आहे. जनता आतां पुढारीपण आपल्याकडं घेऊं लागली आहे.

'संयुक्त महाराष्ट्र समिती' हेच जनतेच्या पुढारीपणाचं मूर्त स्वरुप आहे.

> सं. महाराष्ट्र समिती म्हणजे सामुदायिक नेतृत्व त्याच तिच्या हाकेला ओ देऊन आपण सर्व आला आहांत.

त्या संयुक्त महाराष्ट्र परिषदेचा एक देवडीवरचा शिपाई म्हणून, केवळ पडदा उघडण्यासाठीं म्हणून मी येथें आलो आहे. तुम्हां सर्वांचं स्वागत करण्याचं काम माझं! भक्तिभावाने मी सर्वांना हाक मारतो. या! सारे या! तुम्ही कोणत्याहि धर्माचे असा, कोणत्याहि जातीचे असा, कोणत्याहि मताचे असा, कोणत्याहि पक्षाचे असा. तुम्ही महाराष्ट्राचे अभिमानी असलात म्हणजे पुरे. सं. महाराष्ट्र परिषद, सर्वांचे.

आपला लढा सात्विक आहे. आपल्या मागणीमागें कसलीहि द्वेषबुद्धी, संकुचित वृत्ति नाहीं, काँग्रेसने ती इंग्रजी राजवटीपासून पुढे केली आहे. टिळक, गांधी, नेहरू यांनी तिचा पुरस्कार केला आहे. इंग्रजी राज्यापासून तो यावेळेपर्यंत गेल्या १०० ते १५० वर्षांत बहुभाषिक राज्याचा आम्हाला अत्यंत कटू अनुभव आला आहे. आपलं राज्य झाल्यानंतर ही अडचण दूर होईल या विश्वासानें महाराष्ट्र काँग्रेसकडे पहात होतो, पण ती काँग्रेस व तिचे पुढारीच आमच्यावर उलट गेले. भाषिक राज्य हा सर्वसामान्य जनतेच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे.

प्रांतिक राज्यकारभार मायबोलींतून चालल्याखेरीज, लोकशाहीची खरीखुरी वाढ होऊं शकत नाही. आपला, नागरिक, सांस्कृतिक राजकीय व आर्थिक क्षेत्रांत, विकास मायबोलीच्या आधारे करतां येतो. जनतेच्या सततीची देवघेव मायबोलीखेरीज सोईची जात नाहीं. संघटना बांधता येत नाहीं. विचारांची देवघेव करता येत नाहीं.

आपल्या कृतीचा मेळ घालता येत नाहीं. यामुळे राष्ट्रीय योजना अपेक्षेप्रमाणें पार पाडता येणार नाहींत. राष्ट्राची शक्ति बळकट होणार नाही. संरक्षणाच्या दृष्टीनेंहि देश कमकुवत ठरेल.

या सक्तीच्या एकजुटीनें महाराष्ट्राचे अपरंपार नुकसान होणार आहे.

> पूर्वीहि द्विभाषिकनें आपले कल्याण झाले नाहीं. महाराष्ट्राचं रक्तशोषण भरपूर झालं आहे. महाराष्ट्राच्या श्रमाचा व संपत्तीचा महाराष्ट्राला उपयोग झाला नाहीं. सत्तेचाहि अपहार भांडवलवाल्या धार्जिन मंत्र्यानी आपल्या विभागासाठी करून घेतला. महाराष्ट्र सत्तेनं व संपत्तीनं कमकुवतच राहिला.

आम्हाला वर डोकं काढू दिलं नाहीं. याचा कटु अनुभव आल्यामुळेंच द्विभाषिकाच्या निर्णयाविरुद्ध आम्हाला झगडावे लागत आहे. हे ध्येय साध्य झाल्याखेरीज हा लढा कधीहि थांबणार नाहीं. ही मुंबईच्या केवळ गुजराथी भांडवलवाल्यांच्यासाठीं केलेली कारवाई आम्ही उलथून पाडल्याखेरीज राहणार नाहीं. नेहरू आणि ही काँग्रेस आम्हाला सक्तीनें गुजराथी भांडवलवाल्यांच्या राजकीय व आर्थिक वर्चस्वाखाली जबरीने घालत आहेत. लोकांना चकवण्याकरितां आतां लोकांची हे दिशाभूल करीत आहेत.

ज्यांची भाषा एक नाहीं. ज्यांचा पेहरावा एक नाहीं. ज्यांचे खाणें एक नाही. राहणीं सारखी नाही. एक राष्ट्रदैवत नाहीं. त्या दैवताबद्दल अभिमान नाही. उलट द्वेषच केला जातो. अशानी कौटुंबिक भावनेंनं रहा म्हणणं हा कोणता शहाणपणा ? आमची भाषिक विभागाची राज्यसत्ता आमच्या हाती असल्याखेरीज आमचा सर्वांगिण विकास होणें शक्य नाहीं. समाजवाद आणता येणार नाहीं व समजणार नाहीं. आम्हाला शांतता, सहकार्य व स्नेहभाव शेजाऱ्याशी

राखावयाचा आहे. त्यासाठीं आम्हाला आमच्या पायावर उभं राहतां आल पाहिजे. हे सक्तीचे कलम कधीहि वाढणार नाही. आम्हाला कांही मुलुखगिरी करावयाची नाही. बहुसंख्येच्या जोरावर दुसऱ्यावर हुकमत चालवावयाची नाही. आम्हाला केवळ आमची उन्नति करून घेऊन देशाची शक्ति वाढवायची आहे.

एकूण जगाची परिस्थिती बदलली आहे. भांडवलशाही राष्ट्रातीलहि सामान्य जनता समाजवादाकडे झुकूं लागली आहे. खुद्द भांडवलशाही राष्ट्रेंहि समाजवादी तत्त्वें अमान्य करू शकत नाहींत.

हिंसा, अत्याचार, दंगा या मार्गांला विरोध करून, शांततेच्या, अहिंसेच्या, लोकशाहीच्या मार्गाने आपले ध्येय साध्य करील! यशापयाशाचा विचार न करतां सत्यासाठी सतत झगडावे हे कर्तव्य मानून सर्व शक्ति एकवटूंया. शिवराय आपल्याला मार्गदर्शक आहेत. ती शक्ति आम्हांला सतत प्रेरणा देत राहील."

भाई माधवराव बागल यांचा

## मॉडर्न आर्टवरील तुफानी हल्ला

जी कला जीवनाचे वस्तुनिष्ठ स्वरुप दाखवू शकत नाही
ती खरी कला नव्हे, ते खरे चित्र नव्हे !

राज्य कला प्रदर्शनांतील भाई माधवराव बागल यांचे भाषण

( सत्यवादी ता. १३-३-१९६६ )

( महाराष्ट्र राज्यातील ९ वे कला प्रदर्शन कोल्हापूरला भरणें आणि त्याचे उद्‌घाटन भाई माधवराव बागल यांनी करणें हा मणिकांचन योग म्हणावा लागेल.

भाई माधवराव बागल यांचे व्यक्तिमत्व अष्टपैलू आहे. ते खडतर राजकारणी, पट्टीचे लेखक व वक्ते, सामाजिक कार्यकर्ते, निष्ठावंत देशसेवक इत्यादि अनेक नात्याप्रमाणेंच उत्कृष्ट चित्रकार म्हणूनहि ते प्रसिद्ध आहेत. प्रदर्शनाच्या उद्‌घाटक पदावरून भाई माधवराव बागल ह्यानी केलेले भाषण म्हणजे कला आणि तिची निर्मिती याची सुबोध व्याख्याच म्हणावी लागेल. 'मॉडर्न आर्ट' वरील त्यांनी उठवलेली झोड विद्वानांना विचारात घेण्यासारखी आहे माधवरावांची कलेची व्याख्या मराठमोळ्या माणसासारखी साधी आहे. )

मला या भव्य प्रदर्शनाचे उदघाटन करण्याचा मान प्रदर्शनाच्या मध्यवर्ती कमेटीने दिल्याबद्दल त्यांचे व महाराष्ट्र सरकारचे गृहमंत्री बाळासाहेब देसाई, शिक्षण मंत्री ना चौधरी आणि ज्यांनी हे प्रदर्शन यशस्वी करण्याकरता अहोरात्र श्रम घेतले त्या चित्रकार आणि कार्यकर्ते यांचे मी आभार मानतो.

माझ्या जीवनप्रवाहाबरोबर मी अनेक विषयांत प्रवेश केला तरी या मंदिरात प्रवेश करताना मी माझ्या माहेर घरी आल्याचा मला भास होतो. घारीनें गगनांत कितीहि भराऱ्या मारल्या तरी तिची ओढ घरट्याकडे लागलेलीच असते.

कोल्हापूरचा निसर्ग, त्यातील मनोहर दृश्ये, सुंदर शिल्प, मूर्ति आणि रम्य स्थानें, मला मित्राप्रमाणें जवळची वाटत आली आहेत. त्यांना भेटण्याकरता माझा जीव नेहमीच आतूर असतो.

निसर्गालाच मी सदैव गुरुस्थानी मानत आलो आहे.

पंचगंगेनें, रंकाळयानें, पन्हाळयाने, देवालयातील शिल्पानी मला चित्रकलेचे पाठ दिले आहेत. आनंद दिला. स्फूर्ती दिली. तंत्राचीसुद्धा माहिती करून दिली. एकंदर समाजजीवनानें एक प्रवृत्ती निर्माण केली. दृष्टीकोन दिला.

संध्यासमयी पंचगंगा घाटावरच्या पायरीवर बसून पाण्यांत पाय सोडावेत,निसर्गाशी एकरूप होऊन संध्या करावी. निरोप घेणाऱ्या दिनराजाला अर्घ्यं द्यावे व त्याने प्रसन्न होऊन ओतलेले रत्नभांडार हृदयाच्या तिजोरीत भरून घ्यावे !

अन् त्या रंकाळ्याचे दृश्य.

जललहरीवरुन अंगाला चाटून जाणारा गार वारा, मन रिझवण्यासाठी नवरत्नांचे घुंगुर बांधुन, लाटेवर नाचत येणाऱ्या जलदेवता, त्याच रंकाळ्याचे काठावर तुम्हां सर्वांचे स्वागत करण्यास उभा राहिलेला शालिनी पॅलेस व धार्मिकाना जवळ बोलावणारा शुचिर्भूत संध्यामठ.

नगराच्या मध्यवस्तीत कौस्तुभाप्रमाणें बसवलेले, हिंदी कला संस्कृतीने विलोभनीय जगदंबा मंदिर, ठिकठिकाणी शहराला शोभा देणारे थोरांचे पुतळे, राजैश्वर्याची आठवण करून देणारा व इतिहास कालात नेऊन ठेवणारा जुना राजवाडा व भव्य नगारखाना, आधुनिक युगात नेऊन सोडणारे राजाराम महाविद्यालय.

कोल्हापूरची थोर कला परंपरा निर्माण करणाऱ्या महर्षि आबालाल रहिमान, बाबुराव पेन्टर, रा. ब. माधवराव धुरंधर यांची स्मृति.

या साऱ्या मूर्त अमूर्त गोष्टी म्हणजे कलावंतांची स्फूर्तिस्थानें होत. ही थोर परंपरा पुढें चालवण्याचे पवित्र कार्य चित्रकारांची आजची पिढी मोठ्या त्यागानें व जिद्दीनें करीत आहे सरकार नाहीं विवेचक बुद्धी शाबूत ठेवून, जुन्या नव्यातले चांगले ते घेऊन व नको ते टाकून प्रगतीची वाटचाल केली पाहिजे. जुन्याचा तसा नव्याचा खोटा अभिमान बाळगू नये. या वृत्तीची मी सर्वांपासूनच अपेक्षा करतो.

मदतीचे अगोदरच त्यांनी–१) दळवीज आर्ट इन्स्टिटयूट, २) कला-निकेतन, ३) कलामंदिर, ४) सिद्धार्थ आर्ट एज्युकेशन सोसायटी या चित्रशाळा चालविल्या आहेत. सर्वांना एकत्रित आणण्याचे कार्य राजाराम आर्ट सोसायटी ही पितृसंस्था करीत आहे.

या सर्व शक्ति संघटित करून कोल्हापुरच्या थोर परंपरेला भारतात मान, स्थान प्राप्त करून देण्याचे पवित्र कार्य शिवाजी विद्यापीठानें केले पाहिजे. सरकारनें शिवाजी विद्यापीठांत चित्रकला महाविद्यालयाचा समावेश केलाच आहे. कुलगुरुनी आता त्याला मूर्त स्वरूप द्यायचे आहे. शिवाजी विद्यापीठात इतर विषयांच्या शाखेबरोबर या शाखेची इमारत व म्युझियम बांधली पाहिजे. तरच एकंदर शिवाजी विद्यापीठाच्या ध्येयाला पूर्णत्व प्राप्त होणार आहे. सरकारनें औंधची म्युझियम येथे आणून ती उणीव भरून काढावी अशी मी विनंती करतो.

आर्टस् कॉलेजला महाराष्ट्रांत इतकी अनुकूल परिस्थिति कोठेही मिळणार नाही.

याचवेळी मला कोल्हापूरच्याच नव्हे तर सर्वच कलावंताना व सरकारला नम्रपणें आग्रहाच्या कांहीं सूचना कराव्याशा वाटतात. कलाप्रेमी जनतेनेही त्याचा विचार करावा.

मी एक जुन्या पिढीतला माणूस आहे. कलावंताच्या प्रांगणांतून गेलो आहे. कोल्हापुरच्या व महाराष्ट्राच्या पहिल्या श्रेणीतल्या कलावंतांच्या सहवासांत राहिलो आहे. अजंठा वगैरे पुरातन हिंदी कलेकडेही आदराने, भक्तीनें व अभिमानाने पाहिले आहे. पाश्चिमात्य कलेचाही अभ्यास, निरीक्षण व वाचन केले आहे.

पूर्वीच्या कलेचा मला अभिमान वाटतो पण अंधभक्तीनें कोण-त्याहि कलापद्धतीचा व तंत्राचा स्वीकार करावा असे मला वाटत

अजंठा चित्रांची उत्कृष्ट आऊट लाईन, रंगाची काटकसर व साधेपणा, कलाद्वारे कांही तत्वज्ञान सांगण्याचा, धडपडत्या समाज परिस्थितीचे चित्रण या गोष्टी सदैव अनुकरणीय राहणार.

त्यानंतरच्या पिढीनें पाश्चिमात्यांच्या तंत्राची, रंग संशोधनाची व पर्स्पेक्टिव्ह वगैरेच्या ज्ञानाची भर घालून आपली राष्ट्रीय कला समृद्ध केली.

आबालाल रहिमान, बाबुराव पेन्टर, माधवराव धुरंधर, हळदणकर, आगासकर, त्रिदाद, नंदलाल बोस, अबनींदनाथ टागोर या चित्रकारांनी व करमरकर, तालीम, म्हात्रे या शिल्पकारांनी पौर्वात्य आणि पाश्चिमात्य कलेचा गोड समन्वय घडवून आणला निसर्ग, पोट्रेट, डिझायन, शिल्प वगैरे विषयांत आपआपले वैशिष्ठ्य स्थापन केले.

सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे थोर प्रिन्सिपाल ग्लॅडस्टन यांनी या समन्वयाला चालना दिली व आपल्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट चित्रे काढून घेतली. मुंबई सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टचा दर्जा भारतात वाढविला व ते लोण दिल्ली, लंडनपर्यंत पोहोचवले.

-

पण जिरार्ड नांवच्या भारतद्वेष्टया त्याच शाळेच्या प्रिन्सिपालने ही प्रगती न पहावून आपल्या कलेला भलत्याच दिशेकडे नेण्याचा अश्लाघ्य प्रयत्न केला. आपल्या महाराष्ट्रीय कलेला अनिष्ट वळण लावले. नव्या पिढीला प्रत्यक्षाच्या आभासापासून, अभ्यासापासून, आऊट लाईनपासून पारखे केले. ही मॉडर्न आर्ट म्हणजे एक थातुर मातुर होऊन बसले आहे. प्रत्यक्ष जीवनापासून ती कला दुरावली आहे. त्यामुळें आर्थिकदृष्टयाही चालू पिढीचे नुकसान होत आहे. यामुळें राष्ट्राचे तसे समाजाचेही नुकसान होत आहे. त्यांचे जीवन फुकट जात आहे. कांहीं नामांकित चित्रकारही या वेडाच्या आधीन

जाऊन त्याच अर्थशून्य, दुर्बोध व समाजाला निरुपयोगी अशा या कलेचे समर्थन करीत आहेत.

लेखणी, ताणी, व कुंचला ही समाजसेवेची साधने होत. तीच निरुपयोगी आणि बोथट करून टाकली तर समाजाचे न भरून येणारे नुकसान होणार आहे. अमेरिकेतील भांडवलवाल्यानी या कलेला उचलून धरून जनतेच्या सेवेचे व जागृतीचे हे हत्यार बोथट करून टाकले आहे. हे सारे आज मॉडर्न आर्टचे नावाखाली चाललेले आहे.

आयर्लंडच्या स्वातंत्र्याची कवने शेलेनें रचली आणि इटलीच्या स्वातंत्र्यासाठो तो जातीने लढला. बायरनें ग्रीसच्या स्वातत्र्य युद्धांत स्वतःचा बळी दिला. फ्रान्सच्या व्हिक्टर ह्युगोनें हुकुमशाही राजवटीचे जुलूम चव्हाटयावर आणले. डीकन्सनें उन्मत्त सरदारशाहीला उघडे पाडले. तुर्गेनेव्ह तर रशियन क्रांतीचा जनक, तर गोर्की समाजसत्तेचा प्रणेता, इंग्रजी लेखक राल्फ फॉक्स, कॉनफोर्ड, कॉडवेल यानी तर रणांगणावर देह टाकला !

चित्रकारानींही क्रांतीला असेच सहाय्य केले आहे. जर्मन युद्धावेळी दोस्त राष्ट्रातील कलावंतानो कलेच्याद्वारे जागृती केली. त्यावेळी बेलजमच्या चित्रकारानें काढलेले चित्र माझ्या डोळ्यासमोरुन हलत नाहीं. त्या चित्राचे वर्णन तेथे केले आहे.

हे चित्र नाही तर जुलूम सहन करणाऱ्या राष्ट्रीय भावनाची कर्णकठोर किंकाळी आहे

I can Delville
चित्रकार

गोयाने आपली सहानुभूति देशभक्तिपर भावनांतून आणि भयानकता युद्धचित्रातून दाखवली आहे.

डेले क्रो ची चित्रे बंडखोरी उत्पन्न करतात.

Millet ने शेतकऱ्याचे जीवन चित्रित केले.

— टर्नर कोरो.

अशी ही लेखणी व कुंचल्याची शक्ती मॉडर्न आर्टनें निष्प्रभ करून टाकली आहे.

या मॉडर्न आर्टला आधुनिक कला असे म्हणता येणार नाही. ही एक विकृती आहे. नव्या नव्या शोधांनी संशोधनानें व तंत्रानें समृद्ध झालेली ही कला नव्हे.

जी कला सामान्य माणसाना समजत नाहीं. सुखदुःख, राग, चीड, आनंद देत नाहीं, जागे करीत नाहीं. ती राष्ट्रीय कला या सदराखाली मोडू शकणार नाहीं.

साहित्य वाचणाऱ्याला समजेल. वाणी भाषा समजणाऱ्याला समजेल. पण कला हां डोळे असणाऱ्या जगातील कोणत्याहि देशाच्या माणसाला समजू शकते. म्हणून हे साधन देशाचाच नव्हे तर मानव जातीची सेवा करण्यास समर्थ आहे.

कलाकृतीतून त्या त्या वेळच्या समाज जीवनाचा, समजुतीचा निष्ठांचा, गरजांचा, महत्वाकांक्षेचा आणि ध्येयाचा आविष्कार झाला पाहिजे. अशी कला गूढ, अगम्य अन् दुर्बोध असू शकणार नाही.

टॉलस्टॉय म्हणतो—कलावंतानें बहुजन समाजाचे झाले पाहिजे. महापुरुष हा बहुजनसमाजाचाच असतो. त्यांच्यासाठी तळमळतो त्याच्याजवळ जी साधने आहेत, त्या साधनानी जनतेचे हृदय जागृत करण्याची खटपट करतो. कलेने जर हृदय हलत नसेल, वृत्ती उचंबळत नसतील तर प्रेक्षक अप्रबुद्ध आहे असे म्हणण्यात कांही अर्थ नाही.

अशा या दुर्बोध, विक्षिप्त आणि विकृत मॉडर्न आर्टचा आपल्या राष्ट्रीय विद्यालयांत सरकारनें शिरकाव करु देता कामा नये.

या मॉडर्न आर्टबद्दल प्रसिद्ध तत्ववेत्ता व टीकाकार बेलेन्स्की म्हणतो–

" मॉडर्न आर्ट म्हणजे निराशावाद आणि संभ्रम यांचे रोगट मिश्रण "

प्रसिद्ध टीकाकार व कलेचा अभ्यासू कॉडवेल म्हणतो–

" स्वप्नाळू मनुष्याच्या कल्पना म्हणजे कला नव्हे. "

रशियाचा जगमान्य लेखक मॅक्झिम गोर्की म्हणतो–

" उत्कृष्ट कलेची वाढ होण्याला कलेचे लोकाशी साम्य असणें आवश्यक आहे. "

क्लटन ब्राक– " केवळ कलावंतानेंच कलास्वाद घ्यायचे ठरविले तर ज्याने कलानिर्मिती केली त्याच्याखेरीज कोणालाच पूर्णपणे कलास्वाद घेता येणार नाही असा निष्कर्ष काढावा लागेल."

स्टीफन झ्वीग– " कला जेव्हां लोकांच्या जीवनाचे आकर्षण बनते तेव्हांच ती अत्युच्च शिखरावर पोचते.

लेनीन– ' कला लोकांची असली पाहिजे. काबाडकष्ट करणाऱ्या जनतेच्या खोलवर मुळापर्यंत तिचा शिरकाव झाला पाहिजे. लोकांना ती समजली पाहिजे व लोकांनी तिच्यावर प्रेम केले पाहिजे. जनतेच्या भावना, विचार आणि मनांचा संगम कलेत होऊन लोकांची तिच्यामुळे प्रगति झाली पाहिजे. '

आता या मॉडर्न आर्टच्या नांवाखाली काय गोंधळ चालला आहे तो पाहू. किती हास्यास्पद प्रकार चालले आहेत ते खालील उदाहरणावरून कळून येईल.

खालील मजकूर २८ आक्टोबर १९४३ च्या महाराष्ट्र टाईम्स-मध्ये आला आहे.

अमेरिकेतील एका वैद्यकीय केंद्राच्या सज्जांत लाकडांच्या फळयांचे तुकडे भिंतीशी रचून ठेवले होते. त्याभोवती लोकांची गर्दी उसळली होती. त्या फळयावर निरनिराळया रंगाच्या आकृती दिसत होत्या. त्यातून कांही प्रेक्षकांना नवचित्र कलेचा साक्षात्कार झाला. कोणीतरी चित्रकाराच्या कलाकृतीचे प्रदर्शन भरवण्याचीच ही तयारी असावी असे त्यांना वाटले आणि गुणग्राहकतेच्या आणि रसिकतेच्या बाबतीत आपण मागे पडू नये म्हणून अनेकांनी तेथल्या तेथे त्या चित्रकृती खरेदी करण्याची तयारी दाखविली.

पण त्यांचा लवकरच भ्रमनिरास झाला. त्या केंद्राचे नोकर तेथे आले. त्या फळया कचऱ्याच्या ट्रकमध्यें टाकल्या आणि घेऊन गेले.

हॉस्पीटलमधील उपकरणाना आणि साधनाना, फवारा उडवून रंग देतेवेळीं ज्या एका लाकडी भिंतीवर शिडकावा झाला होता ती भिंत पाडण्यांत आली होती व तिचे ते तुकडे कचऱ्यात फेकण्यापूर्वी तेथे रचून ठेवले होते.

आणखी एक प्रकार, आश्चर्य वाटण्याजोगा घडून आला.

मॉडर्न आर्टच्या माटिसे म्युझियममध्यें गेल्या सप्ताहपर्यंत एक चित्र उलट टांगले होते. मॉडर्न आर्टच्या १,१६,००० वर

चाहत्यांनी ते पाहिले. परंतु त्यापैकीं एकालाहि त्यांत कांही चूक आढळली नाही.'

– टाइम्स ऑफ इंडिया १३-१२-१९६१

पिकासो हा या मॉडर्न आर्टचा जनक मानला जातो. त्याने आपल्या ८३ व्या वर्षी स्वतःच्या कलेविषयी कबुली जबाब दिला आहे. तो म्हणतो–

समाधान किंवा स्फूर्ति मिळविण्यासाठीं हल्लीचे सर्वसाधारण लोक कलेकडे पहात नाहीत. परंतु श्रीमंत आणि रिकामटेकडे लोक मात्र कांही तरी नवे, चमत्कारिक, नैतिकतेला धक्का देणारे असे कलेत सापडेल म्हणून शोध घेत असतात, त्यांच्यासाठी मी माझ्या डोक्यांत आलेल्या चमत्कारिक गोष्टी रेखाटून त्यांना तृप्त केले. ही चित्रे जितकी गूढ आणि अगम्य तितकी त्यांचा त्याबद्दलचा आदरभाव, असे मला आढळून आले. हा सारा मूर्खपणा रेखाटून मी माझी करमणूक करून घेतली.

अशांच्या या कलेला सरकारनी व लोकांनी उत्तेजन द्यायचं काय व कलावंतानी आपली वेळ व श्रम असे निरर्थक खर्च करावेत काय, याचा विचार केला पाहिजे.

याबाबत सरकार ज्यांना राष्ट्रपिता समजते त्या म. गांधींचे विचार पुढे ठेवत आहे.

" ज्या कलेच्या रसग्रहणाकरितां तांत्रिक ज्ञानाची आवश्यकता भासते ती कला मोठी आहे, असे मला वाटत नाहीं. जी कला खरोखरीच महान् असते तिचे निसर्गसौंदर्याशी साम्य असली पाहिजे व तिचा साक्षात्कार विश्वजनीन असावा असे माझे मत आहे. मी माझ्याप्रमाणेंच, अंगावर शहारे आणण्याची शक्ति हीच कलेची

दा. क्रं. ९५८२९

अंतिम कसोटी असे कलात्मक रसग्रहणाच्या बाबतींत म्हणत नाहीं. खरी कला आणि तिचे रसग्रहण याकरितां निसर्गावेगळ्या सुधारले-पणाची गरज नाहीं. कला ही निसर्गभाषेप्रमाणें तिच्या दर्शनांत साधी व आविष्कारांत सरळ असली पाहिजे. निसर्गाने आपल्या असंख्य सौंदर्यकृति केवळ मूठभर शिकलेल्या लोकांकरिता राखून ठेवलेल्या नाहीत."

मग तुम्ही कांही ठराविक लोकांच्या हातीच कला कां देता ? कांही ठराविक लोकांच्या हातीच कलेचा मक्ता देणें हे खऱ्या कलेचे लक्षण नव्हे. कलेच्या नांवावर कला नसलेल्या गोष्टींना दिले गेलेलें अवास्तव महत्व नाकारले पाहिजे. त्यांचा तो अधिकार नाहीं.

साने गुरुजींच्या शद्बांत मी सर्व कलावंताना आवाहन करतो.

'तुमच्या सर्वं कलाकृतितून गरीबांची हाक ऐकू येऊ दे तुमच्या कलाकृतीतून यांची दुःखे, त्यांच्या आकांक्षा यांचे चित्र दिसू• दे तुमच्या कलाकृतीना स्पर्श करताच बहुजन समाजाच्या हृदयाला आपण स्पर्श करीत आहोत असे वाटू दे. या जनतेच्या अपार दुःखा-जवळ तुम्ही जाताच त्याचे प्रश्न ते तुमचे होतील. त्यांच्यासाठी तुमची हृदये तिळतिळ तुटू लागतील. प्रेमानें जा, आस्थेनें जा, मग तुमच्या कलाकृती खऱ्या महाराष्ट्राच्या होतील. त्या सर्व समाजाच्या होतील.'

आजचे सरकार हे लोकांचे आहे. लोकांनीच निवडून दिलेलं आहे. लोकांच्या शिक्षणासाठी लाखो रुपये खर्चत आहे. अनेक विश्व-विद्यालये काढत आहे. मग जी चित्रकला लोकासाठी नाही, लोकाना समजत नाहीं व लोकांना जिचा काडीचाहि उपयोग नाही, जिला आपल्या हिंदी संस्कृतात स्थान नाही, आधुनिक साधनाचाहि जो स्वीकार करीत नाही व आपल्या राष्ट्रपित्यानें व जगातील

जनतेच्या खऱ्या पुढाऱ्यानी जिचा धिक्कार केला आहे त्या कलेला उत्तेजन द्यायचं काय याचा सरकारने विचार करावा. एवढीच मी सूचना करू इच्छितो.

बहुजन समाजाला आपल्याला कधीहीं विसरुन चालणार नाहीं. कलेची सर्व साधनें कोणी निर्माण केली ? रंग, कुचले, कागद, कानव्हस कोणी तयार केले ?

'वरच्या समाजांत वावरणाऱ्या आपल्यासारख्या उच्चभ्रू कलावंत व विचारवंत लोकाकरितां खालच्या थरातील गरीब लोकांनीं रस्ता मळविला आहे व तो सुकर केला आहे.'

—रोमा रोला.

यांना विसरून कसं चालेल ?

यापेक्षा मी आणखी काय सांगू ? तथापि जाता जाता चार सूचना कराव्याशा वाटतात.

शाळेचे Examiners तसेच प्रदर्शनातील चित्रांचे परीक्षक हे निव्वळ तंत्रज्ञ असू नयेत. कला तंत्रदृष्टचा निर्दोष असलीच पाहिजे. तसेच अधिकांत अधिक लोकांना ती समजली पाहिजे. समाजसेवा व देशसेवा हे तिच्यापुढे ध्येय पाहिजे. या करता—

परीक्षकांत तंत्रज्ञाबरोबर सामान्यातल्याहि व्यक्ती पाहिजेत. त्या खात्याचे मंत्री, डेप्युटी मिनिस्टर व सेक्रेटरी असावेत व कलाभिज्ञ अशा दोन व्यक्ती असाव्यात. त्या पाचांनी चित्रांची निवड करावी व बक्षिसे ठरवावीत.

याचा परिणाम कलाशिक्षणाला योग्य दिशा लावल्याखेरीज राहणार नाहीं.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४४०२७ वि: निबंध
क्रमांक १५०३० नों: दि: १५/११/५०



आणखी एक विनंती करवीर जनतेला करू इच्छितो. आज महाराष्ट्राचे अग्रगण्य नेते व भारताचे एक पुढारी व संरक्षण मंत्री यशवंतरावजी चव्हाण यांचा आज वाढदिवस आहे. त्या निमित्तानें त्यांच्या नांवची एक म्युझियम येथें बांधली जावी व तीत सरकारनें औंधच्या म्युझियममधील चित्रे आणून ती एक महाराष्ट्रांतील आदर्श अशी म्युझियम करावी अशी सूचना करू इच्छितो.

◆ ◆ ◆

भाई माधवराव बागल यांचे निर्भीड विचार

## सत्तेसाठी कॉंग्रेसवाल्यांची धडपड! विरोधासाठीं विरोधी पक्षांची धडपड !

कागल नगरपालिकेनें, कागल येथें ता.९-११-१९६६ रोजीं महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री ना. बाळासाहेब देसाई यांचे हस्ते राजर्षि शाहू महाराजांचा पुतळा बसविला. या समारंभाचे अध्यक्ष भाई माधवराव बागल हे होते. त्यानी त्यावेळी अध्यक्ष या नात्यानें जे विचार व्यक्त केले, ते.

माझ्यासारख्या ना सत्ता ना संपत्ती, अशा माणसाला आपण अध्यक्षपद दिलं हा तुमचा मोठेपणा आहे. शाहू महाराजानी हेच केलं. ते आपल्या गाडीत आपल्याबरोबर सामान्य माणसाना रसूल, मोहद्दिन टकले, अरबशा या सारख्याना जवळ बसवून व मडगार्डजवळ आप्पा-साहेब कागलकर, नेसरीकर, कापशीकर या जहागिरदाराना उभं करून गाडी गावभर फिरवत व सर्व जनतेला मला हे सर्व सारखे, असे कृतीनें

पटवून देत. त्याचप्रमाणें त्यानी शहाण्णव कुळीची घमेंड मारणाऱ्या जहागिरदाराना आपल्या स्वतःचा धनगर घराण्याशी लग्नसंबंध घडवून ती त्यांची घमेंड खाली उतरवली.

सामाजिक क्रांतिबाबत तर शिवाजी महाराजांच्या पुढेही मजल मारली. त्यानी एक भट राज्याभिषेक करीत नाही म्हणून दुसऱ्या भट्टाला आणले तर शाहू महाराजानी स्वतःच एक सामान्यातला जगद्‌गुरू निर्माण करुन भटांचे प्राबल्यच नष्ट केलं.

शिक्षणाबाबतही क्रांति घडवून आणली.

म्हणून देव न मानणारा मी राजर्षीना देवासमान मानतो. ती थोर परंपरा शिवबांची, फुल्यांची, आंबेडकरांची विठ्ठल रामजींची भाऊरावांची यशवंतरावजीनी व बाळासाहेबानी पुढं चालवली म्हणून ते पण मला लहान असूनही गुरुस्थानी वाटतात.

शिवाजी महाराजांनी स्वपराक्रमानें शत्रुला हाकलून दिलं तीच शक्ती आज यशवंतरावजीना लाभली आहे. महाराष्ट्रांचं भाग्य उदयास आले. आता बाळासाहेब महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्याचं भाग्य लाभावं एवढीच मनाची इच्छा आहे.

**सत्तेसाठी धडपड–**

आज देश बिकट परिस्थितीतून जात आहे. सर्वत्र अनागोंदी आहे. आज काँग्रेसच्या राज्याला धक्का बसला आहे. शत्रू येण्या-अगोदरच आम्ही परस्परांचा निःपात करूं लागलो आहोत.

काँग्रेसबद्दल लोकांत असंतोष आहे. पहावे तेथे सत्तेची धडपड, सत्तेचा हव्यास, जुने म्हणतात, आम्ही विद्वान त्याग केला आणि दुसरे अधिकारावर बसले. नवे म्हणतात आम्ही विद्वान, आम्हीच लायक. पण सर्वांची धडपड सत्तेसाठी, सेवेसाठी नव्हे !

काँग्रेसमध्यें शिरलेले, पूर्वी फाटके पायताण ज्यांना घालायला मिळत नसे ते मोटारी उडवतात, बंगले बांधतात, लाखोपती होतात आणि पुन: देशभक्त म्हणून मिरवतात आणि यांची सारी धडपड कोणातरी मंत्र्याची मर्जी संपादन करून मोठेपणा मिळवणं आणि हेच मुंगळे गूळ मिळत नाहीं असे दिसताच त्याच मंत्र्याचे चावे घेण्यास कमी करत नाहीत. मंत्र्यांनी हे जाणून कोणाला जवळ करायचं आणि कोणाला लांब ठेवायचं ते ठरवलं पाहिजे.

## विरोधासाठी विरोध

विरोधी पक्ष तर काँग्रेसद्वेषाने वेडेच झाले आहेत. लोकांना भडकावल्यानें ते कुठे चालले आहेत. याचा ते विचारही करेनासे झाले आहेत. सामान्य जनतेवर आणि विद्यार्थ्यावर त्याचा काय परिणाम होतो याचा विचार न करतां सर्व दोषाचे खापर काँग्रेसवर टाकून मोकळे होत आहेत.

भाषावार प्रांतरचनेसाठी तर मी वेडा झालेला माणूस. पण या मागणीचे स्वरुप व परिणाम देशाला विघातक होत चालले आहेत. आम्ही आमचेच शत्रू बनत आहोत. म्हणून विरोधी पक्षानेही आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. देशाला संकटातून बाहेर काढण्याऐवजी आपण देशाला अधिक संकटात तरी टाकत नाही काय याचा त्यानी शांत डोके ठेवून विचार करावा.

माझे विचार काँग्रेसच्या मंडळीनाही आवडणार नाहीत तसं विरोधी पक्षानाही आवडणार नाहीत हे मी जाणून आहे. तरी पण मला वाटतं ते बोलणं मला कर्तव्य वाटतं. नाराजीला भिऊन सदसद्विवेक बुद्धीशी प्रतारणा करण्यापेक्षा नाराजी पत्करणंच श्रेयस्कर.

◆ ◆ ◆

# जगाचे मार्गदर्शन भारतच करील !

लेखक– भाई माधवराव बागल.

जगाचे मार्गदर्शन भारतच करील हीं प्रौढी नव्हे. कारण भारत स्वत:ला सर्वांहून शहाणा समजत नाहीं. तो नम्र आहे तो सर्वांकडून शिकू इच्छितो. इतरांचे जे जं चांगले ते स्वीकारण्याची त्याची वृत्ती आहे. तो सिद्धांतवादी नाहीं. आग्रही नाहीं. म्हणून इतरांच्या यशापयशाचा त्याला साहजिकच फायदा मिळत आहे. इतरांच्या अनुभवातून शहाणपणा शिकण्याची त्याला आज अनुकूलता प्राप्त झाली आहे. निरनिराळ्या विचारवंतांची मते, त्यांचे विचार, त्यांचे प्रयोग व निरनिराळ्या देशांचे त्याबाबतचे यशापयश त्याला त्रयस्थांच्या दृष्टीकोनांतून अभ्यासता येत आहेत. आणि या चाळणीतून आपला स्वतंत्र मार्ग चोखाळता येत आहे. इतरांच्या अनुमानाचा, अनुभवाचा फायदा भारताला मिळत आहे.

ब्रिटन, अमेरिका, स्वीत्झरलंडसारख्या देशांतील भांडवलशाही प्रधान लोकशाहीचे समूळ उच्चाटन एकदम न करता साधता येणारे सामुदायिक हीत जर्मनी इटलीची हुकुमशाही, त्यांना अगदी थोडक्या अवधीत केलेली आपल्या राष्ट्राची भरभराट व त्याचवेळी केलेली खालच्या समाजाची पिळवणूक, त्याचा केलेला बौद्धिक ऱ्हास व लादलेली गुलामगिरी आणि अखेर राक्षसी महत्वाकांक्षेने ओढवून घेतलेला आत्मनाश.

तसेच रशिया, चीनने श्रमजीवी वर्गाचा उद्धार करण्याकरतां जमदार, भांडवलदार, सावकार, धर्मोपदेशक यांची कत्तल आणि

त्याचबरोबर उदात्त हेतूनें आपल्याच देशाच्या शेतकऱ्यावर केलेले अनन्वित जुलूम, औद्योगिकरणाच्या वेडसर घाईनें ओढवून घेतलेला धान्य दुष्काळ.

निरनिराळ्या साम्राज्याचा उदय व ऱ्हास, कलह मिटवण्यासाठीं युद्धाच्या उपायाची सिद्ध झालेली अनुपयुक्तता. या सर्वांचा भारताला अभ्यास करता आला.

अव्यवहारी वाटणाऱ्या अहिंसेला म. गांधीजींनी व्यक्ति जीवनातच नव्हे तर राजकारणातही महत्वाचे स्थान प्राप्त करून दिले. अहिंसा सत्याग्रहाचे उपायानें भारताला स्वातंत्र्य मिळवून देऊन जगाला आश्चर्यचकित करून सोडले. त्याच धोरणाला धरून पंडित जवाहरलाल नेहरूनी पंचशीलेच्याद्वारे जगत्‌शांतीचा मार्ग दाखवला व स्वतः त्याला अनुसरून भारताचे धोरण ठरवून दिले.

गांधी नेहरूचे तत्वज्ञान म्हणजे पौर्वात्य आणि पाश्चिमात्य संस्कृतीचा व्यवहारी समन्वय होय.

रामायण, महाभारतातून त्यावेळची सामाजिक व राजकीय परिस्थिती व तात्विक विचार ह्या वैचारिक मंथनातून मानवाच्या कल्याणाचा मार्ग दाखवणारी 'भगवद्‌गीता' शंकराचार्य, ज्ञानेश्वर, टिळक यांनी आपआपल्या बुद्धीनें त्यांतून काढलेले निष्कर्ष, त्याच वाङ्मयाच्या अभ्यासातून, चिंतनातून व संस्कारातून एकनाथ, नामदेव, तुकोबा, कबीर या संतानी बहुजन समाजापर्यंत पोहोचवलेली अध्यात्मिक समता–

ख्रिस्त, बुद्ध, महावीर, पैगंबर यांचे जीवन व उपदेश यांतून भारताची संस्कृति बनत गेली आहे.

निव्वळ अध्यात्मिक समता, परमार्थ आणि मोक्ष या कल्पना व्यवहारी जीवन सुखी करायला अपुऱ्या पडल्या व अध्यात्मिक विचाराचा फायदा विशिष्ट वर्गाच्याच पदरी पडू लागला. तेव्हां पिळलेल्या समाजाचा विचार करून त्या परिस्थितीचा बारकाईनें अभ्यास करून बहुसंख्य श्रमजीवी वर्गाच्या उत्कर्षाचा मार्ग मार्क्स–लंगल्स यांनी शोधून काढला. समाजाच्या संघर्षाचा अभ्यास करून कांही ठोकताळे बसविले. अनुमाने काढली व सुटकेचा मार्ग दाखविला.

भांडवलशाहीचा उगम, तिची वाढ, त्यांतून निर्माण होणारे संघर्ष व त्या संघर्षातून उदयाला येणारी नवी आर्थिक समाजव्यवस्था, तिनें निर्माण होणारी सामाजिक क्रांति व नव सस्कृति त्यांनी सूत्रबद्धरीतीनें समाजापुढें ठेवली.

त्या ग्रंथाच्या आधारावर साम्यवादी जगाची निर्मिती लेनिन स्टॅलिन यांनी केली. त्या विचार आचारानें व कांही बाबतीत त्यांनी केलेल्या प्रगतीमुळें व यशामुळें श्रमजीवी वर्गाच्या आकांक्षा फुलल्या व ते वारे जगभर जोरानें फुलले. सरंजामदारशाही, राजशाही, सावकारशाहीवर मात करून साम्यवादानी नव्या श्रमजीवी वर्गाच्या राज्याची उभारणी केली त्यामुळें भांडवलशाही राष्ट्राला धक्के बसू लागले. त्या त्या राष्ट्राचा श्रमजीवी वर्ग हक्कासाठी झगडा देऊ लागला.

पण धूर्त भांडवलवाल्यांनी सावध होऊन मार्क्सचे भाकित खोटे ठरवले पण याचा अर्थ मार्क्सवाद सर्वस्वी खोटा ठरला असाही करता येणार नाहीं. त्यावेळी त्याने केलेले भाकित चुकीचे नव्हते पण कोणताहि सिद्धांत हा सर्वकाळी लागू होतो असे नाहीं.

साम्राज्याच्या लुटीवरच त्या राष्ट्रांतील भांडवलशाही नष्ट होईल हे भाकीत खोटे ठरले.

ग्रीस, रोमची साम्राज्ये गुलामगिरीवरच पोसली गेली पण ती गुलामगिरीवरच्या परोपजीवी वर्गाच्या संस्कृतीच्या वाढीसही कारणीभूत झाली आहे. त्यावेळची ग्रीस व रोम ही राज्ये कला आणि संस्कृतीच्या शिखरास पोचली पण तिच्या पायाचा आधार गुलामगिरी हाच होता. ती नसती तर संस्कृतीची वाढ झालीच नसती. ते का ?

गुलामाच्या श्रमावर आरामानें जगणारा वर्ग निर्माण झाला. गरजेहून अधिक जी शिल्लक राहिली तीतून गुलामांच्या मालकांची श्रीमंती वाढली. श्रीमंतीमुळे आरामी वाढली. या बचत झालेल्या वेळातून कला, शिक्षण, संशोधन यांची वाढ झाली.

वाईटातून चांगले निष्पन्न झाले. पण पिळलेल्या, भरडलेल्या, तुडवलेल्या बहुजन जनतेच्या असंतोषातून प्रतिकाराची लाट उसळली.

भरमसाट संपत्ती व सत्तेच्या मदांतून त्या साम्राज्यांचा निःपात झाला.

पण त्या वर्गाने स्वतःसाठी लोकशाही अस्तित्वात आणली. प्रथमावस्थेतील लोकशाहीचा जन्मही ग्रीस व रोम मध्येच झाला.

या नंतर यंत्रयुगांतील भांडवलशाहीचा काल आला. यात इंग्लंडनें आघाडी मारली. यत्रामुळें कल्पनातीत वाढलेल्या उत्पादनाला बाहेरच्या बाजारपेठांची आवश्यकता भासू लागली. कारण पिळवणुकीनें दरिद्री बनलेल्या बहुसंख्य समाजाची तो माल खरेदी करण्याची शक्ती उरलेली नव्हती. म्हणून दुसरे देश जिंकून ब्रिटिशांनी हक्काची बाजारपेठ निर्माण केली. कच्चा माल स्वस्तात घेऊन पक्का माल भरमसाठ किंमतीला गळयांत बांधून साम्राज्यातील संपत्तीची लूट केली, व भारताला बेकार बनविले.

याच अंकित राष्ट्रांत स्वातंत्र्याची महत्वाकांक्षा वाढली व त्या पेटलेल्या ज्योतीत साम्राज्यें नष्ट झाली. पण त्या देशांतील भांडवलशाही त्या बरोबर नष्ट झाली नाहीं. कारण मजुरांचाचा असंतोष गिरणी मालकांनी अनेक सवलती देऊन कमी करत आणला.

ब्रिटन व अमेरिकेतील लोकशाहीचा फायदा मजूर व सामान्य वर्गाच्या पदरी पडत गेला. लोकशाहीच्या मार्गानेच त्यांनी आपला प्रभाव वाढविला. तो इतका कीं सनदशीर मार्गांनेंच मजूर मंत्रीमंडळ अधिकारावर येऊ शकले.

पगारांत भरपूर वाढ, तासात काट, फायद्यांत वाटणी, इतर अनेक प्रकारच्या सोयी यामुळे श्रमजीवी वर्गाची स्थिती सुधारली. यामुळें भांडवलवाल्यांचा तोटा होण्याऐवजी त्यांना आपल्या देशांत मालाला गिऱ्हाईक मिळाले व एकंदर राष्ट्रांत ब्रिटननें आपल्या मजूरांच्या पिळवणुकीचे धोरण बदलले हे केवळ सद्‌भावनेनेच असेल असे म्हणता येणार नाहीं. याचे कारण रशियांतील मजुरांची सुधारलेली स्थिती व त्यांचे सर्व जगावर झालेले परिणाम हे होय. पण यामुळें अंतर्गत बंडाळी वाचली आणि सामान्यवर्ग आर्थिकदृष्टया सुधारल्यामुळें त्यांच्या मालाला तेथेच बाजारपेठ मिळाली. तेथील लोकशाहीमुळें सर्वांना जो मतदानाचा हक्क मिळाला होता त्याचाहि फायदा बहुसख्य जनतेच्या पदरांत पडू शकला लोकशाहीच्या सनदशीर मार्गानें क्रांति म्हणजे रक्तपाताशिवाय सामान्यजनाना राजसत्ता हस्तगत करता येते ही गोष्ट सर्व जगालाच उपकारक ठरणार आहे. याचा फायदा साहजिकच हिंदुस्थानच्या पदरांत पडला आहे.

साम्यवादी रशिया व चीन या राष्ट्रांनी कठोर हुकुमशाहींचा स्वीकार केला, यामुळे मानवी जीवनाला आवश्यक असे मूलभूत हक्क चिरडले गेलें. राजेशाहीत व्यक्तीस्वार्थांसाठी ज्या गोष्टी झाल्या त्या

स्वत:च्या कल्याणासाठी झाल्या त्याहूनही समाजवादी राष्ट्रांनी अधिक जुलूम व अधिक दहशतीचे वातावरण निर्माण केले. औद्योगिक प्रगतींकडें सर्व लक्ष दिल्यामुळे जीवनाला आवश्यक गोष्टींचा तुटवडा पडला सामुदाईक शेतीमुळें छोटा शेतकरी मारला गेला त्यामुळे धान्याचे उत्पादन अपेक्षेप्रमाणें वाढू शकले नाही. यंत्र साधनानें श्रमाची बचत झाली पण शेतीचा कस कांही यंत्रसाधनानें वाढला नाही यामुळें धान्य दुष्काळ निर्माण झाला.

रशियाने शिक्षणाच्या बाबतीत मात्र जगांत आघाडी मारली. त्याचा परिणाम त्या राष्ट्रावर झाल्याखेरीज राहणार नाहीं. कारण एवढा शिक्षित व जागृत वर्ग 'याबच्चंद्र दिवाकरो' हुकुमशाही राजवट मान्य करील असे वाटत नाहीं. लोकशाहीचे वारे त्यांना फारसे कोंडून ठेवता येणार नाहींत.

जगातल्या राष्ट्रांचे हे सर्व प्रयोग, अनुभव, ठेचा, दोष भारताला काळजीपूर्वक न्याहाळता आले.

गांधीजींचा अहिंसावाद व नेहरुंचे पंचशील म्हणजे सर्व तत्वज्ञानातून अनुभवातून यशापयशांतून घुसळून निघालेलें, जगाला संकटांतून वाचवणारे अमृत होय. आणि त्याच ध्येय धोरणाला अनुसरून, त्याच पादुकाला पूजून त्यांचेच धोरण शास्त्री मोठ्या कणखरपणाने चालवित आहेत.

त्यांनी गांधींवाद टाकलेला नाही. 'पंचशींल' टाकलेले नाही. तटस्थता टाकली नाही हिंदंचा हिंदुस्थान. ही भूमिका शास्त्रीजी कधी घेणार नाहीत. ते आक्रमक होण्याकरता शस्त्रबल व सैन्यबल वाढवणार नाहींत. शत्रूचा सूड उगवण्यासाठी ते राष्ट्र किंवा मुलूख जिंकणार नाहीत. निधर्मी राज्याला आणि लोकशाहीला काळीमा लागेल असे कृत्य कोणाच्याही चिथावणीने अगर स्वुतीने करणार नाहीत.

गांधी, नेहरूंच्या तत्वज्ञानाचाच वारसा शास्त्री चालवतील, चालवला आहे. कोणा जातवाल्यांच्या स्तुतीला भाळून ते ध्येयच्युत होतील अशी कोणी अपेक्षा करू नये अन् जागृत जनता कोणा पुढाऱ्याला तसे करू पण देणार नाही.

. . .

भाई माधवराव बागल

## गांधीवादाचे उपासक

**गांधीवादाचे खरे उपासक कोण ?**

मार्क्सवादाला पोलादी चौकटीत टाकणारे निघाले, तसेच गांधीवादालाहि पोलादी चौकटीत अडकवून टाकणारे व त्या तत्वाची वाढ खुंटवून टाकणारेहि निघाले. आम्हींच खरे गांधीवादी म्हणून ते मिरवित आहेत.

अशी पोलादी चौकट निर्माण केली तर त्यांत गांधीजीनी आपले मानसपुत्र म्हणून मानलेले पंडीत जवाहरलाल नेहरूही बसणार नाहींत.

कारण नेहरुनी गांधीजींची सर्वच मते कांही स्वीकारली नव्हती. त्यांच्या श्रद्धा स्वीकारल्या नव्हत्या. त्यांचा वेष स्वीकारला नव्हता. पक्षशिस्त म्हणून खादीधारी असले तरी देश, काल, हवामान व परिस्थितीप्रमाणें ते त्या पोषाखात बदल करीत होते. त्या त्या देशाच्या रिवाजाप्रमाणें ते पोषाख करीत.

गांधीजीनी कडकडीत थंडीतहि दरिद्री नारायणाचा पोषाख बदलला नाहीं. खाण्यांत बदल केला नाही. चरखा चालवण्याचा नियम चुकवला नाहीं.

नेहरूंनी खादीला विरोध केला नाही पण गिरण्यांना व यांत्रिक सुधारणेला भरपूर प्रोत्साहन दिले.

गांधी ईश्वरवादी होते. आतला आवाज म्हणजे ईश्वराचा आवाज मानीत होते. धर्मश्रद्धेला त्यांच्या आचार विचारात स्थान होते.

नेहरू ईश्वरवादी नव्हते. नीती मानत असले तरी गांधीजींच्या प्रमाणें धार्मिक वृत्तीचे नव्हते तरी अहिंसेला प्राधान्य देणारे होते.

अशी ही भिन्नता असूनहि गांधीजी त्यांनाच आपला वारस मानीत. याचाच अर्थ गांधीजींना आपल्या विचारांना पोलादी चौकटीत बसवण्याची इच्छा नव्हती. गांधीजींच्यांत परिस्थितीशी जुळवून घेण्याची लवचिकता होती.

युद्ध सुरु झाले ! त्यावेळी तोफेच्या आडवे पडून हिंसा बंद करण्याचा अव्यवहारी आत्मनाशी प्रयत्न गांधीजीनीं केला नाही. तर जायबंदी सैनिकांची शुश्रूषा करण्यासाठीं स्वतः पुढाकार घेऊन पथक काढले. अन् त्या कामगिरीबद्दल त्यांना गोऱ्या लोकांनी सन्मानाचे पदक अर्पण केले.

प्राणांतिक वेदनेने तडफडणाऱ्या वासराचे हाल पहावेनात म्हणून त्यांनी त्याच्या यातना चुकवण्याकरता त्याला झटकन मारून त्याची त्या यातनेतून सुटका करण्यास परवानगी दिली.

प्लेग आला होता, त्यावेळी उंदीर मारावेत की नाही असा प्रश्न उपस्थित झाला. त्यावेळीं मानवी जीवाचे रक्षण करण्याकरता प्राणहत्येला त्यांनी परवानगी दिली.

नाकाला फडके बांधून डोळयांना न दिसणाऱ्या सूक्ष्म जंतुंची हत्या चुकवणाऱ्या यतींची अव्यवहारी अतिरेकी अहिंसा त्यांची नव्हती.

तुमच्या बायकोवर कोणी गुंडानें हल्ला केला तर तो अहिंसेच्या मुखवटयाखाली खपवून घेण्याचा उपदेश त्यांनी केला नाही. प्राण देण्याची हिंमत नसल्यास हिंसा करा, शस्त्र हाती घ्या, असाच उपदेश त्यांनी केला आहे.

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे गांधीजींच्या अहिंसेबद्दल म्हणतात:

"अहिंसा आणि क्षात्रधर्म हा परस्परापासून अलग करता येत नाहीं. तोंडानें अहिंसा मंत्र पाठ करणारे गांधीजीहि शिवाजीच्या क्षात्रधर्मानेच निघाले आहेत. अहिंसा हा धर्म नसला तरी तेच धोरण राखण्याची खबरदारी इतरानी काय पण अस्सल अधिकारी क्षत्रियांनीहि राखणें भाग आहे."

गांधीजीनी हाच उपदेश अगदी स्पष्ट शद्बात राष्ट्राला दिला आहे. ते म्हणतात :

'Under Swarajya too I would not hesitate to advise those who would bear arms to do so and fight for the country..... I would rather have India resort to arms in order to defend

her honour than that she should in cowardly manner become or remain a helpless witness to her own dishonour.'

'देश रक्षणासाठीं भारताने दुर्बलता व अपमान पतकरण्यापेक्षा बेलाशक हाती शस्त्र धरावे.'

श्रेष्ठ विचारवंत आचार्य भागवत म्हणतात :

"महात्मा गांधी जेव्हां हिंसेचा विरोध करतात त्यावेळीं मारण्याच्या संकुचित अर्थानें बोलत नाहीत. त्यांच्या अहिंसेमध्यें मानवी समानता पायाभूत असून विषमतेविरुद्ध प्रतिकार हा त्यात अभिप्रेत आहे.

येथे गांधीजींची विचारसरणी मार्क्सवादाला शोभण्याजोगी आहे. गांधीजी लिहतात,

"प्रत्येकाला त्याच्या गरजेप्रमाणें. हाच आर्थिक समतेचा खरा अर्थ आहे. मार्क्सची तीच व्याख्या आहे. बायको व चार मुलें असलेल्या माणसाइतकेच आपणास मिळावे अशी एखाद्या सड्या माणसाने मागणी केली तर तो आर्थिक समतेचा भंग आहे. वरचा वर्ग आणि सामान्य जनता, राजा आणि भिकारी यांपैकी पहिल्या वर्गाच्या गरजा अधिक म्हणून त्यांना जास्त लागते असे म्हणून या दोन वर्गातील डोळच्यांत भरणाऱ्या भेदाचे समर्थन करण्याचा प्रयत्न कोणी करू नये. श्रीमंत आणि गरीबात असणारा फरक हे दुःखद दृष्य आहे. खेड्यांतील गरीब लोक अन्नाची पैदास करतात पण त्यांनाच भुकेले रहावे लागते. ते दूध काढता पण त्यांच्या मुलाना दूध मिळत नाहीं ! ही लाजीरवाणी

गोष्ट आहे. प्रत्येकाला समतोल आहार, रहायला व्यवस्थित घर, मुलांच्या शिक्षणासाठी सोय व पुरेशी मदत मिळाली पाहिजे."

रशिया व भारत या दोन्ही देशांतील आर्थिक नियोजनाचे सूत्र याच उद्दिष्टाला धरून नाही का आधारलेले आढळत ? त्या नियोजनांत यांत्रिक साधनाना विशेष स्थान दिले म्हणून भारत गांधीवादाला सुटून चालला आहे असे म्हणता येणार नाहीं.

गांधी तत्वज्ञानाचे भाष्यकार आचार्य जावडेकर म्हणतात : ' गांधीवादाचा विरोध यांत्रिक उत्पादनाला नसून औद्योगिक केंद्रिकरण, आर्थिक दास्य, वर्गकलह आणि आर्थिक विषमता यांना आहे ' म्हणून चरखा चालवणारा व खादी वापरणारा हाच खरा गांधीवादी म्हणण्यांत कांही अर्थ नाही. निव्वळ भगव्या वस्त्रात शुचिर्भूतता नाही. त्या पेहेरावामागे त्यागाचे, शीलाचे, संन्यासाचे तत्वज्ञान आहे.

यंत्राने गरीबाची पिळवणूक होता कामा नये. यंत्राचे माणसांनी गुलाम होता कामा नये हाच खादी व चरख्यामागील हेतू आहे.

यंत्रानी जर गरीबांचे जीवन सुखी केले; यंत्र मालकीमुळे उत्पन्न होणारी विषमता व गुलामगिरी जर टाळता आली, देशसमृद्धी व बुद्धीचा विकास करण्यास अनुकूलता प्राप्त करून दिली तर चरख्यालाच अंधपणानें चिकटून रहाणें हा आंधळा गांधीवाद झाला.

चरखा शेतकऱ्याच्या बुद्धिविकासाला जर आड येत असेल, नांगर चालवणारा बैल व चरखा चालविणारा शेतकरी बौद्धिकदृष्टचा एकाच पातळीवर राहणार असेल, शेतकऱ्याचीं संस्कृतीशी जर फारकत होणार असेल, कष्टकरी अन् पांढरपेशावर्ग यांच्यातील बौद्धिक विषमता जर वाढत असेल तर चरख्याला चिकटून राहणे म्हणजे अज्ञानाला चिकटून राहणें होय. विज्ञानाला टाकून देणें होय!

स्वातंत्र्यपूर्वकालांतील चरखा व खादीची आवश्यकता स्वातंत्र्य मिळाल्यानंतरहि तितकीच आहे म्हणणे म्हणजे परिस्थितीचा विचार न करता जुन्याला चिकटून राहणे होय. प्रगतीला खुंटून ठेवणें होय !

त्यावेळीं परदेशी कापडामुळे बाहेर जाणारा पैसा कायद्यानें बंद करता येत नव्हता. गिरण्यांचे राष्ट्रीयकरण करणे हाती सत्ता नसल्यामुळे शक्य नव्हते. म्हणून त्यावेळी परदेशी जाणाऱ्या पैशाचा प्रवाह थांबवण्याचा हा एक, व्यक्तिहाती उरलेला मार्ग होता. चरखा हेच एक आपल्या हाती प्रतिकारात्मक अहिंसक शस्त्र होते. आज त्याची तितकी आवश्यकता उरलेली नाहीं. चरखा हा आज एक अव्यवहारी बुडीतला धंदा आहे व बहुजन समाजाचा बौद्धिक विकास थांबवणारा आहे.

जी गोष्ट अहिंसेची तीच खादीची. परिस्थितीचा विचार करूनच तिचा वापर करावयाला हवा. निव्वळ खादी वापरणारा गांधीवादी होऊ शकणार नाही. तो सोंगाड्या गांधीवादी होय !

परिस्थिती पाहून गांधीजी स्वतः बदलले आहेत. यामुळे परस्परांची विरुद्ध अशी मते व्यक्त केल्याचा आरोप त्यांच्यावर लोकांनी केला आहे. त्यावेळी त्यानी खालील उत्तर दिले आहे:-

"People say thet I have changed my views, that I say something different form what I have said years ago. The fact of the matter is that conditions have changed, I am the same my words and deeds are directed by prevailing conditions. There has been a gradual evolution in my invironment and I read to it as a Satyagrahi."

'मी कांही वर्षापूर्वी जे बोललो त्याच्या उलट आज बोलतो म्हणून मी माझी मते बदलली आहेत असा लोक मजवर आक्षेप करतात. पण खरी गोष्ट म्हणजे परिस्थिती बदलली आहे. पण मी तोच आहे. त्या त्या कालची परिस्थिती पाहून माझी बोली व कृती बदलते. कारण सभोवतालच्या उत्क्रांतीबद्दल माझ्यांत बदल होत असतो. कारण मी सत्याग्रही आहे

ज्यावेळी त्यांच्या दोन लिखाणांत विरोध दिसून येई तेव्हां ते म्हणत :

'माझ्या शद्बाची किमत असेल तर पूर्वीचे त्याज्य आणि नंतरचे ग्राह्य समजा. मी सदैव शिकत आहे.'

याचाच अर्थ गांधीजीनीं सांप्रदाय निर्माण केला नाहीं. धोरण आणि उद्दिष्ट पुढे ठेवले.

स्वातंत्र्यपूर्व कालातील चरखा व खादीचे महत्व स्वातंत्र्यानंतरहि तसेच उरले आहे म्हणणें वस्तुस्थितीला सुटून आहे.

शासनसंस्था हिंसात्मक असूनहि तिच्याखेरीज आज समाजाचे चालूच शकत नाही. भलत्याच वेळी ती मोडल्यास त्यातून अराजकता निर्माण होईल. म्हणून त्यांनी शासन संस्थेला मान्यता दिली व मार्गदर्शन केले.

ती शासनसंस्था गांधीजींच्या धोरणानुसार म्हणजे अहिंसा हे अंतिम ध्येय मानून ते प्रत्यक्षात आणण्याकरता अवश्य तेथे काँग्रेसला हिंसा करावी लागली आहे.

देशाचे संरक्षण करण्याकरता, देशाचा स्वाभिमान राखण्याकरता व निधर्मी लोकशाही जतन करण्याकरता नाइलाज म्हणून

गांधीवादी शास्त्रींजींना युद्धाला तोंड द्यावे लागले. पण युद्धानें ईप्सित साध्य झाल्यानंतर धैर्याने व शांतचित्ताने ताश्कंद तहनाम्याला पाठिंबा द्यावा लागला.

अहिंसेची भलतीच ओढाताण केली असती तर देशाला पराभव पतकरावा लागला असता आणि सन्मान्य युद्धतहकुबीला मान्यता दिली नसती तर जगाला युद्धाच्या खाईत लोटण्याचे महत्पाप लागले असते !

म्हणूनच शास्त्रीजी व जगाला 'पंचशील' देणारे, जगत्शांतीचा मार्ग दाखवणारे पंडितजी, हे गांधीवादाचे खरे उपासक होत.

मार्क्सवादाला विविध फुलांना बहर आला. परिस्थितीप्रमाणें लेनिन, स्टालीन, क्रुशाव, कोसिजीन यांनी स्वतंत्रबुद्धीनें निष्कर्ष काढले तरी सर्वांचा आधार मार्क्सवादच.

तीच गोष्ट गांधीवादाची ! भारतातले परस्परविरोधी वाटणारे पक्ष आणि व्यक्ति गांधीवादाचा वारसा घेऊनच लोकांपुढे वावरत आहेत.

प्रख्यात तत्वज्ञानी सी. ई. एम्. जोड म्हणतो :

"गांधीजींचा सत्याग्रहाचा मार्ग हा भावी पिढ्यांना थोर असा वारसा आहे. भांडणें मिटवण्याकरतां त्यांनी उद्घोषित केलेल्या मार्गामुळे अत्याचाराचा मार्ग बंद पडण्याची नुसती शक्यता आहे. एवढेच नव्हे, तर मानवाच्या विनाश साधनाचा (अॅटम् बॉंब) हिंसेचा मार्ग मागे पडलाच पाहिजे."

अमेरिका, रशिया ही दोन्ही राष्ट्रे मतभेद राखूनहि एकमेकाजवळ येत आहेत. शांतता व सहजीवनाचा मार्ग व्यवहारी ठरत आहे. ही दूरदृष्टी महात्मा गांधीजींचीच नव्हे काय ?

दा: क्र. ९५९२२

रोमा रोला म्हणतो :

'महात्मा गांधीजी म्हणजे धुगधुगत्या अंगारातील ज्वलंत ज्योत होय ! खवळलेल्या मानवी महासागराला योग्य दिशा दाखवणारा दीपस्तंभ होय.'

त्याच दीपस्तंभावर दृष्टी केंद्रीभूत करून अनेक छोटे मोठे लोक आपला मार्ग आखीत आहेत.

'The ideal for which Gandhi lived and died is the reconciliation of peoples and the building of fraternal world.'

अहिंसा म्हणजें व्यक्तिजीवनाला, समाजजीवनाला, तसे जगाला स्वास्थ्य, शांती, समृद्धी व समता मिळवून देणारे शास्त्र आहे. मार्क्सवादाहूनहि सर्वव्यापी असे हे तत्वज्ञान आहे. यात मानवतेचा खरा विकास आहे.

'भारत ही गांधीजींची कर्मभूमी असली तरी त्यांचे कर्म विश्वासाठीं होते.' – शंकरराव देव.

नभोमंडळात लहानमोठें तारे येतील, जातील. पण सूर्य तो सूर्यच ! नेहरू, शास्त्रीजीप्रमाणें देदीप्यमान तारे चमकले, तशा अनेक छोटया व्यक्तीहि चमकत आहेत. गांधीजींच्या धोरणाने व ध्येयानें वाटचाल करणारे ते सर्व गांधीवादाचे उपासक होत.

गांधीवाद हे गतिमान असे तत्वज्ञान आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...४४०९९... वि: निबंध
क्रमांक ...१६३...

REFBK-0015929
REFBK-0015929